
अंकुश शिंगाडे
भुताटकी

## या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!

# भुताटकी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# भुताटकी

(कादंबरी)

अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# भुताटकी

लेखक : अंकुश शिंगाडे

फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे- १२२बी, गजानन नगर, भरतवाडा,

कळमना मार्केट रोड, नागपूर. महाराष्ट्र

ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन: २९ जानेवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# मनोगत



भुताटकी ही कादंबरी वाचकांना देतांना मला अत्यंत आनंद होत आहे. ही कादंबरी म्हणजे भुत मानणा-या लोकांना झणझणीत अंजन आहे.

या पुस्तकात मी भुताची परिपूर्ण माहिती दिलेली असून ती माहिती एका कथात्मक दृष्टीनं लिहिलेली आहे. त्यात मनोरंजनाचाही विचार केलेला आहे.

भुत असण्याविषयीचं व नसण्याविषयीचं सुंदर विवेचन या पुस्तकात असून मी या पूर्वी ज्याही कादंब-या लिहिल्या. त्या सर्व कादंब-यांपैकी या कादंबरीत थोडा वेगळा विषय आहे. हा विषय काळजाचा ठाव घेतो. कधी भीतीही वाटते तर कधी गंमतही वाटते ही पुस्तक वाचतांना. मात्र हे वाचकांना पुस्तक वाचतांना कळेलच.

यातील काही भाग हे वर्तमानपत्रातही आलेले असून ही पुस्तक वाचनीय झालेली आहे. आपण ती पुस्तक वाचावी व

आनंद घ्यावा एवढंच सांगणं आहे. मात्र पुस्तक कशी वाटली यासाठी एक फोन आपण अवश्य करावा ही विनंती.

याचं कथानक थोडक्यात सांगतो. दिलजीत हा बहिणीचा बदला घेण्यासाठी मांत्रीक विद्या शिकतो. तो संपूर्ण गावावर करणी करतो. पण गाव चूप नसतं. ते काय काय कशाप्रकारे करतं? हे वाचण्यासाठी पुस्तक वाचा.

आपला - अंकुश शिंगाडे नागपूर

भुत न मानणाऱ्या सर्व बांधवास

सादर समर्पीत

# भुताटकी

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

ती भयाण शांतता अंगाचा थरकाप करीत होती. आजुबाजूला घुबडाचे घुत्कार कानी येत होते. कधी रानपक्षीही ओरडत होते. कधी मधातच वटवाघूळ घिरट्या घालत होते. भयंकर भीती वाटत होती.

चंद्र डोक्यावर आला होता. सगळीकडं हलकासा अंधार असला तरी चंद्राच्या प्रकाशानं परीसरात तजेलता निर्माण झाली होती.

आज पौर्णीमेचा दिवस होता. रात्रीचा डोक्यावर आलेला चंद्र पाहून रात्रीचे बारा एक वाजले होते. गावातील सर्वजण झोपले होते. तसा गावातील कुत्र्यांनी ओरडायला सुरुवात केली.

कुत्र्याचे रात्रीचे ओरडणे प्रत्यक्ष कोणाच्या तरी मृत्यूचा संकेत देत होते. रात्रीला आकाशात यम येतो. तो यम कुणाला तरी घेवून जातो. अशी मान्यता त्या गावात होती. तो यम येतांना कुत्र्याला सर्वप्रथम दिसतो असंही गाव मानत होतं. तसं पाहता ती कुत्री पौर्णीमेच्या व अमावस्येच्या रात्रीच हमखास ओरडत असायची. त्याचं कारणही लोकांना माहित होतं. ते मानायचे की या रात्री शैतान स्मशानातून जागा होवून गावात येतो व जो जागा असेल.

त्याला घेवून जातो. म्हणून अख्खं गाव या दोन्ही दिवशी गाढ झोपेत असायचा. अन् जो जागा असेल, तो त्या रात्रीला पांघरुण घेवून डोळे मिटून घरात गच्च पडून राहायचा.

भीती... प्रत्येकाला भीती असायची. वाटायचं की तो शैतान गावात येईल व आपल्याला उचलून घेवून जाईल.

****************

ते गाव... त्या गावात एका मांत्रीकाचं घर होतं. ह्या मांत्रीकाला सगळे घाबरत असत. त्याच्यापासून सगळे फटकून राहात असत. हा मांत्रीक गावात जादूटोणा करतो असं गावकऱ्यांचं म्हणणं होतं. तो अगाढ वैद्य असून तो आकाशातील उडणारी घारही मंत्रशक्तीनं खाली पाडतो असं गावकऱ्यांचं मानणं होतं.

काही लोकं तंत्रविद्येच्या नावानं भयंकर भीती बाळगत असतात. कारण ते भीती दाखवत असतात. ते म्हणत असतात की की तुम्हाला भूत झोंबेल. भुतबाधा होईल. अशी भुतबाधा होवू नये म्हणून तुम्ही आपल्या घराची सुरक्षा करुन घ्या. अर्थात सुरक्षाकवच लावून घ्या. त्यानंतर ते अशाच अंधश्रद्धेचा फायदा घेवून लोकांमध्ये एवढी भीती भरतात की आज अज्ञानीच नाही तर ज्ञानीही ह्या दहशतीत वावरत असतो.

ज्याप्रमाणे लोकं देव आहे असे मानतात. त्याचप्रमाणे काही लोकं भूत आहे असंही मानत असतात. शहरी भागात भूत मानण्याचं प्रमाण कमी असलं तरी गावाखेड्यात भूत मानण्याचं प्रमाण जास्त आहे. भूतांची भीती दाखवणे ही गोष्ट व्यापार करण्याची असून खेड्यातील हेच मांत्रीक भूताची भीती दाखवून लोकांकडून या भूतांना वश करण्यासाठी वा काढून देण्यासाठी पैसा उकळत असतात. असा पैसा उकळतांना ही तांत्रीक मंडळी काहीतरी मंत्राचा वापर करीत असतात. त्यानुसार एखाद्या दगडाच्या देवाची पुजा करुन त्या दगडावर कोंबडा बकरा बळी देण्याची प्रथाही खेड्यापाड्यात आजही सुरु आहे. काही ठिकाणी तर अशा प्रकारच्या अंधश्रद्धेने काही लोकं आपली स्वतःची लेकरंही बळी देत असतात.

महत्वाचं म्हणजे जीवनात संकटे येणारच. काही संकटं ही तीव्रतेनं येतात. तर काही संकटांची तीव्रता कमी असते. याचाच फायदा घेत मांत्रीक मंडळी अशा जादूटोण्याच्या दहशतीतून लोकांना लुट लुट लुटत असतात. ते लोकांकडून काही पैसे घेवून भूतबाधेला दूर करण्याच्या गोष्टी करीत असतात.

मंत्रविद्येला रोगांचे निवारण करण्याचा उपाय मानणारे हे तांत्रीक लोकांना सांगत असतात की ही मंत्रविद्या जे आजार कधीच

बसत नाहीत. त्या आजारावर चांगली काम करु शकते. जे असाध्य रोग असतात. ते रोगही दूर होवू शकतात.

काही लोकं तंत्रविद्येच्या नावानं भयंकर भीती बाळगत असतात. कारण ते भीती दाखवत असतात. ते म्हणत असतात की की तुम्हाला भूत झोंबेल. भुतबाधा होईल. अशी भुतबाधा होवू नये म्हणून तुम्ही आपल्या घराची सुरक्षा करुन घ्या. अर्थात सुरक्षाकवच लावून घ्या. त्यानंतर ते अशाच अंधश्रद्धेचा फायदा घेवून लोकांमध्ये एवढी भीती भरतात की आज अज्ञानीच नाही तर ज्ञानीही ह्या दहशतीत वावरत असतो.

ज्याप्रमाणे लोकं देव आहे असे मानतात. त्याचप्रमाणे काही लोकं भूत आहे असंही मानत असतात. शहरी भागात भूत मानण्याचं प्रमाण कमी असलं तरी गावाखेड्यात भूत मानण्याचं प्रमाण जास्त आहे. भूतांची भीती दाखवणे ही गोष्ट व्यापार करण्याची असून खेड्यातील हेच मांत्रीक भूताची भीती दाखवून लोकांकडून या भूतांना वश करण्यासाठी वा काढून देण्यासाठी पैसा उकळत असतात. असा पैसा उकळतांना ही तांत्रीक मंडळी काहीतरी मंत्राचा वापर करीत असतात. त्यानुसार एखाद्या दगडाच्या देवाची पुजा करुन त्या दगडावर कोंबडा बकरा बळी देण्याची प्रथाही खेड्यापाड्यात आजही सुरु आहे. काही ठिकाणी

तर अशा प्रकारच्या अंधश्रद्धेने काही लोकं आपली स्वतःची लेकरंही बळी देत असतात.

महत्वाचं म्हणजे जीवनात संकटे येणारच. काही संकटं ही तीव्रतेनं येतात. तर काही संकटांची तीव्रता कमी असते. याचाच फायदा घेत मांत्रीक मंडळी अशा जादूटोण्याच्या दहशतीतून लोकांना लुट लुट लुटत असतात. ते लोकांकडून काही पैसे घेवून भूतबाधेला दूर करण्याच्या गोष्टी करीत असतात.

मंत्रविद्येला रोगांचे निवारण करण्याचा उपाय मानणारे हे तांत्रीक लोकांना सांगत असतात की ही मंत्रविद्या जे आजार कधीच बसत नाहीत. त्या आजारावर चांगली काम करु शकते. जे असाध्य रोग असतात. ते रोगही दूर होवू शकतात.

खरं सांगायचं म्हणजे तंत्रविद्या ही मनातील भीती आहे. ज्यावेळी आपलं मन एखाद्या घटनेनंतर दहशतीत येतं. त्यावेळी आपल्या शरीरातील जनुकीय ताकद नष्ट होते व आपण रोगाला बळी पडतो. परंतू जर आपण ठरवलं की मला यामुळं काहीच होणार नाही, तर काहीच होत नाही. कारण काहीच होणार नाही म्हटल्यावर आपल्याला त्यांच्याशी लढण्याची शक्ती निर्माण होते व आपण त्या निर्माण झालेल्या शक्तीने त्या तंत्रशक्तीशीही सामना घेवू शकतो.

हे तांत्रीक ज्यावेळी सामान्य माणसाच्या संपर्कात येतात. तेव्हा आपला सहज विश्वास बसेल असेच बरळत असतात. त्यांचे नेहमीचे शब्द असतात. तू अभी बच्चा है।तू तंत्र क्या होता है, जानता नही है।' या वाक्यावर आपल्याला असं वाटत असते की आपल्याला काही होणार तर नाही. याचदृष्टीनं आपण त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांचे आधिनस्थ होत असतो.

आज वर्तमानपत्रात कधीकधी जर पाहिलं तर अशा तंत्रावरुन वाद होवून काही हत्या झाल्या. काही ठिकाणी गुप्त धनासाठी नरबळी दिला असं लिहून येतं. ही नरबळी घेण्याची प्रथा ही काही नवखी नाही. आज देशातील काही माणसं सुधारली असली तरी अशी तंत्र मंत्र मानणारी पीढी अजूनही अस्तित्वात आहे. अजुनही भूत आणि देव अस्तित्वात नसला तरी मानणे सुरु आहे. लोकं ज्याप्रमाणे देवाला मानतात, त्याप्रमाणे भुतालाही मानणे सुरु झाले आहे. भूत शक्ती आज अस्तित्वात नसली तरी आजही काही लोकं विशेषतः ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी स्मशानी वाटेतून जात नाहीत.

महत्वाचं म्हणजे कोणीही तंत्रविद्या मानू नये. नरबळीवर विश्वास ठेवू नये. तसेच गुप्त धन मिळेल या आशेनं नरबळी देवू नये. कारण त्यातून गुप्त धन तर मिळणार नाही. पण आपल्या हातून एक

नक्कीच पाप होईल. कोणाच्या घरचा विनाकारण जीव मारल्या जाईल. कदाचित तो आपलाही मुलगा असेल.

हिंदू धर्मात तसेच मुसलमान धर्मात हजारोच्या संख्येत हजारो वर्षापासून अशा तंत्रविद्या अस्तित्वात आहेत. कित्येक पुराणात अशा तंत्र मंत्र विद्यांचे वर्णन आहेत. साधनेतून सिद्ध्या प्राप्त होतात तसेच सांसरीक लाभही प्राप्त होते अशा व्यवहाराने या तांत्रीक विद्या व मांत्रीक विद्या आजपर्यंत आणि आजही चालत आहेत. पाश्चात्य लोकं आले. तसेच समाज शिकला. तरीही तंत्र आणि मंत्र विद्या आजही सुरु असलेल्या दिसतात.

या तंत्र मंत्र साधना. या साधना चार प्रकारच्या असतात. १)योग साधना २)तंत्र साधना ३)मंत्र साधना ४)यंत्र साधना

यापैकी तंत्रविद्या ही शक्ती अधिक प्रभावी असते असं तांत्रीक मंडळी सांगतात.

तंत्र शक्तीचा संबंध शरीराशी येवून तंत्र शक्तीच्या साहाय्याने साधक आपल्या पुर्ण शरीरावर ताबा मिळवतो. यात अंगात येणे अशा प्रकारचा योग असतो. तर मंत्राचा संबंध मनाशी जुळवून जे मानसीक रोगी असतात. ते या व्यवस्थेचे बळी मानले जातात.

तंत्र साहाय्यानं साधना करणारा तांत्रीक मांस, मदिराचं सेवन करतात तर मंत्रशक्तीचा वापर करणारा साधक मांस मदिरा सेवन करीत नाही असं मानलं जातं.

तंत्रविद्यामध्ये वशीकरण, संमोहन याचा समावेश होत असून ह्या तंत्राच्या साहाय्यानं माणसाचे पशु पक्षी बनवणे, माणसाला अदृश्य करणे, एकाचवेळी पाच रुप बदलविणे, शेकडो मीलावरील व्यक्तीला अगदी जवळून पाहणे. मेलेल्या माणसांशी बोलणे ह्या गोष्टी केल्या जातात. तंत्राचा संबंध हा चमत्काराशी लावला असला तरी आज असे चमत्कार होत नसल्यानं तंत्र साधना मागे पडलेली आहे.

*************************

उधमपूर नावाचं ते गाव. गाव असं भुतानं ग्रासलेलं होतं. त्या गावात दरपंधरादिवसाला कोणत्या ना कोणत्या कारणावरुन एक माणूस मरण पावत असे. त्या माणसं मरण्याचा दिवसही ठरला होता. ती कधी अमावस्या राहायची तर कधी पौर्णिमा असायची. असाच दिवस ठरलेला असल्यानं लोकं गावात भुतबाधा झाली असं मानत असत. तसं पाहता त्यांचं माणणंही बरोबर होतं.

अशाच या गावात एक दिलजीत नावाचा लहान मुलगा राहात होता. त्याला ते बरोबर वाटत नव्हतं. तरीपण ते तो सगळं सहन करीत होता.

गावात ज्यावेळी कोणी मरण पावायचं. तेव्हा मात्र सर्वजण घाबरलेले असायचे. आयाबाया तर रात्रीला गावातल्या त्या मैयतीला पाहून एवढ्या घाबरलेल्या असायची की त्या कधीच रात्रीला बाहेर पडायच्या नाहीत. माणूस मरतो. मग त्याची आत्मा अनंतात जाते. ते शरीर अग्नीच्या स्वाधीन जरी झालं तरी ती आत्मा मरत नाही असंही ते गाव मानत होतं. ज्या लोकांची इच्छा जीवंतपणी पूर्ण होत नाही. ती माणसं मरण पावली तरी त्यांची आत्मा मरत नसून ती झोंबत फिरते असं या गावातील लोकांचं मानणं होतं. तशी ती आत्मा लोकांच्या अंगात येत असे. ही असंतुष्ट आत्मा कधी लोकांच्या अंगात शिरुन तांडव करीत असे.

गावात एक शामकांत नावाचा एक माणूस होता. तो मांत्रीक आहे असे लोकं मानत होते. हा मांत्रीक अशा मृत शरीराला उठवून त्या शरीराची असंतुष्ट आत्मा ह्या लोकांच्या शरीरात टाकतात असं गाव मानत होतं. ज्या लोकांच्या अंगात अशा आत्मा येत असत. त्या आत्मा चक्क त्याचं नाव सांगायच्या. पण त्याच्या वाटेला जाण्याची कुणाची हिंमत होत नव्हती. कारण जो कोणी त्याच्या

वाट्याला जात असे. त्याला तो शामकांत सोडत नाही असे लोक मानत होते. त्यामुळे लोकं त्याच्यापासून फटकून वागत असत. असं ते गाव. अख्खं गावंच भुताटकीनं शहारलं असल्याची वार्ता परीसरात पसरली होती.

दिलजीत लहान मुलगा. त्याच्या मायबापाला वाटायचं की आपला दिलजीत शिकायला हवा. तो शिकून मोठा व्हायला हवा. नव्हे तर त्यानं डॉक्टर बनावं. तसेच डॉक्टर बनून त्यानं लोकांची सेवा करावी. लोकांची अशा प्रकारच्या कर्मकांडापासून मुक्तता करावी असं दिलजीतच्या मायबापाला वाटत होतं. तर दिलजीतला स्वतः वाटायचं की आपण मंत्रविद्या शिकावी. त्या मंत्राच्या माध्यमातून लोकांची सेवा करावी. कारण या मांत्रीकपणाचा आव गावात तो एकच मांत्रीक असल्यानं तो गावातील या रुग्णांवर उपचार करतांना भरपूर पैसा उकळत असे.

दिलजीत बापाला न सांगता अशाच या एका बाहेरगावच्या मांत्रीकाकडून अशी तांत्रीक विद्या शिकत होता. पण हे जेव्हा बापाला माहित झाले. तेव्हा मात्र बापाला राग आला व बापानं त्याला घरातून हाकलून दिलं.

************************

भूत म्हणजे मृत व्यक्तीचा अतृप्त आत्मा. हा कोणतेही रूप धारण करू शकतो, मनोवेगाने हालचाल करू शकतो व अतृप्त इच्छा पूर्ण झाल्यावर मुक्ती पावतो, असा समज आहे. भूत झालेले काही अतृप्त आत्मे सज्जन असतात तर काही वाईट. असे म्हणतात की बहुतेक भुतांना भांग, दारू, बाजरीची भाकरी, भात, नारळ, लसणाची चटणी, तेल, फुले, लाह्या वगैरे देऊन संतुष्ट ठेवता येते. स्त्री भुते वेतांचे फटके मारल्यावर लगेच वठणीवर येतात. स्त्री भुते प्रामुख्याने दागिन्याने मढलेल्या, फुलांनी नटलेल्या, फुले माळलेल्या, बाहेर बसलेल्या, तरुण माता आणि त्यांच्या मुलांना झपाटतात.

या भुतांच्या निवासाच्या जागा, या त्यांच्या जातींप्रमाणे जिथे तीन रस्ते एकत्र येतात, तशा ठिकाणी आपापली स्मशाने, पडक्या विहिरी, पडके वाडे, पडकी घरे, जुने वृक्ष, देवराया, बुरूज, जंगले, पाणवठे, धरणाच्या भिंती, गावांच्या वेशी, वा नदीचे किंवा डोंगरवाटेचे घाट आहेत. त्या ठिकाणी निवास करतात. मुंजे, समंध हे प्रामुख्याने पिंपळ, वड, उंबर अशा झाडांवर वास करतात. अशी झाडे उपलब्ध नसतील तर गोड, सुगंध देणाऱ्या झाडांवर वास करतात असे समजले जाते.

भुतांना स्वच्छतेची भीती वाटते. त्यामुळे जिथे स्वच्छता असते तिथे साधारणपणे भुतांची भीती कमी असते. म्हणून जी माणसं भूत मानतात, ते जागा स्वच्छ ठेवतात.

भुतांच्या काही जाती आहेत.

१) संवादात्मक व्यक्तिमत्व प्रकार -

ही भूतामध्ये आढळणारी अत्यंत सर्वसामान्य जात आहे. हे नाव जर्मन शब्दातून तयार झाले आहे ज्याचा अर्थ ' गोंगाट करणारे भूत'. वस्तू हलवणे, ठक ठक आवाज करणे, वस्तूंची फेकाफेक करणे असे पोरकट प्रकार ही भुते विशेषत: करतात. साधारणपणे अहिंसक असलेल्या ह्या भुतांनी लोकांना काही वेळा धक्का देखील मारला आहे आणि आग देखील लावली आहे. जी व्यक्ती त्यांना आवडते. यामुळेच जागा बदलली तरी ही भुते त्या व्यक्तीच्या मागावर असतात. काहींच्या मते अशा व्यक्ती स्वत:च आपल्या चेतनात्मक प्रतिभेच्या माध्यमातून असे प्रकार घडवून आणतात.

२ स्पष्ट झलक

अंकित होणारी भुते गैर परस्पर संवादात्मक व्यक्तिमत्व श्रेणीत मोडतात. कारण त्यांची रूपरेखा किंवा हालचाली मानवीय असतात. परंतू आपल्या परिस्थिती बाबत ते संपूर्णपणे अज्ञभिज्ञ असतात. आणखी एक गोष्ट जी या प्रकारच्या भूतांना परस्पर

संवादात्मक भूतापेक्षा निराळी बनवते. ती म्हणजे यांना एकच गोष्ट पुन्हा पुन्हा करण्याची सवय असते. एकाच गल्लीतून एकसारखे बाहेर निघणे किंवा एकाच खिडकीतून पुन्हा पुन्हा वाकून पाहणे अशा प्रकारच्या गोष्टी त्यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिक असतात. दर्शक अशा व्यक्तीमत्त्वाशी संपर्क करू शकत नाहीत आणि ही भुतं पुन्हा पुन्हा करत असलेली गोष्ट थांबवू शकत नाहीत.

काही लोक असा दावा करतात की ही खरोखरची भुतं नाहीतच, परंतू एखादी व्यक्ती जी इकडे राहत असे आणि त्याची रोजच्या दिनक्रमातील एखाद्या हालचालीचे एक प्रेतात्मवादी प्रतीक आहे. हे प्रतीक एखाद्या वातावरणात कैद असते आणि काही विशिष्ट परिस्थितीमध्ये अडकल्यामुळे किंवा लोकांनी पाहावी म्हणून पुन्हा पुन्हा समोर आणले जाते.

३) जीवंत व्यक्तीचे भूत. एक जीवंत भूत.

आश्चर्यकारक गोष्ट आहे पण ती सत्य आहे आणि अशी भुते अनेक वेळा दिसून येतात. एक जीवंत भूत अशा एक व्यक्तीचे प्रतिरूप असते. जी दर्शनाच्या वेळी जैविक तत्त्वावर कुठेतरी दुसरीकडे उपस्थित असते. साधारणपणे हे भूत जीवंत माणसाच्या ओळखीतले असते. अशी जी व्यक्ती असे भूत पाहते ती साधारणपणे त्या वेळी एखाद्या संकटात असते आणि आपल्या

प्रिय व्यक्तीला धोक्याची सूचना देण्यासाठी आणि त्यापासून सावध करण्यासाठी आलेली असते. अशी दृश्य एकदाच पाहायला मिळतात. कारण पुन्हा पुन्हा संकटे येत नाही त्यामुळे अशा घटनांचे विश्लेषण करणे अवघड असते. आणखी एक जीवंत व्यक्तीच्या भुताचे उदाहरण आहे मरणाच्या वेळी त्याचे दिसणे. ती व्यक्ती तांत्रिक तत्त्वावर त्यावेळी दर्शनासाठी जीवंत होते पण अशा वेळीस दृष्टीस पडते, जेव्हा दर्शकासाठी त्याचा काहीही संदेश नसतो आणि तो पूर्णपणे मरणार असते. अशा वेळेस ती व्यक्ती एखाद्या दुसऱ्या जागी असते त्यामुळे दर्शक त्याला पाहुन संभ्रमात पडतो. परंतु जेव्हा मरणाची बातमी ऐकू येते. तेव्हा दर्शकाने त्याला पाहिल्याचे समजते. ही व्यक्तिमत्त्व कुटुंबातील असतात आणि जवळच्या नातेवाईकांनाच दृष्टीस पडतात. असे दर्शन दुर्लभ असते आणि त्याचे विश्लेषण करणे दर्शकाच्या साक्षी व्यतिरिक्त परीलेख करणे अवघड असते. कारण यांची भविष्यवाणी करणे अवघड असते आणि या घटना पुन्हा पुन्हा घडत नाहीत.

४) अमानवी भूतं

वरील व्यक्तिमत्त्वाशी निगडीत भुतांच्या व्यतिरिक्त अमानवी भूतं एखाद्या दुसऱ्या घरातील व्यक्तीप्रमाणे नेहमीच दुसऱ्या दुनियेतील लोकांच्या आत्म्याच्या रुपात जन्माला येतात. ती भुतं

बुद्धिमान असतात आणि एकमेकांशी संवाद देखील साधू शकतात. ते मानवांप्रमाणे वेळ, अंतराळ आणि नैतिकता अशा बंधनात अडकलेले नसतात. त्याचे ज्ञान जुन्या काळाशी निगडीत असते आणि ते एखाद्या दुसऱ्या काळातून आपल्या काळात प्रवेश करतात. अशी भुतं दर्शकाशी एखाद्या देवदूता प्रमाणे काही शिकवण्याच्या हेतूने संवाद करतात. अनेकदा हे जमिनीवर राहतात आणि दिसत नाहीत. काहींचे हेतू चांगले असतात तर यातील काही भुतं दुष्ट सुद्धा असू शकतात.

५) अनेकपतिका- ही भूतामध्ये आढळणारी अत्यंत सर्वसामान्य जात आहे. हे नाव जर्मन शब्दातून तयार झाले आहे ज्याचा अर्थ ' गोंगाट करणारे भूत'. वस्तू हलवणे, ठक ठक आवाज करणे, वस्तूंची फेकाफेक करणे असे पोरकट प्रकार ही भुतं विशेषत: करतात. साधारणपणे अहिंसक असलेली हि भुते लोकांना काही वेळा धक्का देखील मारला आहे आणि आग देखील लावली आहे. अनेकपतिका एकाच व्यक्तीशी संलग्न असतात जी व्यक्ती त्यांना आवडते. यामुळेच जागा बदलली तरी ही भुते त्या व्यक्तीच्या मागावर असतात. काहींच्या मते अशा व्यक्ती स्वत:च आपल्या चेतानात्मक प्रतिभेच्या माध्यमातून असे प्रकार घडवून आणतात.

************************

प्रकाशग्रह प्रकाशाचे एक प्रतिबिंब असते. जे कोणत्याही मूळ स्त्रोताच्या अस्तित्वाशिवाय फोटोमध्ये दिसून येते. जास्त करून ते पांढरे किंवा निळे असतात आणि एक किंवा एकाहून अधिक सुद्धा असू शकतात. जर त्यांचा व्हिडीओ बनवला तर त्यांच्या हालचाली टिपता येतात. काही शोधकर्ता यांना जुन्या काळातील अध्यात्मिक उर्जा मानतात. काही म्हणतात की हे प्रकाशग्रह हवेत मिसळलेले कान आहेत जे कॅमेऱ्याच्या प्रकाशात चमकतात आणि दिसतात. पण या स्पष्टीकरणावरून हे नाही सांगता येत की असे प्रकाशग्रह प्रत्येक फोटोत का दिसत नाहीत. जर ही गोष्ट खरी असती तर कॅमेऱ्यात त्यावेळी काढलेल्या प्रत्येक फोटोत प्रकाशग्रह दिसले असते. चक्र किंवा प्रकाशाचे ढग काही फोटोमध्ये दिसून येतात. अस्पष्ट दिसणाऱ्या छोट्या आकारापासून मोठ्या पारदर्शी आकारापर्यंत या चक्रांना अ◌ाध्यात्मीक उर्जेचे स्त्रोत मानले जाते. जसे श्वासातून प्रकाश दिसणे किंवा लेन्स समोर सिगरेटचा धूर दिसणे किंवा केस या सर्व फोटोतील गोष्टी इतर कोणत्यातरी वस्तूचे अस्तित्व दर्शवतात. परंतु फोटोत दिसून येणारी चक्राची हे उदाहरणे सहजपणे स्पष्ट करता येत नाहीत.

सर्वात आश्चर्यकारक असते फोटोत संपूर्ण शरीर दिसणे. या दुर्लभ फोटोंमध्ये ओळखीचे लोक किंवा प्राणी दिसून येतात. मित्र आणि नातेवाईक असे फोटो पाहून लोकांना सहज ओळखू शकतात. पूर्ण शरीर सामान्यपणे नकळतपणे फोटोत पृष्ठभूमीवर दिसून येतात. काही वेळा ती इतकी स्पष्ट दिसतात की असे वाटते की फोटो काढणाऱ्या माणसाशी काही संवाद करत आहेत असे वाटते. असे वाटते की ते फोटोत पोज देत आहेत, जणू काही ते ही गोष्ट मान्य करत नाहीत की त्यांचा मृत्यू झाला आहे आणि तीच कामे ते करायचा प्रयत्न करतात जी ते मृत्युपूर्वी करत असत. अनेकदा अशी उदाहरणे पहिली गेली आहेत ज्यात एखादा मृत सैनिक किंवा वायुसैनिक आपल्या जीवंत साथीदारांसोबत आकृती स्वरुपात दिसून आला आहे आणि युद्धाच्या वेळी आपल्या मित्रांशी तयार झालेले संबध ते संपवू इच्छित नाहीत. काही वेळा अशी उदाहरणे पाहण्यात आली आहेत ज्यात ही भुतं कॅमेऱ्यात त्यांच्या नकळत कैद झाली आहेत आणि आपली दैनिक कामे करत आहेत. अशावेळी प्रश्न पडतो की भुताला आपला व्हिडीओ केला जातोय हे ठाऊक होते की ठाऊक असूनही नसल्यासारखे ते आपल्याला दाखवत आहे. साधारणपणे असेच वाटते की भूतांना माहित असते की त्यांचा फोटो काढला जातोय परंतू हे निश्चित सांगू शकत नाही. असे किमान एक डझन फोटो उपलब्ध आहेत आणि

या अलौकिक अनुभवाचा सबळ पुरावा आहे. परंतु जसे मी आधी सांगितले की भुतांच्या असण्याचे काही प्रमाण नाही कारण फोटोंमध्ये एडिटिंग सुद्धा करता येऊ शकते. त्यामुळे हे स्पष्ट होते कि आधुनिक तंत्रज्ञानामुळे कितीही भुते फोटोत दिसली तरी पुरेशा पुराव्या अभावी त्यांचे आस्तित्व संशयास्पद राहील. एक दिवस जिन्यावरून उतरणाऱ्या भुताचा स्पष्ट फोटो लोक गांभीर्याने घेणार नाहीत. कारण वैद्यानिक दृष्ट्या पुरावा कितीही विश्वसनीय असो जर तो रेकोर्ड किंवा टेप वर असेल तर लोक नेहमीच त्याच्यावर शंका उत्पन्न करत राहतील.

मनुष्यप्राण्याच्या सामाजिक कळपांनी आपल्याभोवती धर्मांच्या कुप्या करून घेतल्या. त्यानुसार त्यांची स्वत:ची विश्वं निर्माण झाली. त्यांचा ईश्वर, सुष्ट-दुष्ट शक्ती, आत्मे-परमात्मे, पाप-पुण्य यांच्या त्यांच्यापुरत्या चकाऱ्या निर्माण झाल्या. मग त्यांच्या विश्वात जे काही अनुकूल होतं, त्यातूनच प्रतिकूलसुद्धा निर्माण झालं. निर्मिकाला छेद देणाऱ्या शक्ती सातत्याने जवळपास वावरत असल्याने आभासी जग लोकमान्य झाले. त्यात शेवटचा स्तर म्हणजे, भुतं आणि पिशाच्च. भुतांची निर्मिती त्याच कुपीतली असल्याने त्या त्या समाजातील भुतं जरी मानवी सामाजिक नियमांना छेद देणारी वाटत असली, तरी ती जीवंत असलेल्यांच्या अंतर्मनातील असल्याने, त्यांचे वर्गीकरण जीवंत माणसांनी

आपल्या सोयीप्रमाणे केल्याचे आढळते. मराठी मुलखासही हाच नियम लागू पडतो. कोकणात जीतकं भूतवैभव आहे, तितकं ते घाटावर नाही. गाव लहान असो की मोठा, जो माणूस ज्या वर्णात जन्मतो, मरतो, तो जाळला किंवा पुरला जातो, तो त्याच्या समाजाच्या मसणवाट्यातच. त्याचप्रमाणे मरणाऱ्या माणसाचा आत्मा काही कारणाने पृथ्वीतलावरून मुक्त झाला नाही, तर त्याची वर्तणूक जीवंत माणसांना त्रास देणारी असली, तरी ती त्याच्या सामाजिक पायरीनिहाय असते. म्हसोबा, वेताळ हे भुतांचे नियंत्रक देव असल्याने, त्यांना भूतयोनीत गृहीत धरता येत नाही. पण कुणाचे अतृप्त आत्मे कोणत्या भूतप्रकारात मोडतात, याचे विश्लेषण बघायला हवे. भुतांमध्येसुद्धा काही कल्याणकारी असतात, तर काही सातत्याने उपद्रवमूल्य बाळगणारी असतात, तर काही इच्छापूर्तीनंतर स्वर्गस्थ होणारी असतात. या भुतांच्या निवासाच्या जागा, या त्यांच्या जातींप्रमाणे तिकाटण्यावर, जिथे तीन रस्ते एकत्र येतात, त्या ठिकाणी आपापली स्मशाने, पडक्या विहिरी, पडके वाडे, पडकी घरे, जुने वृक्ष, देवराया, बुरूज, जंगलं, पाणवठे, धरणाच्या भिंती, गावांच्या वेशी, शिवा, घाटावर राणगा, हाडळ, चिंद, गिऱ्हा, क्वचित झोटिंग आणि नेहमीची गावाच्या आसपासची लोकल भुतं सोडली, तर जास्त भूतवैभव नाही. पण कोकणात मात्र भुतांचे अनेक प्रकार आढळतात. त्यात शूद्रातील

आत्म्यांची भुतं म्हणजे देवाचार, चेटक, छेडा, तलखांब, लग्न झाल्यानंतर अल्पावधीत जो शूद्र मरतो, तो ‘देवाचार’ होतो. देवाचार भूत गावकुसाबाहेर चारीदिशेला राहतं. अविवाहित महाराचे भूत म्हणजे छेडा. छेडा मुख्यत्वे वेशीवर राहात असे. शूद्रांची अर्थात महारा-मातंगांची भुतं वर्षातून एकदा नारळ, केळी, साखर, कोंबड्यांचा किंवा बोकडाचा बळी दिल्यावर त्रास देत नसत. कधी कधी ही भुतं होळीवर, डोंगरात किंवा जंगलात वावरत असत. कुणब्याचं एखाद-दुसरं भूत असेल, तर ते ‘दाव’ म्हणून ओळखत. खविस हे भूत दोन-तीन प्रकारचे आहे. खविस जसे महारा-मातंगांचे असते, तसेच ते ॲबिसियन लोकांचेपण असे. हबशी किंवा सिद्दी जे कोकणात स्थायिक झाले, त्यांची भुतं पण चौदाव्या-पंधराव्या शतकापासून कोकणात दिसायला लागली. ‘स्वाहिली’मध्ये कृष्णवर्णीयांच्या भुतांना काय म्हणतात, हे माहीत नसल्याने त्यांचे नामकरण ‘खविस’ असे केले असावे. तेच झोटिंग या भुताचे झाले असावे. खारवी किंवा कोळ्यांच्या भुतांना झोटिंग म्हणतात. नंतर या श्रेणीत मुसलमानांच्या भुतांची भर पडली. झोटिंगांमधील मुसलमानांचे आणि खविसातील हबश्यांचे अर्थात, अहिंदू भुतांची बाधा दूर करणे, हे हिंदू देवऋषांच्या आवाक्यात नसते, अशी धारणा आहे. अविवाहित शूद्र पुरुष मेल्यावर, त्याचा ‘तलखांब’ व्हायचा म्हणे. गिऱ्हा हे भूत कोकणाप्रमाणे घाटावरही

नाव कमावून आहे. ते पाणवठ्यावर राहात असे आणि माणसाला पाण्यात ओढून नेत असे. त्याची नाना प्रकारची चेष्टा करीत असे. त्याला विदर्भात पाणबुड्या म्हणतात. 'काय गिऱ्हा लागलाय मागे?' हा वाक्प्रचार या गिऱ्हामुळेच रूढ झाला असावा. 'वीर' श्रेणीतील भुते, ही अविवाहित क्षत्रियांची असत. कधी ती अ-मराठी किंवा परप्रांतीय क्षत्रियांची असत. समंध ही दोन प्रकारची भुतं असतात. पहिल्या प्रकारातील समंध हा संतती न झाल्यामुळे, आणि उत्तरक्रिया न केल्यामुळे होतो. त्याच्या नात्यातल्यांनीच त्याची इच्छा पूर्ण केल्यावर तो शांत होतो आणि आप्तांना मदतसुद्धा करतो. दुसऱ्या प्रकारातील समंध हा जीवंतपणी लोभी आणि इच्छापूर्ती न झालेला संन्यासी असतो. समंध झाल्यावर, तो पैसेवाल्यांना संपत्तीचा उपभोग घेऊ देत नाही. कालकायकांची भुतं ही भैरवाच्या अंकित असल्याने, ती जास्त त्रास देत नाहीत. त्यांना तृप्त केल्यावर ती प्रसन्न होतात. त्यांची कृपा लाभलेला माणूस बारा वर्षे आनंदी व आरोग्यदायी जीवन जगतो. त्यानंतर त्याचा नाश होतो. याशिवाय हिरवा, वाघोबा, आसरा, गानगूड, सैतान, चैतनद्य, पीस अशीही काही भुतं आहेत. त्यांना भांग, दारू, बाजरीची भाकरी, भात, नारळ, लसणाची चटणी, तेल, फुलं, लाह्या वगैरे देऊन संतुष्ट ठेवता येते.

मुंज झाल्यानंतर सोडमुंज होण्याअगोदर एखादा मुलगा मरण पावल्यावर तो मुंज्या होतो. त्याचा आत्मा पिंपळावर किंवा विहिरीत वास करतो. उपनयन संस्कार त्रैवर्णिकात होत असल्याने ब्राह्मणेतर दोन वर्णांमधील मुंजे असतील काय? वेदविद्यासंपन्न, पण ज्ञानाचा गर्व असलेल्या ब्राह्मणाचा आत्मा भूत होतो. अशा भुतांस 'ब्रह्मग्रह' म्हणतात. तर ब्रह्मराक्षस हे पिंपळावर राहणारे सर्व भुतांमध्ये शक्तिशाली भूत असते. याच्या कचाट्यात कुणी सापडला, तर तो सुटणे अशक्य असते. तर वेदपारंगत ब्राह्मणाच्या भुताला 'महापुरुष भूत' म्हणतात. ब्राह्मणांचा द्वेष करणारे, त्यांच्या कर्तव्यास हीन लेखणारे, त्यांची चेष्टा करणारे 'ब्रह्मसमंध' या भूतयोनीत जातात. मुंजे, समंध हे प्रामुख्याने पिंपळ, वड, उंबर अशा झाडांवर वास करतात. अशी झाडे उपलब्ध नसतील तर गोड, सुगंध देणाऱ्या झाडांवर वास करतात.

स्त्रियांच्या भुतांची वर्गवारी वयनिहाय आहे. जसे अविवाहिता 'शाखिणी' होते. विधवा 'लावसट' वा 'अवगत' होते आणि या आवळा किंवा नागचाफ्यावर वास करतात. सवाष्ण मेल्यावर 'जखीण' होते. बाळंत होताना मृत्यू आल्यास 'अलवंत'. बाळंत होऊन दहा दिवसांच्या आत मृत्यू आल्यास 'हडळ'. तिला हेडळी, डाकण, सटवी असेही म्हणत. स्त्री भुते वेतांचे फटके मारल्यावर लगेच वठणीवर येतात. स्त्री भुतं प्रामुख्याने दागिन्याने

मढलेल्या, फुलांनी नटलेल्या, फुले माळलेल्या, बाहेर बसलेल्या, तरुण माता आणि त्यांच्या मुलांना झपाटतात. घाटावर चिंद हे भूत महिलेच्या पोटी जन्म घेऊन तिच्या वाट्याचे अन्न खाते, असे म्हणतात. तर मनघाल्या (चकवा) हा अनेक गावांच्या शिवांवर राहतो, आणि रात्रीच्या वेळी वाटसरूंना एका ठिकाणी फिरवतो. विशेष म्हणजे, 'झोड' नामक पण एक भूत असते. बिनलग्नाचे कुणी मृत्यू पावले, तर त्याच्या आत्म्याला मुक्ती मिळत नाही. म्हणून हिंदू धर्मियांमध्ये लवकर लग्न करण्याची प्रथा असावी. या मान्यतेप्रमाणे जीवंतपणी ज्यांच्या इच्छा पूर्ण होत नाहीत, अशांचे आत्म्ये त्यांच्याच लोकांच्या आसपास घुटमळत राहतात. असे आत्मे आपल्या जिवंतपणी आपल्या इच्छा का बरे मारत असावेत? बरं, त्यांच्या इच्छा कोणत्या? तर दारू, गांजा, भांग, अफू, विडी, अंडी, कोंबडी, भजे, भात, नारळ, केळी, बोकड यांसारख्या किरकोळ. बरं जीवंतपणी त्यांनी ज्यांची काळजी घेतली त्यांना ते मेल्यावर का बरं त्रास देत असावेत? जसा एखादा सभ्य माणूस दारू प्याल्यावर बरळतो.

भुतांबद्दलच्या संकल्पना काळानुरूप बदलत गेल्या असल्या तरी जनमानसांतील त्यांच्याबद्दलच्या भीतीत कसलाही फरक पडलेला नाही. ज्या काळचा माणूस तशीच भुतेही वागतात. इच्छातृप्तीसाठी आपल्या जवळच्याच माणसास धरतात.

कोकणात भुतांचे काही खास प्रकार आहेत.

१) वेताळ: कोकणात वेताळाला भूतांचा राजा म्हणतात. कोकणातील पिशाच्च हे वेताळाच्या आधीन असतात. जो अंगातून भूत काढणाऱ्याच्या देहात प्रवेश करतो व त्याच्याकडून इतर त्रासदायक भूतांना पळवून लावतो.

२) ब्रम्हग्रह / ब्रम्हराक्षस: हे भूत ब्राम्हणाचे मानले जाते. जो वेदात निपुण आहे. पण ज्याला त्याच्या बुध्दीचा गर्व झाला आणि त्यातच त्याचा अन्त झाला.

३) समंध: ज्याची इच्छा पूर्ण न होता जो मरतो तो समंध बनतो. हे भूत प्रमुख्याने गावाच्या वेशीवर जूनाट झाड किव्वा तीठा अशा ठिकाणी पकडते. हे एक संतान नसलेला(निर्वंशी) ज्याचे कोणी कार्य केलेले नसते त्यापैकी असते. कोकणात हे सर्वात ताकदवान भूत मानले जाते. याला जर कोणी देवथ्यानाच्या पुढे केले तर देवथ्यान देखील पुढे येत नाही.

४) देवचार: हे मागास वर्गीयांचे भूत आहे. जो लग्ना नंतर थोड्याच दिवसात मरतो. ही भूतं गावाच्या चारी बाजूला असतात. कोकणात यांना डावे अंग म्हटले जाते. कोकणी माणसांच्या गाऱ्हाण्यात यांचा प्रामुख्याने उल्लेख होतो. याची सहानुभूती मिळविण्यासाठी दरवर्षी याला नारळ, साखर, खोबरे द्यावे लागते.

५) मुंजा: हे ब्राम्हणांपैकी भूत असते. जो ब्राह्मण मुलगा मुंज झाल्यानंतर सोड मुंज होण्याआधीच मरतो हे त्याचे भूत असते. याचे मुख्य स्थान हे पिंपळाच्या झाडावर तसेच विहिरीवर असते. हे लोकांना छळत नाही पण घाबरवायचे काम करते. हे भुत जरी ब्राम्हणांचे असते असं कोकणात मानलं जात असलं तरी विदर्भात हे भुत इतर जातीमध्येही आढळून येते. लग्न होण्यापुर्वी उपवर असतांना ज्यांना मृत्यू येतो. त्याला सरळसरळ मुंज्या म्हटलं जातं.

६) खवीस: हा प्रकार मुस्लिमांमध्ये मोडतो. हे फार त्रासदायक भूत असते. ज्याला अतिशय क्रुर रीत्या मारले जाते. तो मेल्यानंतर खवीस होतो असा समज आहे.

७) गिर्या/गिऱ्हा किंवा पाणबुड्या: जो माणूस बुडून मेला किंवा ज्याचा पाण्यात खून झाला किंवा ज्याने पाण्यात आत्महत्या केली. हे त्याचे भूत असते. हे भूत पाण्याच्या आसऱ्याला राहते. हे फार त्रासदायक असे भूत असते. रात्रीच्या प्रहरात जर कोणी नदी किंवा खाडी पार करताना याच्या तावडीत आला तर ते त्याला खोल ठिकाणी घेऊन जाते. कोकणात रात्रीच्या वेळी जे कुर्ले, मुळे पकडायला जातात त्यांना हमखास या भूतांचा अनुभव आला असेल. कोकणात असे सांगीतले जाते की जो कोणी या भूताचे केस मिळवू शकला तर हे भूत त्याचा गुलाम बनतो. त्याला हवे ते आणून

देतो. तसे ते केस त्याला पुन्हा मिळाले तर तो त्या माणसावर हावी होतो अर्थात त्रास देत असतो.

८) चेटकीण: हे मागासर्गीयांचे भूत असते. याला कोकणात डाव असेही संबोधले जाते.

९ ) झोटिंग: हे भूत खारवी किंवा कोळी समाजातील भूतांमध्ये गणले जाते.

१०) वीर: हे भूत क्षत्रिय समाजाच्या व्यक्तीचे असते. जो लग्न न होता मरण पावतो. याला निमा असेही म्हटले जाते.

११) लावसट: ओली बाळंतीण मरण पावल्यास तिचे रुपांतर मृत्युनंतर लावसट मध्ये होते.

१२) खुन्या: हे अतिशय क्रूर असे भूत असते. हे हरिजन समाजातील भूत असते.

१३) बायंगी: हे भूत विकत घेता येते. या भुताला विदर्भात देवता देखील म्हणतात. रत्नागिरी, लांजा, गोळवशी किंवा मालवण चौक येथे सुमारे दहा हजार रुपयांना हे विकत मिळते. हे भूत मालकाची भरभराट करते आणि शत्रूला त्रास देते.

१४) चकवा: हे रात्री बेरात्री जंगलात किव्वा पायवाटेने जाणाऱ्या लोकांचा रस्ता चुकवीते. सकाळ झाल्याशिवाय योग्य रस्ता सापडत नाही.

हे सर्व कोकणातील प्रकार असले तरी यातील बरीचशी भुतं विदर्भातही आहेत. काहींचे नाव मात्र वेगळे आहे. विदर्भात पाणबुड्या, मुंज्या, खवीस, चेटकीन, लावळीण, देवता, हडळ, आंबागड्या, नक्टोबा, गिड्डोबा, चकवा असे काही भुतं आहेत. यापैकी काही भुतं हे त्रास न देता काही प्रमाणात मदत करीत असल्यानं विदर्भात त्यांना देवही म्हटलं जातं.

************************

भुत कसे निर्माण होतात? ते खरंच निर्माण होतात की नाही? ते दिसतात का? दिसतात तर केव्हा? कसे दिसतात? अन् नेमके ते त्याचवेळी का दिसतात? वैगेरे प्रश्न प्रत्येकाला पडत असतात. याची उत्तरं आपल्याला न सापडत असल्यानं आपण घाबरत असतो आणि आपली ही भीती घालविण्यासाठी आपण तांत्रीक मांत्रीकांच्या आहारी जात असतो. ज्या तांत्रीक, मांत्रीकाजवळ एवढासाही मंत्र नसतो. ते आपल्याला भुलथापा देवून आपल्याकडून पैसे लुटत असतात. समजा खरा भुत अशा मांत्रीकासमोर आलाच तर अशी मंडळी त्याला पाहून पळ तर नक्कीच काढतील असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. तर आपण भुताचं अस्तित्व पाहूया.

१) *खरंच भुत असतात का?*

याबाबत विचार मांडतांना मी सांगेन की अशी भुतं नसतातच मुळात. परंतू त्या भुताचं अस्तित्व आपल्या मानसिकतेनुसार असतं. आपली मानसिकता जर भुत आहे अशी मानत असेल, तर भुत नक्कीच असतो आणि नाही मानत असेल, तर भुत नक्कीच नसतो. ज्याप्रमाणे आपण देव प्रत्यक्ष पाहिला नसतांनाही देव आहे असं मानून निव्वळ एखाद्या धोंड्याला देवाची उपाधी देवून देव मानतो. तसेच भुताचेही आहे. आपल्या मनात जी भीती जन्म घेते. ती भीती म्हणजेच भुत. ही भीती घालविण्यासाठी अशा देवाची आपण पुजा अर्चना करतो. कारण आपल्याला वाटते की असं भुताचं किंवा कोणत्या गोष्टीचं संकट आलंच तर आपल्याला वाचता येईल. मग त्या धोंड्यातील देवाची पुजा करताच आपल्याच शरीरातील आत्मीक बळ जागं होतं. तेच बळ काम करीत असतं व कार्य घडतं. ते कार्य संपन्न होताच ते कार्य देवानं केलं असं आपण म्हणतो. ज्याप्रमाणे आपली मानसिकता देव आहे असं सांगते. त्याचप्रमाणे आपली मानसिकता भुत आहे असंही सांगते. देव आणि भुत या एकमेकांच्या विरुद्ध बाजू असून त्या सर्व गोष्टी आपल्या मानण्यावर आहे. उदा. आपण जर एखाद्या वेळी एखाद्या सापाला पाहिल्यावर विचार केला की साप तिथेच आहे.

तर तो गेल्यावरही आपल्याला तसा दिसणारच. कारण भीती. तो साप गेलेलाही असेल तरीही. तेच भुताच्या बाबतीतही घडतं.

२) *भुत हे कसे दिसतात केव्हा दिसतात?*

भुत हे साधारणतः पांढरे कपडे घालतात. तसेच काहींना पाय असतात, पण ते उलटे असतात. काहींना पाय नसतात असं म्हटलं जातं. काहींना डोकंच नसतं. भुतं तसं पाहिल्यास वेगवेगळ्या प्रकारची असतात. पण त्या त्या भागानुसार त्या त्या भुतांना वेगवेगळी नावं आहेत. ती काम बहुतेक सारखी करीत असली तरी...

भुतं ही मुख्यतः रात्रीच दिसत असतात असंही काही लोकं म्हणतात. तसेच काही लोकं दिवसाही दिसतात असं मानतात. त्यांच्या दिसण्याची वेळ ही बारा ते तीन असून ज्याठिकाणी वर्दळ असते. त्या ठिकाणी ते निवास करतात असेही लोकं मानतात. मुख्यतः ज्या घरात कोणी राहात नाही अशा घरात ते निवास करीत असून त्या ठिकाणी त्यांना कायम स्वरुपी राहता यावं म्हणून ते त्या ठिकाणी राहायला जाणाऱ्याला त्रास देत असतात असंही भुताबद्दल सांगीतलं जातं.

३) *भुतं डोळ्यांना दिसतात का?*

भुतं हे काही लोकांना डोळ्यानं दिसतात. असंही मानलं जातं. तर काही लोकं ते प्रत्यक्ष डोळ्यानं दिसत नसून ते अदृश्य रुपात आपल्या अवतीभवती फिरत असतात असेही मानत असतात. काही म्हणतात की त्यांचा भाष झाला. तर लहानपणी मी एका व्यक्तीकडून ऐकले होते की त्याने भुतांशी कुस्तीही खेळली. परंतू या सर्व कल्पना असून भुतं अस्तित्वात नसून ते कुणालाही कधीही दिसत नाहीत.

४) *भुतं निर्माण होतात का?*

काही लोकं मानतात की भुत हे सतत निर्माण होत असतात. ज्यांची आत्मा त्याच्या जीवंतपणी तृप्त होत नाही. कुणाचा अकाली अपघात होतो. तर कुणी असंतुष्टानं आत्महत्या करतो. अशांच्या आत्मा ह्या भुतं म्हणून पृथ्वीवर सतत फिरत असतात. असंही काही लोकं मानतात. तर काही लोकं वाईट कृत्य करुन धन कमवतात. त्यांना वाटते की मला ते धन आयुष्यभर पुरावं. परंतू अशांना जेव्हा अकाली मरण येतं. तेव्हा अशांनी स्वार्थापोटी वाईट कृत्यानं कमविलेलं धन हे त्यालाच खायला न मिळाल्यानं अशी आत्मे भुत बनून त्या धनाभोवती फिरत असतात. त्यांना वाटत असते की हे धन मला उपयोगाचं झालं नाही. परंतू ते माझ्या मरणानंतर तरी कोणाच्या कामात यावं. परंतू जेव्हा तसं होत नाही. तेव्हा मात्र ही

मंडळी भुत बनून त्या धनाचं रक्षण करीत असतात. पण असं जरी असलं तरी आपण आज कित्येक प्राणीमात्रांचे बळी घेत असतो. त्यांचा वापर खाण्यासाठी करीत असतो. जर आपल्या माणसांची आत्मे भुत बनून जेव्हा छळायला लागते असे जेव्हा आपण मानतो. तेव्हा आपण हेही मानायला पाहिजे की अशा प्राणीमात्रांच्या दुखावलेल्या आत्म्याने आपल्याला छळायला हवं. पण तसं होत नाही.

५) *भुतांचं वशीकरण होतं का?*

भुताचं वशीकरण कोणत्याच मंत्रानं होत नाही. ते निव्वळ थोतांड गोष्ट आहे. कारण जिथे भुतंच नाहीत. तिथं वशीकरण येणार कुठून?तेव्हा अशा गोष्टी कोणीही मानण्याची गरज नाही.

६) *भुताचे काही प्रकार असतात का?*

भुताचे अनेक सारे प्रकार असले तरी मुख्यतः दोन प्रकार पडतात असे काही लोकं मानतात. अ)त्रास देणारा भुत. आ) मदत करणारा भुत. जिंदसारखे काही भुत हे मदत करणारे भुत आहेत. पण महत्वाचं म्हणजे जिथं भुतंच अस्तित्वात नाहीत. तिथे जिंद हा भुताचा प्रकार आला कुठून? तरीही आपण भुत मानत असतो.

महत्वाची गोष्ट अशी की लोकांच्या मानसिकतेनुसार भुताबद्दलच्या वेगवेगळ्या कल्पना लोकांनी मांडलेल्या असून

त्यावर लेखनही केलेले आहे. तसेच बरेचसे लेख सोशल मिडीयावरही आहेत. मुळतः भुत जरी नसले तरी जो त्याचं अस्तित्व मानतो. त्याच्या मानगुटीवर असा भुत बसल्याशिवाय राहात नाही. म्हणून कोणीही भुत मानू नये नव्हे तर त्याची कल्पनाही कोणी करु नये. हे तेवढंच खरं आहे.

*************************

दिलजीतला मायबापानं हाकलून दिलं. त्याचं कारणही तसंच होतं. दिलजीतनं मांत्रीकाच्या म्हणण्यानुसार एका बैलाची कवटी आपल्या हातात घालून घरी आणली होती. ते पाहताच दिलजीतच्या वडीलाला संताप आला व त्याची परियंती त्याला हाकलण्यात आली.

घरातून हाकलून दिल्यानंतर दिलजीत घरातून बाहेर पडला. तो रेल्वेस्टेशनवर आला. तसा तो रेल्वे मध्ये बसला. त्याच्याजवळ पैसे नसल्यानं त्यानं रेल्वेचं तिकीट काढलं नाही. परंतू टिटी येईल व आपल्याला पकडून घेवून जाईल ही भीती त्याच्या मनात होती. तसा तो विचार करु लागला.

दिलजीत लहान होता. सात आठ वर्षाचा. पण त्याला मोठ्या माणसाएवढी अक्कल होती. त्याला जसं वाटलं की टिटीया पकडून नेईल. तसा विचार करताच त्याला उपाय सुचला. तसा तो टिटीया येताच दिलजीत त्या रेल्वेगाडीच्या शौचालयाचा वापर करु लागला. अशाप्रकारे ज्या शेवटच्या ठिकाणी ती रेल्वेगाडी थांबली. तिथे तो उतरला.

तो नवीन प्रदेश. तिथं नवीन माणसं. माणसं महिलांच्या धाकात असलेली. शिक्षणाचा अजिबात गंध नव्हता. तिथं खायलाही अन्न नव्हतं. लोकं किड्या मुंग्याच खात होते.

मातृसत्ताक कुटूंबपद्धती असून तेथील माणसं पुरुषांची गुलाम होती. पुरुषांचं काम काबाडकष्ट करणं होतं. सायंकाळी कामावरुन पैसे आणले की तेथील पुरुष ती पुर्ण धनराशी आपल्या पत्नीच्या हाती देत असत. नव्हे तर ज्या ठिकाणी दिलजीत रेल्वेतून उतरला. त्या गावात पुरुषांना अजिबात स्थान नव्हतं.

दिलजीत रेल्वेतून उतरला खरा. त्याला फार भुक लागली होती. तसा तो सात आठ वर्षाचा होता. त्याला भुक लागल्यानं तो गावात भीक्षा मागत फिरु लागला. जो भाकर तुकडा मिळेल, त्यावर तो जगू लागला.

सात आठ दिवस झाले होते. दिलजीत असाच गावात यायचा व भीक्षा गोळा करुन खायचा, नव्हे तर एका मंदिराच्या पायरीवर झोपायचा. मंदिरात दर्शनाला गावातील सगळी माणसं बाया यायची. पण कोणाचंच त्याकडे लक्ष जात नव्हतं. याच मंदिराच्या बाजूला एक तळंही होतं.

मंदिर हे गावात नसून गावाच्या थोड्या दूर अंतरावर जंगलात होतं. या मंदिराच्या एका भागाला एक तळंही होतं. या तळ्यावर जंगलातील हिंस्र प्राणी यायचे व पाणी पिवून जायचे. ते हिंस्र प्राणी करायचे काही नाही. पण त्यांची सामान्य माणसाला भीतीच वाटत होती. त्यामुळं की काय, या मंदिरात दर्शनाला काही लोकं जेव्हा जात. ते समुहानं जात असत. एरवी कोणातही एकटं तिकटं जाण्याची हिंमत होत नव्हती. आजुबाजूला मात्र दाट जंगल होतं.

पुरते आठ दिवस झाले होते. जंगलातल्या त्या मंदिराच्या पायरीवर झोपणारा तो. भीक्षा मागून मिळणाऱ्या अन्नावर तो जगत होता. लोकांना दया येत होती. अशीच त्या गावात ताराबाई नावाची म्हातारी बाई आपल्या पतीसोबत राहात होती. तिला मुलबाळ कोणीच नव्हतं. एक दिवस ही ताराबाई दिलजीत भीक्षा मागायला आला असता त्याला म्हणाली,

"बेटा, तू या गावात नवीन दिसतोस. कुठे राहतोस?"

"... " दिलजीत काहीच बोलला नाही.

"तुझे मायबाप कुठे राहतात?"

"मला मायबापच नाहीत. "

तशी ती विचार करु लागली. थोड्या वेळानं म्हणाली,

"तू माझ्याजवळ राहशील. माझा मुलगा बनून. "

"... " तो काहीच बोलला नाही.

"मला मुलगा नाही. तू माझा मुलगा बनशील?"

दिलजीतनं तो प्रश्न ऐकला. तसा तो म्हणाला,

"ठीक आहे. तू जर मला मुलगा मानलं तर मी तुझ्याजवळ राहायला तयार आहे. "

दिलजीत ताराबाईजवळ राहू लागला. त्याचेवर आपल्या मुलांसारखी ताराबाई प्रेम करु लागली. ते प्रेम जे प्रेम त्याला त्याठिकाणी कोणी देणार नव्हतं.

आज दिलजीत त्या म्हाताऱ्या ताराबाईसोबत अगदी पुत्रासमान राहात होता. ती ताराबाई त्याच्याशी वागतांना भेदभाव करीत नव्हती.

तांत्रीक विद्येचे भरपूर प्रकार पडतात. पहिल्या प्रकाराला इंद्रजाल विद्या म्हणतात. ही विद्या शत्रूला वश करणारी असून

शत्रूचं दमन करणारी आहे असं लोकं म्हणतात. तसेच सुंदर स्त्रीयांनाही मोहात पाडून वश करणारी अाहे. असंही मानतात. त्यानंतर दुसरा प्रकार येतो, तो म्हणजे अघोरी विद्या. ही विद्या सर्व विद्येचा राजा आहे असं मानलं जातं. ही विद्या मांस मदिरा पालन केल्याशिवाय काम करीत नाही असे मानतात. ही विद्या प्राप्त करण्यासाठी कोण्या नराचा तरी बळी द्यावा लागतो असे लोकं म्हणतात.

तिसरा प्रकार आहे भानामती. ह्या विद्येला काळी जादू देखील म्हणतात. हा प्रकार लोकांसाठी अत्यंत त्रासदायक ठरतो. या काळ्या जादूत एक चट्टान वापरली जाते. ही पुजा करतांना अंगात येण्याचे प्रकारही घडतात. चवथा प्रकार आहे करणी. ह्याला नाथपंथीय विद्या मानली जाते. ह्या विद्येला तांत्रीक उपायातील चांगली विद्या मानली जाते. ह्या विद्येचा उपाय अमावस्येच्या रात्रीच साधता येतो.

ताराबाईकडं दिलजीत रमला होता. तशी ताराबाई अघोरी विद्या शिकली होती. ती आकाशातील घार पाडणे, मुरमुऱ्यापासून पैसे बनविणे. माणसाचा पाखरु बनविणे, वाघाला बैल बनविणे इत्यादी गोष्टी शिकली होती. त्याचप्रमाणे जंगलातील उभ्या असलेल्या मंदिराजवळील तळ्यावर जे जंगलातील वन्य जंगली

प्राणी पाणी प्यायला येत. त्या प्राण्यांचे ती कान पकडून त्यांना जंगलात हाकलून देत असे. पण त्यावर ते प्राणी पलटवार करीत नव्हते वा तिच्यावर प्रतिघात करीत नव्हते. हे सर्व ती शिकलेल्या अघोरी विद्येनं करीत होती. ती माणसाचे विद्येनं जीव घेण्याचेही मंत्र शिकली होती.

दिलजीत तिचा पुत्र म्हणून तिच्याजवळ राहात होता. ती आपली विद्या पुढं चालावी म्हणून दिलजीतलाही ती विद्या शिकवीत होती. तसं पाहता लवकरच दिलजीत ती विद्या शिकला. त्यात तो तरबेज झाला होता.

जसा दिलजीत त्या अघोरी विद्येत तरबेज झाला. त्यानं त्याचा प्रयोग करण्याचे ठरवले. त्याला वाटले की कदाचित मला ती विद्या येते का किंवा ती विद्या खरी आहे काय? तसा प्रयोग त्यानं झाडावर करुन पाहिला.

दिलजीतनं झाडं पाहिली. झाडं जीवंत असतात हे त्यानं ऐकलं होतं. ती सात झाडं होती. ती एकाच रांगेत उभी होती. त्यानं त्या झाडाकडं पाहून मंत्र म्हटला. हातात पाणी घेतलं. तसं ते हातातील पाणी त्या झाडाच्या दिशेनं फेकलं. त्याचबरोबर ती उभी झाडं करपली. तसा त्याला अंदाज आला की आपण जी विद्या

शिकलो. त्या विद्येत काहीतरी खरेपणा आहे. तरीही त्यानं दुसरा प्रयोग करण्याचं ठरवलं.

त्यानं जसा दुसरा प्रयोग करण्याचं ठरवलं. त्याचबरोबर त्यानं एक घार आकाशात उडतांना पाहिली. त्यानं परत मंत्र म्हटला व त्या घारीच्या दिशेनं पाणी फेकलं आणि आश्चर्य म्हणजे त्या घारीनं पंख जवळ केले व ती खाली येवू लागली. तशी ती जमीनीवर थोड्याच वेळात आपटली व गतप्राण झाली. यानंतर त्यानं हा प्रयोग एका माणसावर करण्याचं ठरवलं. त्यानंच असाच एक माणूस पाहिला. ज्याला त्याचे मुलं पोषत नव्हते. जो वेदनेनं तडपत होता. त्याला मरण हवंच होतं. तसा त्यानं मंत्र म्हटला. तसं हातातील ते पाणी त्या माणसाच्या दिशेनं फेकलं. तसा तो माणूस गतप्राण झाला. आता दिलजीतला संपूर्ण अनुभूती आली होती. त्याला वाटत होतं की आपण आता माणसालाही गतप्राण करु शकतो. आपल्यामध्ये मंत्रशक्ती अफाट आलेली आहे.

दिलजीत अघोरी विद्या शिकला खरा. पण तो असेच अघोरी कृत्य करु लागला होता. तरीही त्याची आई ताराबाई त्याला काही म्हणत नव्हती.

************************

दिवसामागून दिवस जात होते. तशी दिलजीतला आता आपल्या घरची आठवण येत होती. पण त्याची आई दिवसभर त्याच्या देहाला फुलपाखरु बनवून ठेवत असे. त्यामुळं त्याला पळता येत नव्हते. सायंकाळी आई घरी येताच ती त्याच्या फुलपाखरु रुपापासून नरदेह बनवीत असे. तशी दिवसभर ती कामात व्यस्त राहात असे.

आजही अशीच सायंकाळ उजळली होती. ताराबाई कामावरुन आली. तिनं सायंकाळी घरी येताच हातपाय धुतले. तसं तिनं दिलजीतला फुलपाखरु रुपातून माणूस रुपात आणले. त्याला फुलपाखरु रुपात ठेवण्यामागे तिचा एक उद्देशही होता. तो म्हणजे तो जी विद्या शिकला होता. त्या विद्येनं तो माणसं मारत होता. त्यामुळं की काय, हे तिला माहित झाल्यानं त्यानं माणसं मारु नये यासाठी त्याला फुलपाखरु रुपात ठेवणं तिला जड जात नव्हतं.

सारखी गावची येणारी आठवण दिलजीतला स्वस्थ बसू देत नव्हती. जरी ताराबाई आपल्या स्वलेकरासारखी सांभाळत असली तरी त्याला त्याचे मायबाप आठवत होते. जरी त्या गावानं आधार दिला तरी त्याला आपल्या स्व गावची माती खुणावत होती. तशी तो तिथून पळ काढण्याची योजना तयार करीत होता.

आज सोमवार होता. सायंकाळी ताराबाई कामावरुन घरी आली. तिनं दिलजीतच्या फुलपाखरु अवस्थेचं माणसात परीवर्तन केलं. असाच काही वेळ गेला. दिलजीत म्हणाला,

"आई, मी शौचास जावून येतो. "

गाव तेवढं सुधारलं नव्हतं. गावात शौचालयेही नव्हती. शौचास जायचे असेल तर बाहेर खुल्या मैदानात जावे लागायचे.

"ठीक आहे. जा. " तसा तो त्या ठिकाणी शौचास निघाला.

दिलजीत शौचास निघाला खरा. पण तो शौचास कसला जातोय! त्यानं काही अंतर जाताच शौचाचा डबा फेकला व धुम पळत सुटला. तसा तो रेल्वेगाडीजवळ पोहोचला. रेल्वे लागलीच होती. ताबडतोब तसा तो रेल्वेगाडीत बसला. रेल्वेगाडी सुरु झाली व दिलजीत आपल्या गावाला रवाना झाला.

दिलजीत रेल्वेमध्ये दरमसल करीत लपण्यासाठी शौचालयाचा वापर करीत करीत मायदेशी पोहोचला होता. ताराबाईनं मात्र दिलजीत दिसला नसल्यामुळं खुप शोधाशोध घेतला त्याचा. पण तो तरीही न दिसल्यानं तिला वाटलं की कदाचित त्याला वाघानं खाल्लं असावं. असं समजून ती चूप झाली होती.

************************

दिलजीत ती अघोरी विद्या शिकून मायदेशी परतला होता. त्यानं तशी गावात आपल्या विद्येची परीक्षा पाहण्यासाठी तो माणसं मारली होती.

दिलजीत हा अघोरी विद्या शिकलेला गावातील मोठा मांत्रीक बनला होता. त्याचं वय लहान होतं. पण त्याची विद्या मोठी होती. तो माणसं मारत जरी असला तरी त्याची विद्या लपलेली असल्यानं त्या मेलेल्या माणसांचं नाव श्यामकांतवर येत होतं. तसं पाहता श्यामकांत बदमाश जरी असला तरी तो असं पाप करीत नव्हता. मात्र तोही तांत्रीक विद्येत पारंगत असल्यामुळं व मांत्रीक म्हणून त्याची किर्ती गावोगावी पसरलेली असल्यामुळं तोच माणसे मारतो असं लोकांना वाटत होतं. जणू गावातच मरीमाय आली असं वाटत होतं.

ज्यावेळी गावात माणसं मरत होती आणि गाव दहशतीत होतं. या गावातील साऱ्या लोकांनी एकी केली व गावात राहात असलेल्या निरपराध श्यामकांतच्या घरावर हमला केला. त्या हमल्यात श्यामकांत एके दिवशी मरण पावला. त्याचबरोबर गावच्या लोकांना हायसं वाटलं. आता आपलं गाव सुखी झालं

असं सर्वांना वाटलं. त्यांनी सुटकेचा श्वास सोडला. पण त्यांचा तो भ्रम होता. माणसं महिन्या पंधरा दिवसात मरतच होती. त्यातच या गावाला अशा गोष्टीपासून कसं थांबवावं अशी गावकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली.

श्यामकांत मरण पावला जरी असला तरी असं कसं घडतं हे काही समजेनासं होतं. त्यातच काही हुशार गावकऱ्यांना वाटलं की कदाचित श्यामकांत मेलेला असला तरी त्यानं उठविलेली भुतं ही काही शांत झाली नाहीत. ती आपल्याला सतावतात. म्हणून त्यांनी त्यांचा बंदोबस्त लावण्याचा विचार केला. तेव्हा कोणीतरी गावाबाहेरच्या माणसानं सांगीतलं की असा मांत्रीक तुमच्याच गावात असून तो अजुनही कोणाच्या लक्षात येत नाही. तेव्हा त्याचा शोध घ्या.

दिलजीत अघोरी विद्या शिकलेला असला तरी त्याच्याबद्दल कोणाला कोणतीच कल्पना नव्हती. त्यामुळं की काय, दिलजीत बद्दल कोणाच्याही मनात कोणतीच शंका नव्हती. तसं गाव काही लहान नसल्यानं कोण असा करतोय तेही माहित नव्हतं. माहित व्हायला जागाही नव्हती. कारण रात्री जेव्हा कुत्री भुंकत. तेव्हा सर्वजण झोपलेले असायचे. श्यामकांतच्या म्हणण्यानुसार कुत्री जेव्हा भुंकतात, तेव्हा यम येतो व जो जागा असतो, त्याला घेवून

जातो असा युक्तीवाद केलेला असल्यानं कोणीही जागत नव्हतं. परंतू यातच श्यामकांत आपली चाल चालून जात असे. तो त्याच संधीचा फायदा घेवून स्मशानी वाट चालत असे व जळत असलेल्या चितेभोवती तो एक पांढरी लकीर ओढत त्या चितेतील भुतांना आव्हान करीत असे आणि म्हणत असे,

'ये रे माझ्या लेकरा, ये. लवकर ये. मी तुला कोंबडा देईल. बकरा देईल. ' त्यावर त्या चितेतील अक्राळविक्राळ भुत जागा होवून त्या श्यामकांतला दर्शन देत असे व समाजसेवा काम भुर्रदिशी करुन पुन्हा स्मशानात येवून पुन्हा आदेश मागत असे. त्यानं काम झाल्याचं सांगताच श्यामकांत जवळचे मुरमुरे त्या भुतांना खायला देत असे व म्हणत असे. 'घे, खा माझ्या लेकरा. पोटभर खा. उद्या अजून दुसरं काम करायचं आहे. ' यानंतर ते स्मशानी भुत ते मुरमुरे खावून झोपी जात असे. त्यानंतर श्यामकांत घरी मागल्या पावली परत येत असे.

श्यामकांत मरण पावताच आता गावचा मांत्रीक राजा दिलजीत बनला होता. त्याच्याबद्दल लोकांना काहीही माहिती नव्हती.

दिलजीत रात्री बारा वाजता उठायचा. तोही ती स्मशानी वाट चालायचा. त्या स्मशानी वाटेवरुन चालतांना त्याला काहीही भीती वाटत नव्हती. असाच एक दिवस उजळला.

शेजारच्या गाववाल्यानं सांगीतलं होतं की तुमच्या गावातच असा एक मांत्रीक आहे की जो अशा प्रकारची करतूत करतो. त्याला अडवायला हवं. परंतू कोणत्याही गावातल्या माणसाजवळ अशा मांत्रीकाला अडविण्याचं धाडस नव्हतं. आता तर दिलजीत वयानंही मोठा झाला होता. परंतू त्याचं पाप तेवढं उजागर झालं नव्हतं नव्हे तर आजही लोकं मरतच होते व लोकं हैराणच होते. मार्ग सापडत नव्हता. तसेच कोणाचा केव्हा क्रमांक लागेल हेही सांगता येत नव्हते. अशाच या गावात सुरजीत नावाचा एक तरुण राहात होता.

सुरजीत नावाचा तो गृहस्थ. साधारणतः तो आडजवान होता. तो अंधश्रद्धा मानत नव्हता. तसेच देवही मानत नव्हता. त्याला ते सर्व थोतांड वाटत होतं.

सुरजीतला वाटत होतं की या जगात भुत अस्तित्वातच नाही. त्यामुळं गावातील मरणारी माणसं ही कोणताच भुत मारत नसून ते मरण्यामागे काहीतरी नैसर्गीक वातावरण कारणीभूत असेल. तसा तो त्या श्यामकांतच्या बोलण्याला मान्यता देत नव्हता. जे बोल

श्यामकांत बोलून गेला होता की रात्री कोणीही जागू नये. सुरजीतनं अशा कित्येक रात्री जागून काढल्या होत्या. पण त्याला काहीही झालं नव्हतं. त्याच गोष्टी तो गावकऱ्यांनाही सांगत होता. पण कोणीही त्याचेवर विश्वास ठेवायचा नाही. अशीच ती रात्र उजळली.

त्या रात्री गावात कोणीतरी मृत झालं होतं. मैयतही निपटली होती. मात्र दहशतीनं अख्खं गाव निपचीत गाढ झोपलं होतं. परंतू सुरजीतला काही झोप येत नव्हती. त्याच्या मनात ते प्रश्न घोळत होते. जे गावानं जाहिर केले होते. गावाला वाटत होतं की ज्या दिवशी माणूस मरण पावतं. त्या प्रेतातील आत्मा उठते व ती आत्मा जो जागा असेल, त्याला आपल्यासोबत घेवून जाते. याच गोष्टीमुळं त्याला झोप येत नव्हती. अचानक तो उठला व ज्या ठिकाणी ते प्रेत जळत होतं. त्या ठिकाणी तो जायला निघाला. मनात मात्र किंचीतही भीती नव्हती.

सुरजीत जेव्हा स्मशानाची दिशा चालत होता. त्याला जाणवलं की कोणीतरी त्याचा पाठलाग करीत आहे. तसा तो थोडा घाबरला. त्यानं मागं पाहिलं. परंतू त्याला कोणीच दिसलं नाही. तसा निर्भीड बनून तो परत ती वाट चालत होता.

तो रस्ता निर्जन होता. तशी ती अमावस्येची रात्र होती. बाहेर कुत्र्यांचा व कोल्ह्यांचा सारखा आवाज येत होता. पण ती कुत्रीही

त्याला दिसत नव्हती वा कोल्हेही. बाहेर चक्क अंधार पडलेला होता. पण त्या अंधारात त्याला ती स्मशानी वाट गवसत होती. तसं पाहता त्याच्याजवळ एक कंदीलही होता. अशातच एक त्या कंदिलाच्या उजेडात काळी आकृती त्याच्या समोरुन गेली. तशी त्याला भीती वाटली. तो विचार करु लागला की ही काळी आकृती कोणाची असेल. तसा काही वेळानं तो आपला हा भ्रम असावा असं मानू लागला. नव्हे तर परत ती स्मशानी वाट चालू लागला.

स्मशान जवळ आलं होतं. प्रेत दुरुनच जळत असलेलं दिसत होतं. त्या जळत्या प्रेतातील अग्नीचा उजेड परीसरात पसरला होता. तशी एक पुन्हा आकृती त्या स्मशानात घिरट्या घालत असलेली दिसली. त्या स्मशानातील ती आकृती कोणाची? सुरजीतला प्रश्न पडला. तसा तो आणखी घाबरला.

त्या आकृतीनं केसं मोकळे सोडलेले होते. नव्हे तर ती काळी आकृती त्या प्रेताभोवती घिरट्या घालीत होती. तसा सुरजीत घाबरला असला तरी पुन्हा त्या आकृतीजवळ जायला निघाला.

सुरजीत त्या आकृतीजवळ गेला. तशी ती आकृती काहीतरी म्हणत असलेली दिसली. सुरजीत मात्र त्या आकृतीच्या एकदम जवळ न जाता थोडा दूरच झाडाच्या आडोशाला उभा राहिला व दुरुनच त्या आकृतीची मजा पाहू लागला. ती आकृती काहीतरी

करीत असलेली दिसली. त्या आकृतीचं बारीक निरीक्षण सुरजीत करु लागला. तो पाहात होता, त्या आकृतीनं त्या प्रेताच्या भोवताल एक काडीनं रेघ ओढलेली आहे. तसेच ती आकृती जे काही म्हणत होती. ते अगदी स्पष्ट ऐकायलाही येत होतं. त्या आकृतीनं एक त्या प्रेताभोवती रेषा मारली. त्यानंतर थोडंसं पाणी टाकलं व ती आकृती म्हणाली,

"उठ, माझ्या लेकरा उठ. तुला आज भरपूर काम आहे. " त्यानंतर त्या आकृतीनं आपल्या हातातील पाणी त्या जळत्या प्रेतावर शिंपडलं.

त्या आकृतीनं तसं म्हणताच व पाणी शिंपडताच त्या प्रेतातून धुळ निघाली. ती धुळ धुक्यासमान वाटत होती. तसं ते धुकं हळूहळू नष्ट होवू लागलं. तशी एक अंधूक आकृती त्या प्रेताच्या अगदी वर उभी झाली. तिचे केस मोकळे सोडले होते. ते पांढरे होते. त्या आकृतीनं पांढरे कपडे परीधान केले होते. तसेच त्या आकृतीला पाय अजिबात दिसत नव्हते. ती आकृती त्या अग्नीज्वाळेवर उभी राहिली. तशी ती म्हणाली,

"बोल, काय हुकूम आहे?"

"तुझ्यासाठी एक काम आहे. "

"कोणतं काम. पटकन बोला. "

"एक कोंबडा आहे. त्याला हलाल करायचा आहे. करशील?"

"हुकूम माझ्या बापा. "

"तर जा. जा लवकर अन् तो कोंबडा घेवून ये. "

"ठीक आहे बापा. मी तुमचं काम लवकर करेन. आतं मला खायला दे काहीतरी. मला भुक खूप लागली आहे. "

"हो, हे मुरमुरे घे. अन् खा. तुले काम झाल्यावर एक बकरा देईल. पण माझं काम व्हायला हवं. "

"ठीक आहे बापा. आतं मला जावू दे. "

"ठीक आहे. तू जा आता. पुढच्या अमावस्येला भेट इथंच. "

ते भुतंच वाटत होतं. काही क्षणिक ते भुत अंतर्धान पावलं. तसं त्या आकृतीनं स्मशानातील त्या जळत्या चितेवर हळद कुंकू फेकल्यागत फेकलं व काही मुरमुरेही फेकल्यागत फेकले. पाण्यानं हात धुतले व काहीतरी कापू लागला. बहुतेक ती लिंब असतील. त्या लिंबाचे चाकू्ूनं दोन भाग केले. त्याला कुंकवानं लाल केलं व ते लिंबूचा रस त्या अग्नीवर ओतू लागला व म्हणाला. त्याचबरोबर आणखी काही मुरमुरे अग्नीत टाकून म्हणू लागला.

"खा, पोटभर खा. पण काम फत्ते व्हायला हवं. "

त्याच्या बोलण्यावर त्या चितेतून काहीच आवाज आला नाही. मात्र सुरजीत ज्या झाडाच्या आड होता. तो मात्र खुप घाबरला होता. त्यानं आजच्या अमावस्येला प्रत्यक्ष भुत पाहिला होता.

आज त्याचा भ्रम तुटला होता. त्याला वाटत होतं की प्रत्यक्ष भुत राहातच नाही. पण आज स्मशानात त्यानं प्रत्यक्ष भुत पाहिला होता. भुताच्या विविध हालचालीही अनुभवल्या होत्या. त्या हालचाली प्रत्यक्ष पाहून तो एवढा घाबरला की तो बेशुद्ध पडला. त्याची शुद्ध हरवली होती.

सकाळ झाली होती. सुरजीतचे मायबाप सकाळी उठले. मुलगा अंथरुणात दिसला नाही. हे पाहून त्यांना चिंता वाटायला लागली. कदाचित रात्री भुतानं तर आपल्या मुलाला सुरजीतला चकवा बनून गायब तर केले नाही असं वाटायला लागलं. ते आजुबाजूला शोधाशोध करु लागले. पण सुरजीत आजुबाजूलाही दिसला नाही. त्यामुळं मायबापासह आजुबाजूचीही मंडळी चिंतीत झाली. आता सुरजीत कुठे गेला असेल, कुठे नाही असं सारखं वाटू लागलं होतं.

सकाळचे साडे नव वाजले होते. एक गृहस्थ धावत धावत सुरजीतच्या घरी आला. त्यानं सुरजीत गवसल्याची कल्पना

त्याच्या वडीलांना दिली. चौकशीअंती माहिती पडलं की सुरजीत बेशुद्धावस्थेत स्मशानात सापडला. तसे त्याचे मायबाप धावत जावून आपल्या पोराला शोधू लागली.

सुरजीतचे मायबाप स्मशानात आले होते. त्यांना सुरजीत स्मशानात बेशुद्धावस्थेत सापडला. तशी मंडळी सांगत होती की ते जेव्हा राख गोळा करायला आले. तेव्हा त्यांना हा सुरजीत बेशुद्धावस्थेत दिसला.

सुरजीत दिसताच मायबापानं त्याला जवळ घेतलं. ते रडत होते. एवढ्यात कोणीतरी म्हणालं,

"हा भानामतीचा प्रकार आहे. याच्यावरही काल अमावस्या असल्यानं कोणीतरी करणी केलेली असावी. "

कोणी त्या घटनेस भानामतीचा प्रकार समजत होते. तर कोणी त्यास भुतानं झपाटलं म्हणत होतं. तर कोणीतरी त्याला चकवा लागला म्हणत होतं. तसं कोणीतरी म्हणालं,

"त्याच्या अंगावर पाणी टाका. त्याची नाडी सुरु आहे. श्वास सुरु आहे. त्याच्या चेहऱ्यावर पाणी टाकताच तो होशमध्ये येईल. "

मृताची राख जागच्या जागेवरच होती. पण सुरजीतच्या पाठीमागं लोकं लागली होती. सगळा गाव सुरजीतला पाहायला भीड करुन उभा होता.

कोणीतरी दुरुन पाणी आणलं. ते सुरजीतच्या चेहऱ्यावर मारलं. तसा सुरजीत होशात आला. तसा तो म्हणाला,

"मी कुठे आहे?"

"सगळे त्याला विचारु लागला की तो इथे कसा आला. त्यावर सुरजीत घडलेली कहानी सांगू लागला.

'मी रातच्याला बाहेर पडलो. स्मशानाच्या वाटेनं चालू लागलो. कधीतरी मला वाटलं की आपल्या पाठीमागं कुणीतरी चालत आहे. मी थोडा घाबरलो. मी मागे वळून पाहिलं. परंतू मला कोणीही गावलं नाही. ते पाहून मी परत धीर धरुन परत स्मशानात न घाबरता आलो तर पाहतो काय, एक आकृती या प्रेताभोवती रेषा मारीत होती. थोड्या वेळानं त्या आकृतीनं या प्रेतावर पाणी टाकलं. त्यातच धुक्यासारखा धुळ निघायला लागला. थोड्याच वेळात त्या धुळीमधून एक अंधुक आकृती दिसायला लागली. त्या आकृतीचे केसं पांढरे होते. कपडेही पांढरे होते. त्याचबरोबर त्या आकृतीला पाय दिसले नाहीत.

ती आकृती... त्या आकृतीला खालची आकृती म्हणाली की माझं एक काम आहे. हे काम तुला फत्ते करावं लागेल. तेव्हा तू हे काम फत्ते करशील का? यावर वरची आकृती म्हणाली की ते काम फत्ते होईलच. आधी मला खायला दे. खुप भुक लागली आहे. खालच्या आकृतीनं हळद कुंकू टाकलं. तसं ा त्या आकृतीनं थोडे मुरमुरे त्या प्रेतअग्नीत टाकले व ती खालची आकृती म्हणाली की आता मुरमुरे खा. मी काम फत्ते झाल्यावर तुला बकरा देईल. त्यानंतर ती आकृती अंतर्धान पावली. तसं खालच्या आकृतीनं या प्रेतात कुंकू लावलेला लिंबू घेवून त्याचा रस टाकला. एवढंच माझ्या लक्षात आहे. पण हे पाहात असतांना तो मी फार घाबरलो होतो की मला ग्लानी केव्हा आली ते समजलेच नाही. आता पाहतो तर तुम्ही माझ्या समोर उभे आहात. '

कोणी कोणी त्याच्या बोलण्यावर सहज विश्वास ठेवला. मात्र कोणी कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतील तेव्हा ना. ते विश्वास ठेवायलाही तयार नव्हते. त्यां ाना वाटत होतं की हा चकव्याचा किंवा भानामतीचा प्रकार असून या सुरजीतला चकव्यानंच इथं आणलं असावं. त्याला भुतानं झपाटलेलं असून तेच भुत असं बडबडत असावं.

सुरजीत होशात आल्याबरोबर त्याला लवकरच घरी नेण्यात आलं. राखड सावडली गेली. तिची विल्हेवाटंही लावली गेली. मात्र सुरजीतनं सांगीतलेल्या गोष्टी खऱ्या असल्यानं त्याची धास्ती दिलजीतनं घेतली होती. दिलजीत तसा सुरजीतला ओळखता आला नाही. पण आपला अंतकाल श्यामकांतसारखाच जवळ आला आहे असं दिलजीतला वाटू लागलं.

दिलजीतला वाटत होतं की कदाचित एखाद्या वेळी सुरजीतला माहित झालं आणि त्यानं जर त्याला ओळखलं तर कदाचित आपल्याला गाव सोडणार नाही. म्हणून की काय, सुरजीतला नेस्तनाबूत करण्यासाठी तो त्या प्रेताला आळवू लागला. म्हणू लागला की त्या प्रेतातील भुतानं सुरजीतच्या मनाचा ठाव घ्यावा. त्याच्या अंगात भरावं व पुढील अमावस्येला त्याची शिकार करावी. दिलजीतनं स्वतःचे पाप लपविण्यासाठी भुताला केलेल्या विनंतीनं ते स्मशानातील भुत सुरजीतच्या मागं लागलं. आता त्या भुताच्या मागं लागण्यानं सुरजीत घुमू लागला. काही काही बडबडू लागला. ते भुत आता सुरजीतच्या जीवनाची राखरांगोळी करु लागला होता.

सुरजीतच्या अंगात ते स्मशानातील भुत येवू लागलं. पण ते कसं अंगात भरलं ते काही सुरजीतच्या नातेवाईकांना कळेनासं

होतं. कोणी म्हणत होतं की सुरजीतला ज्या भुतानं स्मशानात नेलं. त्या भुतानंच याला झपाटलं.

सुरजीतच्या अंगात येणारी गोष्ट हाहा म्हणता पंचक्रोशीत पोहोचली. कोणी म्हणत होतं की सुरजीतला कोण्या एखाद्या मांत्रीकाला दाखवावं.

लोकांच्या सांगण्यानुसार सुरजीतच्या मायबापानं सुरजीतला लगतच्या गावच्या मांत्रीकाला दाखवलं. मांत्रीकाजवळ सुरजीत जाताच त्यानं पाहिलं की त्या मांत्रीकाच्या घरी एक माणसाची कवटी आहे. एक मोरपंखाची झाडणी आहे. एक बेतही ठेवलेला आहे.

मांत्रीकाजवळ सुरजीत जाताच मांत्रीक त्याला विचारु लागला.

"सांग, तू कोण आहेस?"

"... " सुरजीत काहीच बोलला नाही.

"बऱ्या बोलानं सांग, तू कोण आहेस ते?"

"... " सुरजीत तरीही काही बोलला नाही.

"तू बोलतेस की नाही?"

"... "

सुरजीत तरीही शांत होता. तसा मांत्रीकानं आपल्या हातात बेत घेतला आणि म्हणाला,

"आता सांग नाहीतर तुला बेताचे फटके मारीन. "

"... " सुरजीत काहीही बोलला नाही. तसा मांत्रीक बेतानं जोरजोरात फटके मारु लागला. ते बेताचे फटके त्याला झोंबू लागले. त्या थंडीच्या दिवसात ते बेताचे फटके पडताच सुरजीतच्या अंगाचा दाह दाह झाला. त्याचबरोबर तो किंचाळला.

"मेलो रे बाप. सोडा मला. "

"नाही सोडणार सांगीतल्याशिवाय. सांग. लवकर सांग. नाहीतर अजून मारीन. "

सुरजीत तरीही काही बोलला नाही. ते पाहून मांत्रीक परत भडकला. तसा तो स्वगत म्हणाला,

"भुत पुष्कळ पोहोचलेला दिसतोय. आतं उगलणार सगळं. "

मांत्रीकानं हातावर घरातील थोडीशी मोहरी घेतली. त्यामध्ये थोडंसं पाणी घेतलं. ते कुस्करलं व बारीक झालेल्या त्या मोहरीचे दाणे सुरजीतच्या डोळ्याला लावू लागला. त्याचबरोबर डोळ्याची लाही लाही झाली. अंगार झाल्यानं सुरजीत म्हणाला,

"सांगतो, सांगतो. सगळं सांगतो. "

"हं सांग. लवकर सांग. मला वेळ नाही. "

सुरजीतच्या अंगातला भूत तसा सांगायला लागला.

"मी भुत आहे यांच्याच गावचा. "

"तू याला का धरले?"

"हा माझ्या सपाट्यात आला. "

"चूक आहे. बरोबर सांग. "

"... " चूक आहे असं म्हणताच भुतही चूप बसला. तसा मांत्रीक म्हणाला,

"तू बोलत का नाहीस?"

"का बोलू. मला माहित आहे की तू मला मारशीन बेतानं मारशील. पण मला तुझे बेताचे फटके लागत नाही. ते फटके तुझ्या झाडालेच लागते. " असं म्हणत तो हासू लागला.

"लय हुशार दिसतोस तू. "

"हुशार म्हणजे? तू मारतेस तेव्हा मी याले सोडून देतो. "

"अस्सं का? ठीक आहे. " असे म्हणत मांत्रीकानं सुरजीतच्या संपूर्ण शरीराच्या भोवताल एक रेष ओढली. त्यानंतर तो म्हणाला,

"आतं कुठं जाशील? आतं बऱ्या बोलानं सांग. नाहीतर अजून मारीन. "

सुरजीतच्या अंगातील भुत मात्र चुपचापच होतं. तसा मांत्रीकानं पुन्हा बेत घेतला व तो परत बेताचे फटके मारु लागला. परंतू आता या वेळच्या फटक्यानं सुरजीतच्या अंगातील भुत हसू लागलं. मांत्रीकाचे हात दुखू लागले. पण त्या भुताचं मात्र हसणं बंद झालं नाही. तसा मांत्रीकही चूप बसला. तसा मांत्रीक सुरजीतच्या बापाला म्हणाला,

"हा काही चांगला भुत नाही. हा खोडकर भुत आहे. बऱ्या बोलानं सरळ होणार नाही. "

सुरजीतच्या अंगातील भुताचं हसणं, त्याचं आळस काढणं, तो अक्राळ विक्राळ चेहऱ्याचा मांत्रीक, त्या मांत्रीकाचं सुरजीतशी विचित्र वागणं... या साऱ्या गोष्टी अंगाचा थरकाप करणाऱ्या होत्या. ते बोल ऐकतांना अतिशय भीतीही वाटत होती. तसे मांत्रीकानं दोन लिंबू घेतले. ते कापले व ते कच्चे लिंबू त्या सुरजीतच्या अंगातील भुताला चारुन म्हणाला,

"आता घाबरण्याची गरज नाही. मी तुम्हाला दोन लिंबू देतो. " असे म्हणत ते दोन लिंबू मंत्र म्हणून देवू लागला.

सुरजीतच्या अंगातील भुताचं हसणं, त्याचं आळस काढणं, तो अक्राळ विक्राळ चेहऱ्याचा मांत्रीक, त्या मांत्रीकाचं सुरजीतशी विचित्र वागणं... या साऱ्या गोष्टी अंगाचा थरकाप करणाऱ्या होत्या.

ते बोल ऐकतांना अतिशय भीतीही वाटत होती. तसे मांत्रीकानं दोन लिंबू घेतले. ते कापले व ते कच्चे लिंबू त्या सुरजीतच्या अंगातील भुताला चारुन म्हणाला,

"आता घाबरण्याची गरज नाही. मी तुम्हाला दोन लिंबू देतो. " असे म्हणत ते दोन लिंबू मंत्र म्हणत त्याच्या मायबापाला देवू लागला.

आक्ता लावणं सुरु झालं होतं. दर आठवड्याला सुरजीतचे मायबाप त्या मांत्रीकाच्या घरी येत असत. तो मांत्रीक बेतानं त्याला मारत असे. त्याचबरोबर दोन लिंबू कापून त्या सुरजीतला चारत असे. सुरजीत कधी चांगला रडत असे. तसेच त्याच्या अंगातील भुत हसत असे. दिवसामागून असेच दिवस जात होते.

सुरजीतला भुत लागताच तो जेव्हा सांगायचा नव्हे तर त्याच्या अंगातील भुत बडबडायचा. तेव्हा जी भीती वाटायची. ती भीती पाहून लोकं अधिक धास्तावले होते. त्यातच फरक म्हणजे लोकं आता अजून रात्रीला गाढ झोपू लागले. त्यातच लोकांना भुताचीही भीती वाटू लागली होती. याच भीतीचा फायदा घेवून दिलजीत आपली पावले टाकत होता. तो रात्रीचे बारा वाजले की स्मशानात जाई व त्या स्मशानातील भुताचे आवाहन करीत असे. तसं ते भुत यायचं व काम झाल्याचं सांगत असे.

************************

दिलजीतनं श्यामकांतची गत पाहिली होती. श्यामकांतही काळी जादू जाणणारा व्यक्ती असून त्याच काळ्या जादूनंच त्याचा जीव घेतला होता. त्यामुळं त्याला वाटत होतं की कदाचित जर ह्या माझ्या अघोरी विद्येबद्दल लोकांना माहित झाल्यास लोकं मला मारुन टाकतील. माझ्या मायबापालाही या विद्येची माहिती होईल. यासाठी की काय, दिलजीतनं आपलं बस्तान दूरच्या डोंगरावर थाटलं होतं. याच डोंगरावर तो निवास करुन गावच्याच नाही तर पंचक्रोशीतील लोकांना सतवत होता. यात त्याला फक्त आनंद मिळत होता. तोही अघोरी आनंद.

ते डोंगर... त्या डोंगरावर बाळंतीनी गाडलेल्या होत्या. तसेच जे मांत्रीक गावात मरायचे. त्या मांत्रीकालाही याच डोंगरात गाडलं जायचं. या डोंगरावर भुत निवास करतो अशी लोकांची धारणा होती नव्हे तर तिकडे कोणी जर फिरकलाच तर त्याला ती भुतं झोंबतात अशी आख्यायीका होती. कारण यापुर्वी ती भुतं बऱ्याच लोकांना झोंबली होती. त्यामुळं लोकं तिकडं जात नसत. शिवाय तो डोंगर जंगलानं वेढलेला असून या डोंगरावर हिंस्र जंगली

प्राणीही निवास करतात असं लोकांचं म्हणणं होतं. अशाच या कारणामुळं लोकं तिकडं जात नसत. मात्र दिलजीत अघोरी विद्या शिकल्यानं त्याला कोणत्याच स्वरुपाची भीती वाटत नसे. तो बिनधास्त त्या डोंगराकडे जात असे. त्याला कधी वाघ, सिंहासारखे हिंस्र प्राणी ही भेटत. पण या प्राण्यांना तो भीत नसे. उलट त्या प्राण्यांचा कान पकडून तो त्यांना हाकलून देई.

डोंगरावर एक गृहाही होती. याच गुफेत दिलजीतनं आपला अड्डा बनवला होता. आता त्याला आपल्या मायबापाची भीती नव्हती. ना गावकऱ्यांची भीती होती. ना वाघ, सिंहाची भीती होती. तो रात्रीच्या गर्द अंधारात उठायचा व स्मशानात जावून गाडलेल्या प्रेताला उकरुन काढून त्या प्रेताच्या माना कापायचा आणि त्या माना त्या गृहेत नेवून ठेवायचा. एवढंच नाही तर आता तर तो भयंकर प्रकारही करीत होता.

दिलजीत आज जवान झाला होता. त्याला असं सगळं करण्यात फार आनंद वाटत असे. त्यानं या गृहेत एक दगडाचा शैतानी पुतळा तयार केला होता. हा पुतळा बोलत नव्हता. पण दिलजीतला वाटत असे की हा पुतळा बोलतो. त्यालाही भावभावना आहेत. तो पुतळा आपल्याला आनंद मिळवून देत असतो. मात्र आनंदाच्या बदल्यात अशा शैतानी पुतळ्याला

रक्ताची गरज असते. जर आपण याला रक्त पुरवलं तर नक्कीच हा पुतळा आपल्याला भरभरुन आनंद देईल असं त्याला वाटत असे. त्यामुळं की काय, तो त्या पुतळ्याला रक्त चढविण्यासाठी नाहकच लहान लहान मुलं बळी देवू लागला होता.

दिलजीतची हिंमत दिवसेंदिवस वाढू लागली होती. तरीही तो रात्रीच उठायचा. स्मशानात जायचा. स्मशानात ज्या ठिकाणी मुदडे जाळतो, त्या जागेभोवती गोल करायचा. नव्हे तर त्या जागेवर हळद कुंकू टाकायचा. त्यानंतर त्याला रक्त म्हणून कोंबड्याचा बळी चढवायचा नव्हे तर कधी कोंबडा न मिळाल्यास आपल्याच बोटाचं रक्त शिंपडायचा. नव्हे तर असं रक्त शिंपडताच ते स्मशानी भुत प्रसन्न होवून त्याला दर्शन द्यायचा व ते दर्शन होताच हवी ती मागणी तो करायचा. काही दिवसानं मात्र त्याची मागणी पूर्ण होत असे. ते गाव तसं चांगलं होतं. तरीही त्या गावाला दिलजीत त्रास देत होता. त्याचं कारणही तसंच होतं.

*************************

भूतपिशाच लोकांच्या समजुतीनुसार भूत ही पितर, गंधर्व वगैरेंसारखी एक मानवेतर योनी आहे. मृत्यूनंतर प्राण्याला आणि

विशेषतःमानवाला कोणती गती मिळते, याविषयी वेगवेगळ्या लोकांची वेगवेगळी मते व कल्पना असून भूतयोनीची प्राप्ती ही त्या विविध गतींपैकी एक हीन अशी गती मानली जाते. लौकिक सृष्टीतील प्राण्यांहून भिन्न असलेल्या अतिमानवी व अलौकिक अशा काही शक्ती या विश्वात आहेत, असे बहुतांश लोकांना वाटत आले आहे. ईश्वर, विविध देवता, देवदूत, राक्षस, असुर, सैतान, यक्ष, गंधर्व, किन्नर इत्यादींचा तसेच यांखेरीज अनेक प्रकारच्या चित्शक्तींचा त्यांमध्ये अंतर्भाव होतो. पितर, भूतपिशाच इत्यादींचाही अशा प्रकारच्या अलौकिक शक्तीमध्ये अंतर्भाव होतो. या शक्तींचे दोन प्रकार मानता येतात. यांपैकी काही शक्ती या प्रारंभापासून अखेरपर्यंत मानवाहून भिन्न व स्वतंत्र अस्तित्व असलेल्या असतात. तर पितर, भूतपिशाच इत्यादी शक्ती म्हणजे मृत मानवांना मिळालेल्या विशिष्ट गती असतात. अर्थात तात्विक दृष्ट्या अशी विभागणी सहजगत्या करता आली तरी, प्रत्यक्ष व्यवहारात मात्र अशी काटेकोर विभागणी आढळतेच असे नाही. विशिष्ट माणसांच्या मृत्यूनंतर त्यांचा आत्मा भूतयोनीत प्रवेश करतो आणि इतरांना दृश्य वा अदृश्य स्वरूपात विविध मार्गांनी त्याचे अस्तित्व जाणवत राहते, अशी समजूत आहे. माणसाचे शरीर व आत्मा यांना अलग अस्तित्व असू शकते आणि मृत्यूमुळे त्याचे

शरीर नष्ट झाले, तरी आत्मा नष्ट होत नाही, या दोन श्रद्धांवर भूतयोनीची ही संकल्पना आधारलेली आहे.

फार प्राचीन काळापासून आणि जगातील सर्व समाजांतून या संकल्पनेचा आढळ होतो. तसेच भुतांविषयीच्या असंख्य दंतकथा जगभर आढळतात.

अलिकडे मानसशास्त्र व वैज्ञानिक दृष्टिकोणातून विज्ञानशाखांमध्ये या विषयावर संशोधन चालू आहे. अर्थात विज्ञानाच्या आधारे भूतयोनीचे अस्तित्व सिद्ध झालेले नसले, तरी अजूनही असंख्य लोक तिचे अस्तित्व व प्रभाव यांच्यावर विश्वास ठेवतात. अनेकदा मनोविकृती, अज्ञान, भीती इत्यादी कारणांनी होणारे आभास हेच या विश्वासाला जन्म देतात असे दिसते. क्वचित प्रसंगी भुत व पिशाच या दोन भिन्न योनी असल्यासारखी वर्णने आढळत असली, तरी स्थूलमानाने भुतांनाच पिशाच म्हटले जाते. विशेषतः, मांसभक्षक भुतांना पिशाच म्हटले जाते, असे त्या शब्दाच्या व्युत्पत्तीवरून दिसते. ब्रह्मदेवाने पिशाचांची निर्मिती केली, ते पुलह नावाच्या ऋषीपासून जन्मले, अंधारापासून जन्मले, क्रोधा वा दक्षकन्या पिशाच ही त्यांची आई आहे इ. कथा भारतीय पुराणांतून आढळतात.

पुराणानुसार वासना अतृप्त असताना, अकाली, बाळंतपणात, रजस्वला असताना, अपघात तसेच विश्वासघात, आत्महत्या इत्यादी कारणांनी मृत्यू आल्यास व्यक्ती भुत बनते, अशी लोकांची समजूत असते. भुतांच्या स्वरूपाविषयी विविध प्रकारच्या कल्पना आढळतात. उदाहरणार्थ भुतं ही स्वतः छायात्मक असल्यामुळे त्यांची सावली वा प्रतिबिंब पडत नाही. भूत ज्या व्यक्तीचे असते, त्या व्यक्तीसारखेच दिसते, त्याचे पाय उलटे असतात, काही भुते कुरूप व भयंकर असतात, काहींना शिर नसते व छातीला डोळे असतात. काहींना एकच डोळा असतो. इत्यादी गोष्टी भुतांबद्दल सांगीतल्या जातात. याच वेगवेगळ्या कारणांनी भुतांचे वेगवेगळे प्रकार मानण्यात आले आहेत. लोकांना मदत करणाऱ्या सत्प्रवृत्त भुतांचीही कल्पना करण्यात आली अाहे, तरी सामान्यतः भुतं ही भयंकर व अपायकारकच मानली जातात.

वेताळ व म्हसोबा यांना भुतांचे राजे मानले जाते. खून झालेल्या ब्राह्मणाच्या भुताला ब्रह्मराक्षस, तर धनलोभी ब्राह्मणाच्या भुताला ब्रह्मसमंध म्हणतात. विधियुक्त अंत्यसंस्कार न झालेल्याच्या भुताला समंध, तर पाण्यात बुडून मरणाऱ्याच्या भुताला गिऱ्हा किंवा पाणबुड्या म्हणतात. बाळंतीण झाल्यानंतर दहा दिवसांच्या आत मरणाऱ्या स्त्रीच्या भुताला हडळ किंवा लावळीण, तर भूतभविष्यकालीन घटना सांगणाऱ्या भुताला

कर्णपिशाच म्हणतात. अविवाहित असताना मृत्यू आल्यास मुंजा म्हणतात, तसेच झोटिंग, खविस इत्यादींसारखे भुतांचे इतरही अनेक प्रकार मानले जातात.

ज्याप्रमाणे माणसांची भुतं बनतात. त्या माणसांप्रमाणेच इतर मृत प्राण्यांचीही भुतं बनत असल्याबाबत अनेक लोकं बोलतात. अनेक लोकांत असे संभ्रम आढळतात.

. अनाममधील कोळयांच्या समजुतीनुसार मृत देवमाशाचे भूत माणसांना पछाडते. सेमिंडे इंडियन लोक खडखड्या नागाला (रॅटल स्नेक) मारत नाहीत. कारण मारल्यास त्याचे भूत आपल्या बांधवांना सूड उगविण्यास प्रवृत्त करील, असे त्यांना वाटते. शिकारीला निघण्याआधी पूर्वी मारलेल्या प्राण्यांच्या आत्म्याला संतुष्ट करण्याची प्रथा अनेक आदिम लोकांमध्ये आहे. आपण प्राण्याला मारत असताना दुसरेच कोणी तरी मारत आहे असे भासवणे, मारलेल्या प्राण्यांच्या भुतांची भीती वाटून त्यांच्या हाडांची वगैरे अवहेलना न करणे इ प्रकार त्यांच्यात आढळतात. स्मशान, ओसाड घरे, पडक्या विहिरी, पिंपळ, तिवाठा इ. ठिकाणी भुतांचे वास्तव्य असल्याचे मानले जाते. प्रत्येक भुताचा प्रदेश ठरलेला असून त्याला त्या प्रदेशाबाहेर जाता येत नाही वा ते गेल्यास इतर भुतं त्याच्यावर रागावतात इ. समजुती आहेत.

अमावास्या, पौर्णिमा इ. काळात त्यांचा प्रभाव विशेष असतो. भुतं लागणे, भुतं अंगात येणे, त्याने पछाडणे वा झपाटणे यांसारख्या शब्दांनी भुतांचा माणसांवरील प्रभाव दाखविला जातो. भूत अंगात आलेली व्यक्ती विचित्र चाळे करते व विक्षिप्तपणे बडबडते. भुतांच्या भल्याबुऱ्या प्रभावाविषयी लोकांच्या विविध कल्पना असतात. त्यांचा दुष्प्रभाव दूर व्हावा म्हणून विविध प्रकारचे कर्मकांड, मंत्रतंत्र, जादूटोणा, विधिनिषेध इ. निर्माण झाले आहेत. व्यक्तीच्या अंगातील भूत काढण्यासाठी तसेच मृताने भुतं होऊ नये वगैरे हेतूंनी अनेक विधी केले जातात. समाजातील अनेक चालीरीतींचा उगमही भुतांच्या अस्तित्वावरील विश्वासापासून झाल्याचे दिसते. भुतांना कोणतेही रूप घेता येते, जांभई देताना तोंडावर हात ठेवला नाही, तर ती तोंडात शिरतात, त्यांना पाहिले तरी मृत्यू येतो, एखाद्या व्यक्तीच्या पतीचे वा पत्नीचे रूप घेऊन ती फसवितात इ. समजुती आढळतात.

भुतांमुळे विविध प्रकारचे रोग होतात, अशी समजूत तर जगातील विविध समाजांतून आढळते. मेलानीशियामध्ये जमातप्रमुख सामर्थ्यशाली भुतांबरोबर संपर्क साधू शकतो आणि त्याद्वारे पाऊस, आरोग्य, युद्धातील विजय इ. गोष्टी प्राप्त करून घेऊ शकतो, या विश्वासावर लोक त्याच्या सत्तेला मान्यता देतात. या विश्वासाला तडा गेला, की त्याची सत्ता डळमळीत होते. भुतं

एखाद्याच्या शरीरातून त्याच्या जीवाला खेचून नेऊ शकतात, अशी एक समजूत आहे. बँक्स बेटातील लोक विशिष्ट दगडात भुतं राहतात अशा समजुतीने त्या दगडांना ‘भक्षक भुतं ' असे म्हणतात. त्यांच्यावर ज्याची सावली पडेल त्याचा जीव भुतं ओढून नेते, या श्रद्धेने चोरांपासून घराचे रक्षण करण्यासाठी असे दगड ठेवले जातात. मृत व्यक्तीच्या भुताने झपाटू नये म्हणून बिछान्याभोवती काटेरी झुडपे ठेवण्याची पद्धत ब्रिटिश कोलंबियात आढळते. विधुर आपल्याबरोबर आला, तर त्याच्या पत्नीच्या भुताला मासे घाबरतील या समजुतीने विधुरावर बहिष्कार टाकण्याची पद्धत ब्रिटिश न्यू गिनीमध्ये आढळते. खून करणाऱ्या वा युद्धात शत्रूचा वध करणाऱ्या माणसाला मृताचे भूत पछाडेल, या समजुतीने त्याच्यावर विविध निषिद्धे लादण्याची प्रथा अनेक ठिकाणी आढळते. भुतं लोखडाला घाबरतात, या समजुतीने संरक्षणासाठी लोखंडाच्या विविध वस्तू वापरण्याची पद्धत जगात अनेक ठिकाणी आढळते. मृताचे नाव असलेली व्यक्ती भुताच्या प्रभावामुळे मरण पावेल या भीतीपोटी मृतासारखे नाव असल्यास ते टाकून देण्याची पद्धत ऑस्ट्रेलियातील काही आदिवासी जमातींत आहे. रोमन लोक घरातील प्रत्येक माणसाची एक लोकरी प्रतिमा दारावर टांगत असत व भुतं जीवंत माणसाऐवजी त्या प्रतिमेला नेतील, असे मानत असत. ऑस्ट्रेलियातील काही जमाती दरवर्षी मृतांच्या भुतांना

आपल्या प्रदेशातून हाकलण्याचा विधी करतात. प्रेत घरात असेपर्यंत कोणतेही हत्यार वापरावयाचे नाही, कारण मृताच्या भुताला इजा झाली तर ते आपल्याला ठार करील, अशी समजूत अनेक लोकांत आहे.

भुताचा त्रास होऊ नये म्हणून मृताच्या नातेवाईकांवरही अनेक निषिद्धे लादली जातात. अॅसिरियन व बॅबिलोनिअन लोकांत भुतांविषयीच्या अनेक कल्पना होत्या. लोकं भुताला 'एडिम्मु' म्हणत असत. प्रेत पुरले गेले नसेल, थडग्यातून हाडे हलविली गेली असतील वा वंशजांनी विधीपूर्वक अन्नपाणी दिले नसेल, तर मृत व्यक्तीचे भूत अस्वस्थ बनते, असे ते लोक मानत असत. ईजिप्ती लोक मृताच्या भुताला 'खु' म्हणत. उपासमारी, हल्ला वगैरेंनी मरण पावलेले वा ज्यांचे थडगे उखडलेले आहे असे लोक भुतं बनतात आणि ही भुतं अस्वस्थ, भटकी, भुकेलेली, इतर चित्शक्तींनी बहिष्कृत केलेली वगैरे असतात. असे मानले जाई. ही भुतं स्वप्नात जाऊन त्रास देतात, रोग निर्माण करतात, स्त्रियांना पळवतात, जादूगार आपल्या दुष्ट हेतूंसाठी त्याचा उपयोग करतात. इ. समजुती होत्या. ख्रिस्ती धर्माच्या प्रसारानंतरही केल्टिक लोकांच्या मनात भुताची भीती होतीच. जपानमध्ये असंख्य प्रकारच्या भुतांचे अस्तित्व मानले जाई. त्यांना एक वा तीन डोळे, लांब जीभ, सापासारखी लांब मान वगैरे असल्याच्या समजुती

होत्या. मृत माणसाचे जसे भूत बनते, तशीच जीवंतपणी त्याच्या अवतीभोवती असलेल्या सर्व प्राण्यांची व वस्तूंचीही भुते बनून त्याच्याबरोबर राहतात, अशी एक आगळी वेगळी समजूत जपानी लोकांत होती. बौद्ध धम्माचा सर्वसामान्य लोकांपर्यंत प्रसार झाल्यानंतर बौध्द लोकांतही भुतांवरील विश्वास आढळू लागला. जैन धर्मातही हा विश्वास आढळतो. भारतात व्यक्तीच्या अंगातून भुत काढण्यासाठी मांत्रीक लोक अनेक उपाय करतात. ज्याला भूत लागले आहे, त्याला झोडपून काढण्यासारखे अघोरी उपायही त्यात असतात. कारण तो मार भुताला बसतो व त्यामुळे ते त्या व्यक्तीला सोडून जाते, अशा समजूती आहेत. दत्त वगैरे देवतांच्या तीर्थयात्रा, ग्रामदेवतांची आराधना, जप, उपवास इ. इतर धार्मिक मार्गांचाही भुतं निघून जावीत म्हणून अवलंब केला जातो. भुतांना संतुष्ट करण्यासाठी विविध प्राण्यांचे व वस्तूंचे बळी अर्पण केले जातात.

भुतं ही शंकराचे सैनिक आहेत, या श्रद्धेमुळे शंकराला भूतनाथ, भूतेश्वर इ. नावे देण्यात आली आहेत. वज्रसत्व या बौद्ध तांत्रीक देवतेलाही भूतनाथ म्हणतात. दुर्गेला भूतनायिका, भूतमाता इ. म्हटले जाते. औषधीविद्येच्या अष्टशाखांपैकी भुतविद्या ही एक शाखा असून तिच्यात भुतामुळे होणाऱ्या रोगांची चर्चा आढळते. तामसी लोक भूतगणांची पूजा करतात, असे गीतेत म्हटले आहे.

भारतात आश्वीन पौर्णिमेला भुतांची पूजा केली जाते, म्हणून तिला भुतपौर्णिमा म्हणतात कार्तिक कृष्ण चतुर्दशी यमाची असल्यामुळे तिला भुतचतुर्दशी म्हणतात.

पिशाचबाधा दूर व्हावी म्हणून चैत्र वद्य चतुर्दशीला पिशाचांसाठी बळी देण्याचे एक व्रत केले जाते, म्हणून या तिथीला पिशाचचतुर्दशी म्हणतात. काही ठिकाणी वैशाख कृष्ण प्रतिपदेपासून अमावस्येपर्यंत वा ज्येष्ठ महिन्यात भूतमातामहोत्सव साजरा केला जातो. त्यामुळे वर्षभर भूतबाधा होत नाही, असे मानले जाते. एखाद्या व्यक्तीला भुताने पछाडले असल्यास त्या भुताला शांत करून त्याचा उद्धार करण्यासाठी त्याला कथा व गीते ऐकवण्याचा भूतराँसा नावाचा विधी गढवाल भागात केला जातो. भूतबाधा दूर व्हावी म्हणून भारताच्या अनेक भागांतून भूतनृत्ये केली जातात. पूजा वगैरेंच्या ठिकाणची भुतं दूर जावीत वा नष्ट व्हावीत म्हणून भूतोद्वासन नावाचा एक विधी केला जातो. भूतबाधा दूर करण्यासाठी एका खापरावर विशिष्ट कोष्टके काढून व ऱ्हीं हे बीजाक्षर लिहून तयार केलेल्या भूतत्रासनयंत्राचा उपयोग केला जातो. काशीमध्ये पिशाचमोचन नावाचे एक तीर्थ आहे. तेथे मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीला स्नानदानादींनी युक्त असे पिशाचमोचन नावाचे व्रत केले असता मृत्यूनंतर पिशाच व्हावे लागत नाही व पितर पिशाचयोनीतून मुक्त होतात, अशी समजूत आहे. परंतू

अंधश्रद्धा तसेच मांत्रीकविद्या पैसे कमविण्याचं साधन आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

अलिकडे विज्ञान वाढीला लागले आहे. लोकं आता चंद्र, सुर्याला देव मानत नाहीत. कारण आज चंद्र, सुर्य कोण आहेत. त्यावर काय आहे. हे सिद्ध झालंय. आज देव दगडात नाही तर माणसात आहे हेही सिद्ध झालंय. इच्छा व्रत केल्यानं पुर्ण होत नाहीत, तर कार्य केल्यानं पुर्ण होतात हेही सिद्ध झालंय. तरीही काही माणसं अशाच दगडात देव शोधत असतात. नव्हे तर त्याच दगडावर भाव म्हणून कोंबडा, बकरा बळी म्हणून देत असतात. काही ठिकाणी भाव म्हणून मेंढे व रेडेही कापतात. तर काही ठिकाणी चक्क माणसाचाही बळी देतात. अशी कित्येक नरबळीची उदाहरणे घडलेली आहेत. गुप्त धन मिळते म्हणून काही लोकं चक्क लहान लहान बालकाचा बळी देत असतात. स्वतःचे मायबाप सुद्धा अशावेळी कोंबडा, बकरा बळी न देता आपल्या स्वतःचा लेकरु बळी देत असतात.

पुर्वी यज्ञात वा होमहवनात पशूबळी देण्याची प्रथा होती. लोकं अशा यज्ञात गाय व घोडा बळी देत असत. काही ठिकाणी वेगवेगळे प्राणीही बळी देत. या सर्व अंधश्रद्धा होत्या. एवढंच नाही तर पती निधनानंतर त्या पतीच्या शय्येवर त्याची पत्नी सती जात

असे. ही देखील क्रुर प्रथा अस्तित्वात होती. देवदासी, केशवेपण, बालविवाह, विधवा विवाह बंदी ह्या सर्व कुप्रथाच नाही तर अंधश्रद्धा होत्या. एखाद्या वेळी मांजर किंवा कुत्रा आडवा जाणे ही देखील अंधश्रद्धा होती. घुबडाचे ओरडणे, वटवाघुळ दिसणे, टिटवी ओरडणे, सकाळी कावळा दिसणे, कावळ्याचे काडी पकडणे ह्या सर्व अंधश्रद्धाच होत्या.

पृथ्वी सपाट असून आपण पुढे गेलो तर पडून जावू असे म्हणणारे लोकं त्यांनी चक्क पृथ्वी गोल आहे असे सांगणाऱ्या गॅलिलिओला ठार केले. नव्हे तर या अंधश्रद्धेला जो जो उजागर करीत होता. त्याला त्याला लोकांनी विरोध केला नव्हे तर आजही लोकं अशा काही ज्या अंधश्रद्धा आजही अस्तित्वात आहेत. त्याला त्याला विरोधच करीत आहेत.

दरवाज्याला लिंबू लटकवीणे, तांत्रीक साधना करुन घेणे, गळयात किंवा हातात गंडे दोरे, धागे, बांधणे, ताईत बांधणे या समाजात रुजलेल्या अंधश्रद्धा... एखादं भुत अंगाला झोंबलं, असे सांगून मांत्रीक किंवा तांत्रीक मंडळी तंत्रसाधना करुन घेत. आजही तशा प्रकारचे प्रकार ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागातही काही प्रमाणात दिसून येतात. आजही काही लोकांच्या अंगात भुत येतो. तर काही लोकांच्या अंगात देव येतो असं भासवून पैसा

उखळण्याचं काम लोकं करीत असतांना दिसतात. "तुम्हाला अमुक अमुक ठिकाणी अमुक अमुक भुत लागला. " असं सांगून शुद्ध फसवणूक करणारे महाभाग काही या देशात कमी नाहीत. म्हणून या अंधश्रद्धांबाबत सांगायचं झाल्यास या अंधश्रद्धा म्हणजे पैसे कमविण्याचे साधन आहे.

पुर्वी जादूटोणा, ठोकाठमका, दिठ, नजर लागणे, अंगात भुत येणे या गोष्टी सर्रास सुरु होत्या. आजही त्या सुरु आहेत. त्याचे प्रमाण आज थोडे कमी आहे. ही नजर लागू नये म्हणून आजही ही नजर काढण्याचे प्रकार होतात. लहान बाळाला साधा जंताचा जरी त्रास असेल आणि पोट दुखत असेल, तरी नजर लागली असं समजून ती नजर काढली जाते. त्यानंतर गळयात ताईत किंवा एखादा धागा घालून दिला जातो. परंतू असा सारखा पोट दुखत असेल, तर कोणीतरी तुमच्यावर नक्कीच करणी केली असं सांगीतलं जातं. तसेच काही संकटं जर वारंवार येत असतील तर घराची बांधणूक करा. असं सांगीतलं जातं. यात मांत्रीक मंडळी अतोनात पैसा कमवीत असतात.

सुखानंतर दुःख व दुःखानंतर सुख येत असतं. कधीकधी तर संकटं एकावर एक येत असतात. यामध्ये कोणी वास्तुदोष दाखवीत असतात. तसेच कोणी 'पैसे तुमच्याजवळ टिकत नाही, अमुक यंत्र

घ्या, पैशात वाढ होईल. ' असं सांगून अंधश्रद्धा पसरवीत असतात. नव्हे तर यातूनही पैसा प्राप्त करणे हा उद्देश असतो.

अलिकडे टिव्हीच्या माध्यमातून तसेच वर्तमानपत्रातून वाईट नजरेपासून वाचविणाऱ्या अशा प्रकारच्या यंत्रांची सर्रास जाहिरात करुन विक्री केली जात आहे. तसेच या वस्तुस्थितीस सामान्य माणूस बळी पडत आहे. अगदी विज्ञान प्रगतीपथावर असतांनाही. आजही काही ठिकाणी मुलं पैदा होणं निव्वळ देवाची किंवा अल्लाची देण समजलं जातं. ज्यांना मुलं लवकर राहात नाही ते, नवशही करीत असतात. मग नवश केल्यानंतर एखाद्या वेळी कावळा फांदीवर बसल्यागत व फांदी तुटल्यागत मुलं झालीच, तर त्याला देव पावन झाला असा भाव मनात प्रगट करुन अंधश्रद्धेवर शिक्कामोर्तब होतो. नव्हे तर तो नवश पुर्ण करण्यासाठीही पैसा खर्च केला जातो. या नवसात नाहकच निष्पाप कोंबड्या बकऱ्याचा जीव जातो.

भुत अंगात येणे, भुत झोंबणे, देव अंगात येणे, तंत्र, मंत्र ह्या साऱ्या अंधश्रद्धा. देवाजवळ एवढी सवड नसते की तो अंगात येईल. तसेच भुताला एवढी गरज नाही की तो माणसाच्या अंगात येईल. तरीही अशा प्रकारच्या अंधश्रद्धा प्रसवल्या जातात. अशा प्रकारच्या अंधश्रद्धांना खतपाणी घातलं जातं.

महत्वपूर्ण गोष्ट अशी की ह्या प्रकारच्या अंधश्रद्धा ह्या निव्वळ पैसा कमविण्यासाठी निर्माण केलेल्या असून ह्या अंधश्रद्धांचा उपयोग करुन कोणीही फसू नये. असल्या अंधश्रद्धांवर कोणीही विश्वास करु नये. तसेच आपल्या चांगल्या सुरळीत आयुष्याचा सर्वनाश करु नये. असे असले तरी भुताला आजही मानणारे काही कमी नाहीत.

*************************

भुतांचे आणखी काही प्रकार आहेत व माहिती खालीलप्रमाणे आहे. त्यात जुन्या भुतांचीही माहिती आहे. जसे, खवीस, चकवा व गि-हा यासारखी...

१)अवगत : विधवा स्त्रीचे भूत. हे आवळा किंवा नागचाफ्यावर वास करतात.

२)अळवत : बाळंत होताना मृत्यू आल्यास स्त्रीचे ‘अळवत' नावाचे भूत होते.

३)आसरा याला

कालकायकही म्हणतात. कालकायकांची भुतं ही भैरवाच्या अंकीत असल्याने, ती जास्त त्रास देत नाहीत. त्यांना तृप्त केल्यावर

ती प्रसन्न होतात. त्यांची कृपा लाभलेला माणूस बारा वर्षे आनंदी व आरोग्यदायी जीवन जगतो. त्यानंतर त्याचा नाश होतो.

४)गानगूड याला गि-हा किंवा पाणबुड्याही म्हणतात. गिऱ्हा हे भूत कोकणाप्रमाणे घाटावरही नाव कमावून आहे. ते पाणवठ्यावर राहात असे आणि माणसाला पाण्यात ओढून नेऊन त्याची नाना प्रकारची चेष्टा करीत असे. 'काय गिऱ्हा लागलाय मागे?' हा वाक्प्रचार या गिऱ्हामुळेच रूढ झाला असावा.

५)खवीस : खवीस हे भूत दोन-तीन प्रकारचे आहे. खवीस जसे महारा-मातंगांचे असते, तसेच ते ॲबिसियन लोकांचेपण असे. हबशी किंवा सिद्दी जे कोकणात स्थायिक झाले, त्यांची भुतं पण चौदाव्या-पंधराव्या शतकापासून कोकणात दिसायला लागली.

६)चकवा : चकवा हा अनेक गावांच्या सीमांवर राहतो, आणि रात्रीच्या वेळी वाटसरूंना भटकवत ठेवतो. चकव्यालाच मनघाल्या म्हणतात.

७)चिंद : घाटावरचे हे भूत महिलेच्या पोटी जन्म घेऊन तिच्या वाट्याचे अन्न खाते, असे म्हणतात.

८)चैतन्य : स्त्रियांना कामुक करून भटकवत ठेवणारा भूत

९)छेडा : छेडा म्हणजे अविवाहित महाराचे भूत. छेडा मुख्यत्वे वेशीवर राहात असते. शूद्रांची अर्थात महारा-मातंगांची

भुते वर्षातून एकदा नारळ, केळी, साखर, कोंबड्यांचा किंवा बोकडाचा बळी दिल्यावर त्रास देत नाहीत. कधी कधी ही भुतं होळीवर, डोंगरात किंवा जंगलात वावरत असत.

१०)जखीण : सवाष्ण स्त्री मेल्यावर भूत झालीच तर ‘जखीण’ होते.

११)झोटिंग : कोळयांच्या किंवा मुसलमानांच्या भुतांना झोटिंग म्हणतात. झोटिंग किंवा खवीस हे जर अहिंदू असतील तर त्यांची बाधा दूर करणे, हे हिंदू देवऋषांच्या अ◌ावाक्यात नसते, अशी धारणा आहे.

१२)झोड

१३)तलखांब :अविवाहित शूद्र पुरुष मेल्यावर भूत झालाच तर त्या भुताला ‘तलखांब’ म्हणतात.

१४)दाव : कुणब्याच्या भुताला ‘दाव’ म्हणतात. हे बहुधा एकाकी भटकते.

१५)देवाचार : लग्न झाल्यानंतर अल्पावधीत जो शूद्र मरतो, तो ‘देवाचार’ होतो. देवाचार भूत गावकुसाबाहेर चारी दिशेला राहते.

१६)पीस

१७)ब्रह्मग्रह : वेदविद्यासंपन्न, पण ज्ञानाचा गर्व असलेल्या ब्राह्मणाचा आत्मा जेव्हा भूत होतो, तेव्हा अशा भुताला ‘ब्रह्मग्रह’ म्हणतात.

१८)ब्रह्मराक्षस : ब्रह्मराक्षस हे पिंपळावर राहणारे सर्व भुतांमधील शक्तिशाली भूत असते. याच्या कचाट्यात कुणी सापडला, तर तो सुटणे अशक्य असते. ब्राह्मणांचा द्वेष करणारे, त्यांच्या कर्तव्यास हीन लेखणार व त्यांची चेष्टा करणारे अतृप्त आत्मे ‘ब्रह्मसमंध’ या भूतयोनीत जातात.

१९)मनघाल्या = चकवा

२०)महापुरुष भूत : वेदपारंगत ब्राह्मणाच्या भुताला ‘महापुरुष भूत’ म्हणतात.

२१)मुंजा : मुंज झाल्यानंतर सोडमुंज होण्याअगोदर एखादा मुलगा मरण पावल्यावर तो मुंज्या होतो. त्याचा आत्मा पिंपळावर किंवा विहिरीत वास करतो. उपनयन संस्कार त्रैवर्णिकात होत असल्याने ब्राह्मणांखेरीज क्षत्रिय आणि वैश्य या वर्णातही मुंजे असतात.

२२)राणगा : विधुर माणसाचे भूत

२३)लावसट : ‘अवगत’सारखेच विधवा स्त्रीचे भूत. हेही आवळा किंवा नागचाफ्यावर वास करते.

२४)वाघोबा :

वीर श्रेणीतील भुते : ‘वीर’ श्रेणीतील भुते, ही अविवाहित क्षत्रियांची असत. कधी ती अ-मराठी किंवा परप्रांतीय क्षत्रियांचीही असत.

२५)शाखिणी : अविवाहित स्त्रीचे भूत.

२६)समंध : समंध ही दोन प्रकारची भुते असतात. पहिल्या प्रकारातील समंध हा संतती न झाल्यामुळे, आणि उत्तरक्रिया न केल्यामुळे होतो. त्याच्या नात्यातल्यांनीच त्याची इच्छा पूर्ण केल्यावर तो शांत होतो आणि आप्तांना मदतसुद्धा करतो. दुसऱ्या प्रकारातील समंध हा जिवंतपणी लोभी आणि इच्छापूर्ती न झालेला संन्यासी असतो. समंध झाल्यावर, तो पैसेवाल्यांना संपत्तीचा उपभोग घेऊ देत नाही.

२७)सैतान : हा अतिशय वाईट प्रकार आहे.

२८)हडळ : स्त्री बाळंत होऊन दहा दिवसांच्या आत मृत्यू आल्यास ती ‘हडळ’ बनते. हडळीलाच हेडळी, डाकण, सटवी असेही म्हणत.

दिलजीत हा मांत्रीक बनला. कारण तो जेव्हा लहान होता. तेव्हा गावातील लोकं त्याच्या मायबापाप्रती वागतांना चांगले वागत नव्हते. तो अस्पृश्य समाजाचा असल्यानं त्यांना वाळीत

टाकल्यागत लोकं त्यांच्याशी व्यवहार करीत होते. एवढंच नाही तर एकदा गावातील उच्चभ्रू तरुणांनी त्याच्या बहिणीवर जबरदस्तीनं बलत्कार केला होता. त्यामुळं की काय बदला काढण्याच्या इराद्यानं दिलजीत मांत्रीक बनला होता. तो आता सगळया गावावर करणी करीत होता. त्यामुळं की काय अख्ख्या गावात लोकांच्या अंगात येवू लागलं होतं.

गावातील मरणारी माणसं पाहता लोकांना गाव सोडून जावंसं वाटत होतं. पण जाणार कुठे? ज्या गावात त्यांचा जन्म झाला होता. त्याच गावात त्यांची शेतीवाडी होती. ती शेतीवाडी त्यांना पोषत होती. नव्हे तर त्यांचं पोट पालवीत होती. त्यामुळं ते लोकं गाव सोडून जावू शकत नव्हते. मग गावातील लोकांच्या अंगात येत असलं तरी...

दिलजीतनं गावाच्या बाहेर बनविलेला मांत्रीक अड्डा कोणाच्याही लक्षात आला नसला तरी दिलजीत जास्त काळ लोकांच्या नजरेतून सुटला नाही. लवकरच तो आपल्या मायबापाच्या दृष्टीस पडला.

दिलजीत दर पंधरा दिवसानं स्मशानात जायचा. मात्र त्याची वेळ अर्ध्या रात्रीची म्हणजे रात्री बारा नंतरची राहायची. त्यातच तो स्मशानातील भुतांशी संवाद साधायचा. यात त्याला किंचीतही

भीती वाटायची नाही. मात्र भुतंच त्याला जणू घाबरत असावीत असं वाटायचं. अगदी भुतांचा तो राजा असल्यागत भुतं त्याची कामं पटापट करीत असायचे. त्यातच तो लवकरच एक मोठा मांत्रीक म्हणून उदयाला आला.

तप्त उन्हाळ्यातील ते दिवस. भर दुपारची ती वेळ होती. गावात असं कोणीच नव्हतं. फक्त दिलजीत आणि त्याची बहिण तेवढी घरी होती. अशातच गावातील ते पाच तरुण घरी आले. त्यांची तशी दिलजीतच्या बहिणीवर वाकडी नजर होती. दिलजीत तसं पाहता तेव्हा ताकदवान नव्हताच.

ते तुफान ताकदीचे तरुण... त्या तरुणांपुढं दिलजीतचं काहीही चाललं नाही. ते तरुण आतमध्ये गेले. आतमध्ये त्याची बहिण एकटीच होती. ती फार घाबरली. एका तरुणानं आतमधून दरवाजा लावून घेतला. त्यानंतर त्यांनी तिच्यावर पाशवी बलत्कार केला. दिलजीत मात्र दरवाजा ठोकत होता. रडत होता.

दिलजीतचे मायबाप कामाला गेले होते. आतमध्ये दिलजीतच्या बहिणीवर बलत्कार होत होता, तेव्हा दिलजीत रडत होता जीवाच्या आकांतानं.

रस्त्यावर माणसाची ती गर्दी गोळा होती. दिलजीत त्या माणसांकडे आशेनं पाहात होता. विनवणी करीत होता. रडत होता.

पण कोणाही माणसांमध्ये ती ताकद नव्हती की ती गोळा झालेली माणसं त्या आतमध्ये शिरलेल्या तरुणांना अडवेल. कारण जे तरुण दिलजीतच्या बहिणीवर बलात्कार करीत होते. त्यापैकी एक तरुण गावातील एका प्रतिष्ठीत माणसाचा मुलगा होता. ज्या माणसाला अख्खा गाव घाबरत होता.

थोडा वेळ झाला. त्याबरोबर एका तरुणानं दरवाजा उघडला. तसे ते तरुण शर्ट सवारत बाहेर आले. त्यानंतर दिलजीत आतमध्ये गेला. पाहतो काय बहिण रक्ताच्या थाळोळ्यात पडली होती. रडत होती. काहीतरी बोलत होती. ते तिचं बोलणं त्या लहानग्या दिलजीतला समजत नव्हतं. त्यानंतर काही वेळातच ती मरण पावली.

ती कशी मरण पावली. हे काही दिलजीतला समजलं नाही. त्या लहान वयात समजतही नव्हतं. पण एक गोष्ट मात्र नक्की समजली होती. ती म्हणजे त्या गावातील तरुणांनी आपल्या बहिणीला मारुन टाकले. तसंच अजून एक गोष्ट त्याच्या लक्षात आली होती. ती म्हणजे गावातील माणसांनी विचार केला असता तर दिलजीतची बहिण वाचली असती. पण त्यांनी तिला मुद्दाम वाचवलं नाही. ते पाहून दिलजीतला गावाबद्दल वाईट वाटलं होतं. तशीच गावाबद्दल कोणतीच सहानुभूती उरली नव्हती. मनात

असुया निर्माण झाली होती. तसेच आपल्या बहिणीच्या मृत्यूचा बदला घेण्याची गोष्ट त्याच्या मनात निर्माण झाली होती. त्यासाठीच तो परदेशी जावून ती अघोरी विद्या शिकला होता. नव्हे तर त्या विद्येचा वापर करीत होता.

दिलजीत त्या पाहाडीतील गृहेत कधीकधी जात असे. तसा गावातही राहात असे. गावात राहात असतांना तो अर्ध्या रात्री स्मशानात जात असे. त्या अर्ध्या रात्री... ज्या अर्ध्या रात्री सर्व गाव झोपलेला असायचा.

एकदाचा तो क्षण. अचानक त्याच्या बापाला अर्ध्या रात्रीच शौचास लागली. त्या गावात शौचास जात असतांना घरीच शौचालये नसल्यानं बाहेर जावं लागायचं. तसा तो उठला आणि बाहेर शौचाकडे कंदील घेवून निघाला. तर पाहतो काय, कोणीतरी माणूस स्मशानाकडे जात असलेला त्याला दिसला. तसा तो घाबरला.

दिलजीतचा बा त्या आकृतीला पाहून घाबरला खरा. कारण त्यालाही तशी भीती वाटतच होती. कारण गावात जी भीती होती. ती म्हणजे ज्यावेळी कुत्री भुंकतात, त्यावेळी जर कोणी जागा असेल, त्याला त्या गावचा शैतानी भुत आपल्यासोबत घेवून जातो. म्हणजे मारुन टाकतो. अगदी तसाच तो प्रकार होता. ही

दिसणारी आकृती कोणी नसून तो भुतच आहे असं त्यांना वाटलं. तसे ते त्याच घाबरलेल्या अवस्थेत लगबगीनं घरी गेले.

दिलजीतचा बा घरी आला खरा. पण त्यानं अंथरुणात दिलजीतला पाहिले नाही. तसा तो आणखीनच घाबरला. त्यानं आपल्या पत्नीला उठवलं आणि दिलजीतबद्दल सांगीतलं देखील. तसा तो म्हणाला,

"कदाचित चकव्यानं तं दिलजीतले गायब केलेलं नसावं. आपल्याले आतंच शोधावं लागन. नायतं आपला मुलगा आपल्या हाती येणार नाय. " तशी त्याची पत्नी म्हणाली.

"तुमचं म्हनणं बरोबर हाय. पण ते गावातील आख्यायीका. ते भुत आपण जर जागत राह्यलो आन् त्या भुतानं पाह्यलं तं आपल्याले उद्या ते भुत घेवून जाईन. "

"तुह्यं म्हनणं बरोबर हाये. पण अातंच जर आपण आपल्या दिलजीतले शोधलं नाय तं उद्या दिलजीत आपल्याले दिसणार नाय. त्याचं काय. "

"त्यावर उपाय?"

"आतंच आपल्याले दिलजीतले शोधलं पाह्यजे. नायतं पोरगा हातचा गेला म्हणून समज. "

"ते भीती?"

"ते भीती गीती जावू दे आतं. चाल माह्यासोबत. मले दिसली तशी आकृती. तोच असन आपला पोरगा. "

"कोठं दिसला जी?"

"त्या स्मशानाच्या वाटेनं. "

"बापरे!"

"आतं कायचा बापरे. आतं आपल्याले स्मशानात जा लागते. चालते का? मी तं जातोच बाप्पा. लेकरु होये. जावा तं लागनच. "

"बाजुच्याईले आवाज द्या नं?"

"लेकरु कोणाचं होये?"

"आपलं. "

"मंग कोणाले त्रास कायले द्याचा. "

"मंग चालातं. "

"चाल. "

"चाला. "

पत्नीनं होकार देताच ते दोघंही त्या स्मशानाच्या दिशेनं निघाले. वाटेत जात असतांना त्यांना भयंकर भीती वाटत होती. रस्त्यावरुन जातांना वेगवेगळे आवाज कानी पडत होते. तसं पाहता

काही आकृत्याही समोरुन मागवून जात असल्याचा भाष होत होता.

ते भयंकर आवाज मनाचा थरकाप करीत होते. त्यातच तो काळाकुट्ट अंधारही मनामध्येच धडकी भरवीत होता. कुत्र्याचे ते केकाटणे त्यातच एखादा आवाज कोल्ह्याचाही अधूनमधून येत होता. त्या कंदिलाच्या प्रकाशात दोघंही बुढाबूढी आपल्या लेकराच्या आशेने भीतभीतच चालले होते.

अशातच स्मशान आलं. ते स्मशान, ज्या स्मशानामधून पांढराशुभ्र धूर निघत होता. ते पाहून तर अजून भीती वाटत होती.

स्मशानात काही ठिकाणी समाध्या बांधलेल्या असून त्या समाध्या दुरुनच दिसत होत्या. तसेच त्या स्मशानात एक मुदडाही जळतांना दुरुन दिसत होता. त्या मुदड्याच्या राखेतून अंगार निघत असून ती लाकडं अजुनही जळत होती. त्याचबरोबर त्या मुदड्याच्या जवळ एक माणूस उभा असलेला दिसत होता. तो नक्की भुतच असेल असे वाटत होते. ते पाहून दिलजीतचे आईवडील अतिशय घाबरुन गेले होते. पण धीर धरुन ते त्या मुदड्याजवळ गेलेच.

तो मुदडा. त्या मुदड्याजवळ त्यांचाच मुलगा दिलजीत उभा असून तो काय करीत आहे हे प्रथमदर्शी दिलजीतच्या मायबापाला

जाणवले नाही. पण नंतर हळूहळू लक्षात आलं की दिलजीत हा काहीतरी मंत्र पुटपुटून या मुदड्याला जागवत आहे. तसा अतिशय कमी आवाजात दिलजीतचा बाप आपल्या पत्नीला म्हणाला,

"तू चूप बसशील. आपला हा दिलजीतच आहे. पण तो या स्मशानात काय करतो ते पाहूया. मी आहे इथं. घाबरु नको. "

पतीनं थोडी हिंमत देताच त्याची पत्नी चूप बसून दिलजीतचे कर्तृत्व न्याहाळत होती. दिलजीत मात्र गुर्मीत असल्यानं त्याची नजर कुणाकडेच नव्हती. त्याच्या स्वतःच्या मायबापाकडंही नव्हती.

दिलजीतनं मंत्र म्हटला. त्याचबरोबर तो म्हणाला,

"हे माझ्या बापा. जागा हो. लवकर जागा हो. तुला खुप मोठं काम करायचं आहे. उठ जागा हो. " असं म्हणत त्यानं त्या तप्त निखाऱ्यावर पाणी टाकलं. त्याचबरोबर अजून पांढराशुभ्र धूर निघाला. तशी एक अक्राळविक्राळ आकृती त्या धुरीवर दिसली. ते पाहून दिलजीतच्या मायबापाची भंबेरीच उडाली होती. आपला मुलगा हाच श्यामकांत नंतर गावात तांडव करीत असून जी माणसं आता दर पंधरा दिवसांनी मरतात. तीही आपला मुलगाच मारत असावा. असं त्यांना वाटत होतं. श्यामकांतपुर्वी मेलेली माणसंही यानंच मारली असावी असंही आज प्रत्यक्ष आपल्या मुलाला तसं

करतांना पाहून दिलजीतच्या मायबापाला वाटत होतं. ते तरीही चूप होते. तो आपल्या मुलाचा अघोरी प्रताप पाहात.

थोड्याच वेळात उभ्या झालेल्या त्या अक्राळविक्राळ भुताच्या आकृतीशी दिलजीत बोलू लागला.

"हे माझ्या बाप्पा, सांग तूनं माझं काम केलं का?"

"हो, तुझं काम झालं. "

"पुन्हा भरपूर कामं करायची आहे तुला?"

"कोणती कामं?"

"तुला पूर्ण गावाला मारायचं आहे. "

"का बरं?"

"बदला... बदला. "

"कशाचा?"

"ते विचारु नको. तू कामं करीत जा. तुला मी पांढरे शुभ्र भाव चढवतो ना. मग खुश राहा. यावेळी तुला लाल कोंबडा देईल. चालेल नं. "

"हो चालेल. "

"ठीक आहे. आतं काही खाशील काय?"

"होय. "

"काय पाहिजे?"

"रक्त... रक्त पाहिजे. देवू शकतोस?"

"का नाही. रक्तच घे. तू माझं काम करतोस ना. मग घे रक्त. " असं म्हणत दिलजीतनं आपला बोट कापला व त्यातील रक्त त्या तप्त निखाऱ्यावर शिपडलं. त्याचबरोबर ती अंधूक आकृती अंतर्धान पावली. ती अंधूक आकृती अंतर्धान पावताच दिलजीतनं त्या शरणावरील तप्त निखाऱ्यावर हळद कुंकू टाकलं. थोडे मुरमुरे टाकले व पाणी फिरवलं. तसा तो माघारी फिरला.

ते सर्व कृत्य करता करता रात्रीचे साडे तीन वाजले होते. कुत्र्यांचा आवाज पुरता बंद झाला होता. त्याचबरोबर ते किंचाळण्याचेही आवाज बंद झाले होते. दिलजीत माघारी फिरला होता. तोच त्याच्या पाठीमागून त्याला आवाज ऐकायला आला.

"दिलजीत थांब. "

रात्रीची वेळ. स्मशानात स्मशान शांतता. दिलजीत तसा थोडासा घाबरलाच. कदाचित आपल्या मागं हे स्मशानी भुत तर लागलं नाही ना. असं त्याला वाटलं. पण क्षणभर विचार करुन आपल्याला भाष झाला असेल असा विचार करुन तो त्या स्मशानातून घराची वाट चालू लागला. तोच त्याला परत आवाज आला.

"दिलजीत थांब. "

आवाज ओळखीचा वाटत होता. तो त्याला त्याच्या मायबापाचा आवाज वाटत होता. पण तरीही हा नक्कीच भुत असेल असं त्याला वाटलं. भुतं कोणाचाही आवाज काढत असतो असंही त्याला माहित होतं. तसं पाहता त्याला वाटत होतं की नक्कीच हा भुत असावा. आपण जर घाबरलो तर नक्कीच हा भुत आपल्याला खावून टाकेल. तेव्हा आपण न घाबरता मागे फिरुन या भुताचा सामना करावा असा विचार करुन तो मागे फिरला. तर त्याच्या समोरच त्याचे मायबाप उभे होते. त्यांच्या हातात कंदिल होता. तसा एक विचार दिलजीतला आला. कदाचित या भुतानं आपल्या मायबापाला तर नेलं नसावं. कदाचित हा भूत आपल्या मायबापाचे तर रुप घेवून आला नसावा. तसा दिलजीत म्हणाला,

"क... क... क, कोण तुम्ही? अन् एवढ्या रात्री इथं काय करता?"

"आधी तू सांग. तू इथं एवढ्या रात्री काय करतोस?"

"मी दिलजीत. मलाच नाही माहित. मी इथं कसा आलो ते. " दिलजीत म्हणाला.

"एडी लावून पेढी खावू नकोस. अगदी खरं खरं सांग. "

"मी मंत्रविद्या शिकतोय. "

"कायसाठी बेटा?"

"बदला... बदला घ्यायचा आहे मला. "

"कायचा आणि कोणाचा बदला?"

"त्या माझ्या बहिणीच्या हत्येचा. "

"म्हणजे? तिनं तं आत्महत्या केली होती नं. "

"नाही. तिला ठार केलं होतं. "

"कोणं?"

"गावकऱ्यानं. "

"म्हणजे?"

"हो, गावकऱ्याचंच ते काम. म्हणून मी बदला घेतोय. "

"बेटा, जावू दे मारलं तं मारलं. तू हा नाद सोडून दे. नायतं त्या गावकऱ्याईले जर माहित झालं नं. तं त्याईनं जसं श्यामकांतले मारलं. तुह्या बहिणीले मारलं. तसं तुले मारतीन. तू आमचा एकुलता एक पोरगा हायेस. आम्ही तुले खोवू शकत नाय. "

"नाही नाही. मी बदला घेईनंच. "

वेळ बराच होत होता. सकाळ होत आली होती. तसा त्याचा बाप म्हणाला.

"बेटा चाल लवकर घरी. घरी बोलता येईन विस्तारानं. चाल लवकर. "

ते तिघंही जण त्या स्मशानातून निघाले. ते नुकतेच घरी पोहोचले असतील. तेव्हापर्यंत पक्षांचा किलबिलाट सुरु झाला होता.

मायबापानं बरंच समजवलं. पण दिलजीत काही समजला नाही. तो लपूनचोरुन स्मशानात जातच राहिला. तसे ते अमावस्ये पौर्णीमेचे बळीही जातच होते. त्यातच दिलजीत आज मोठा मांत्रीक बनत चालला होता. ते गावचे त्याच्या बहिणीचे चारही हत्यारे त्यानं केव्हाच संपवून टाकले होते. त्याचबरोबर पाहणाऱ्या लोकांसह सर्वांना तो संपवू पाहात होता. हळूहळू गाव असंच घुमू लागलं होतं. लोकांच्या अंगातही येवू लागलं होतं.

*************************

सुरजीतच्या अंगात येणारा भुत कोणाला काही केल्या बशर येत नव्हता. त्याला मांत्रीक सतत मारत असल्यानं सुरजीतची आजची हालत ही अतिशय खस्ता होत चालली होती. जो तो त्याच्या अंगात येणाऱ्या भुताबाबत चिंतस्थ होता. त्याच्या

आक्तीवर आक्ती होत होत्या. पण बोलफोड होत नव्हती. तो भुत बोलतच नव्हता.

नेहमीच्या आक्तांप्रमाणे आज सुरजीतला त्या मांत्रीकानं बोलावलं होतं. तसे सुरजीतचे मायबाप आपल्या लेकराला घेवून मांत्रीकाकडे गेले. मांत्रीकानं एकेक आकत निपटंवीत सुरजीतचा नंबर लावला. तसं त्यानं विचारलं,

"काय, काही फरक पडला का नाही?"

"काहीच फरक नाही. "

"ठीक. आज पाहू. " मांत्रीक म्हणाला. तसं त्यानं सुरजीतला आपल्या पुढ्यात बसवलं. त्यानंतर त्याच्या भोवती बेतानं एक गोल फाडला. त्याचबरोबर त्या भुताला बांधलं गेलं. आता मांत्रीक विचार करु लागला की हे भुत आता सुरजीतच्या अंगातून कुठेच जाणार नाही. जे काही फटके बसतील. ते सुरजीतला न बसता या भुताला बसतील व भुत आपली माहिती पटापट सांगेल. तसा तो म्हणाला,

"बोल, तू कोण आहेस?"

सुरजीतच्या अंगातील भुत मात्र काहीही बोलत नव्हतं. तसा मांत्रीकानं बेत घेतला व त्या बेताचे फटके त्या सुरजीतला मारु

लागला. त्याचबरोबर सुरजीतच्या अंगातील भुत बोलायला लागला.

"सांगतो, सांगतो. अगदी खरं खरं सांगतो. "

"सांग, नाहीतर अजून फटके मारीन. " तसा सुरजीतच्या अंगातील भुत स्त्रीवाणीनं बोलत आपली माहिती सांगू लागला.

"मी अनन्या. "

"अनन्या! अनन्या कोण?"

"अनन्या... दिलजीतची बहिण. "

"कशासाठी आलीस?"

"माझा या गावकऱ्याईनं जीव घेतला. म्हणून बदल्यासाठी आलीय. "

"कशाचा बदला?"

"मले मारलं नं. बलत्कार करुन मारलं. "

"या झाडानं मारलं?"

"नाय. "

"मग याला का पकडलं?"

"ह्याचे मायबाप निसते पाहात होते न तमाशा. त्याईनं जर ईचार केला असता तं माह्या जीव वाचला असता. "

"पण यात झाडाचा काय दोष?"

"त्याचा दोष नाय. पण त्याच्या बापाचा दोष हाये नं. "

"हो, म्हणून काय झाडाले शिक्षा द्यायची का?"

"त्याईलेबी कळलं पाह्यजे नं का पोराले त्रास झाला तं मायबापाले कसा त्रास होते ते. मालूम हाये का मी मेल्यावर माह्या मायबापाले किती तरास झाला होता ते ?"

"हो काय. बरं आता घेतला न बदला?"

"कवा घेतला?"

"आतं तू झाडाच्या अंगात नाही आहे का? तुझ्या अंगात राहण्यानं झाडाला त्रास नाही होत का?"

"त्याले बदला म्हणतेत का?"

"मग कशाला म्हणतात बदला?"

"मी झाडाले नेईन. "

"कुठं?"

"कुठं म्हणजे? आपल्यासोबत नेईन. "

"झाड काय तुझी जहांगीर आहे का?"

"जहांगीर म्हणजे? या झाडाच्या मायबापानं मले तरास देला नं. "

"म्हणून काय झालं? याचा अर्थ झाडाला न्यायचं?"

"हो, मी नेईनच माह्या सोबत. "

"ठीक आहे. तू कशी नेते तेच पाहातो. "

सुरजीतच्या अंगातील भुत, हा भुत वाचाळ बोलत होता. ते पाहून मांत्रीकानं परत एक लिंबू कापला व त्या सुरजीतला चारुन तो म्हणाला,

"आपण याचा उतारा काढूया. तेव्हाच हे भुत निघून जाईल सुरजीतच्या अंगातून. "

मांत्रीक बोलत होता. तसे त्याचे बोलणे सुरजीतचे मायबाप चूप बसून ऐकत होते. तसा मांत्रीक परत म्हणाला,

"आता याला पुढच्या आठवड्यात घेवून या. आपण बंदोबस्तच लावून घेवू या भुताचा. ठीक आहे?"

"ठीक आहे. " सुरजीतच्या मायबापानं म्हटलं. तसे ते बाजूला झाले व मांत्रीक पुढच्या आक्तेकडे वळला.

*************************

सकाळ झाली होती. सकाळ झाली होती. तसे सर्व लोक झोपेतून जागे झाले होते. पण आताही दिलजीतच्या मायबापाव्यतिरिक्त कोणालाही दिलजीतबाबत माहिती नव्हती. तसे भीतीनं दिलजीतचे मायबाप त्याला समजावत होते. त्यांना वाटत होतं की दिलजीतनं असं करु नये. नाहीतर गावचे लोकं त्याला श्यामकांतसारखं मारुन टाकतील.

मायबाप जरी समजावीत असले तरी तो काही केल्या समजत नव्हता. शेवटी मायबापानं आपल्याला मुलगा नाही असं समजून पुन्हा घरातून हाकलून दिलं. असं त्याला हाकलण्याची ही दुसरी वेळ होती.

दिलजीत घरातून निघाला. पण त्यानं मांत्रीकपणा सोडला नाही. कारण त्यानं प्रत्यक्ष ते बहिणीवरील अत्याचाराचं दृश्य पाहिलं होतं. ते दृश्य तो विसरु शकत नव्हता. यासाठीच तो मांत्रीक विद्या शिकला होता.

आता तो कायमस्वरुपी त्या डोंगरातील गुप्त गृहेत राहात होता नव्हे तर तेथूनच तो गावाला नेस्तनाबूत करण्याची स्वप्न पाहात होता. तो दिवसभर हिंस्र प्राणी जसे लपून राहतात. तसा तो लपून राहायचा. तसेच रात्रीच्या वेळी तो बाहेर पडायचा. ती रात्रीची वेळ जरी भयानक असली तरी त्याला काही त्या रात्रीचं घेणंदेणं नव्हतं.

ती रात्र वैताग आणणारी जरी असली तरी त्याला ती रात्र चांगली वाटत होती.

दिलजीतला आता सवयच पडली होती. तो स्मशानात जायचा, नव्हे तर त्या स्मशानात जावून त्या कबरीतून मुदड्यांना उठवायचा. त्याचबरोबर तो त्या भुतांना गावात पाठवून अख्ख्या गावावर करणी करायचा. त्याच्याच या कर्तृत्वानं आज अख्खं गाव घुमू लागलं होतं. बहुतेक सर्व गावकऱ्यांच्याच अंगात येवू लागलं होतं. तसेच आता मृत्यूचे प्रमाणंही वाढले होते.

गाव तसं खुप परेशान होतं. आधीच्या काळात जो श्यामकांत होता. त्या श्यामकांतच्या करणीनं आधीच परेशान असलेलं गाव पुन्हा एकदा दिलजीतच्या करणीनं परेशान होतं. ही समस्या कशी दूर करावी हे काही गावकऱ्यांना सुचत नव्हतं. यावर उपाय एकच होता. तो म्हणजे दिलजीतला ठार करणे. पण दिलजीत काही त्यांच्या हाती लागत नव्हता. शिवाय दिलजीतला आमोरासमोर कोणी ब्र जरी म्हटलं, तरी तो त्याचं एखाद्या प्राण्यात वा एखाद्या किड्यात वा एखाद्या फुलपाखरात रुपांतर करीत होता. त्यामुळं तर त्या गावातील लोकं खुप धास्तावलेले होते.

सुरजीतच्या अंगातून अजूनपर्यंत दिलजीतच्या बहिणीचा म्हणजे अनन्याचा भुत अजून निघालेला नव्हता. त्यातच आता

गाव संपूर्णतः अशा भुत अंगात शिरण्यानं परेशान असतांना काय करावं सुचत नव्हता. शेजारचा मांत्रीकही पाहिजे तेवढा तीव्र नव्हता. लोकं आपआपल्या घरी तसेच गावात पुजा देखील करीत. पण तरीही गावातील हे मृत्यू तसेच हे त्या अंगात येणाऱ्यांचे फिरणे कोणीही बंद करु शकत नव्हते. गावात आता भुताटकी निर्माण झाली होती. ती भुताटकी काही केल्या बंद होण्याची चिन्ह दिसत नव्हती. त्या गावातील रात्र काढणे कठीण झाले होते.

हळूहळू या गावातील याबाबतची माहिती इतर गावांना होवू लागली. लोकं या गावाला येत नव्हते. या गावात पाऊले टाकायची भीतीच वाटायची. त्यातच एखाद्या घरी पाहूणे आलेच तर ते पाहूणे दिवस मावळण्याच्या आतच परत निघून जात. तसं पाहता पाहूणे येणेही बंद झाले होते.

असं ते गाव. त्या गावात एक अनिरुद्ध नावाचा माणूस राहायला आला. त्याचा पुत्र हा नाथपंथीय होता. तसेच तो नाथपंथीय विद्या शिकलेला असून त्या विद्येचा वापर तो चांगल्या कामासाठी करीत होता. ज्यावेळी तो गावात पोहोचला. तेव्हा त्यानं पाहिलं की गावात बहुतेक लोकांच्या अंगात भुत संचारलेला असून अख्खं गाव भीतीच्या सावटाखाली जगत आहे. तसेच अख्ख्या गावातून कोणी ना कोणी महिण्यापंधरा दिवसातून मृत्यू पावत

आहेत. तसेच काही गावकऱ्यांनीही माहिती दिली की या गावाला दिलजीतची नजर लागलेली असून हा दिलजीतच जवळच्या डोंगरातील गुफेत राहतो. त्यानंच या गावाला छळलं असून तोच या गावाला संपवायला लागला आहे.

अनिरुद्धला कळलं की या गावावर भुतांची कुछाया पडलेली असून ती भुतं संपूर्ण गावाला छळत आहेत. तसेच त्या भुतांमुळं संपूर्ण गावातच भुताटकी निर्माण झालेली असून घराघरात माणसांच्या अंगातील भुतं डोलत आहेत.

अनिरुद्ध नाथ विद्या शिकलेला मांत्रीक होता. तो नवीनच विद्या शिकलेला होता. पण त्याची विद्या ही अघोरी नव्हती. तसेच त्या विद्येचा वापर हा तो चांगल्या कामासाठी करीत होता.

गावात भुताटकी निर्माण झाली आहे हे त्याला माहित होते. अशातच तो विचार करीत होता की ही भुताटकी नष्ट कशी करायची. त्याला पावलोपावली विचार येत होता. त्यानं भुतं निर्माण कसे होतात? ते संचालन कसे करतात? याची माहिती मिळवली होती. तसेच ही गावातील भुताटकी कशी बंद होईल. गाव कसं सुधारेल याचाही विचार तो करीत होता. अशातच त्याच्याही अंगात एक भुत शिरला.

ज्याप्रमाणे गावात लोकांच्या अंगात भुतं यायची. ती बोलायची. त्याचप्रमाणे या अनिरुद्धच्याही अंगात भुत शिरलं होतं. पण ते बोलत नव्हतं. तर ते गुम राहायचं. त्यालाही वाटायचं की हे त्याच्या अंगात येणारं भुत दुसऱ्या तिसऱ्या कोणी लावलेलं नसून ते दिलजीतनच लावलेलं असावं. पण त्याचं विचार करणं धांदात खोटं होतं.

अनिरुद्ध आता कुठंही पडून राहात होता. मदिरेचं सेवन केल्यागत. पण तो मदिरेचं सेवन केलेला नसायचा. शेवटी त्याच्या नातेवाईकानं विचार केला की त्याला जवळच्या मांत्रीकाकडे बोलफोडी करावी.

अनिरुद्धला शेजारच्या मांत्रीकाकडे बोलफोडीसाठी नेण्यात आलं. आकत लावण्यात आली. आक्तीदरम्यान विचारणा केली गेली तर कळलं की त्याच्या अंगात येणारं भुत हे खट्याळ भुत नसून ते चांगल्या माणसाचं भुत आहे. जे भुत सद् वचनी विचाराचे आहे. बस मांत्रीकानं हेच हेरलं व त्याला आपल्यासारखीच आक्ता घेण्याची व गावातील भुतं बाहेर काढण्याची परवानगी दिली.

अनिरुद्धचं अंगातील ते सद् वचनी भुत आता आक्ता तोडू लागला. तो गावातील लोकांच्या भुतांना बाहेर काढू लागला. त्याचबरोबर अख्खं गाव सुधरु लागलं.

अनिरुद्धच्या अंगातील भुत हे आक्का तोडतं. तसेच ते लोकांच्या अंगातील भुत काढून फेकतं ही बातमी हवेसारखी पंचक्रोशीत पोहोचली. आता तर त्याच्या घरी लोकांची रीघ लागायला लागली. तशी ती बातमी हवेसारखी दिलजीतलाही माहित झाली. त्याचबरोबर तोही भयंकर चिडला व त्याचेवर वार करु लागला.

दिलजीत वार करु लागला खरा. पण त्याच्या वाराचा असर दिलजीतवर होत नव्हता. तो वार त्याच्या अंगातील तो सद् वचनी भुत आपल्या अंगावर झेलून घेत होता.

दिवसामागून दिवस जात होते. तसतसा अनिरुद्धच्या भुताचा प्रभाव वाढत होता. तसा दिलजीतच्या अंगामधील भुताचा प्रभाव कमी होत होता. जसजसा दिलजीतच्या भुताचा प्रभाव कमी होत होता. तसतसा तो चिढत होता. त्याला अनिरुद्धचा भयंकर राग येत होता. परंतू अनिरुद्धही काही कमी नव्हता. तो तर त्या गावातील लोकांच्या अंगात येणाऱ्या भुतांना नियंत्रीत करीत होता.

गावातील काही लोकांची अशा अंगात येणाऱ्या भुतापासून सुटका झाली होती. पण काही लोकं अजुनही अशा भुतांच्या अंगात येण्यापासून त्रस्तच होते. तरीही त्यांचेवर अनिरुद्ध आपल्या शक्तीनं प्रयत्न करीतच होता. एकदाचा तो क्षण... अनिरुद्धच्या

अंगातला भुत गावाच्या भोवताल चक्कर लावत होता. तो आपल्या पायाच्या अंगठ्यानं जमीनीत गाडलेली गावाच्या भोवतालची लिंब काढत होता. नव्हे तर ही लिंब गावात भुताटकी निर्माण व्हावी म्हणून दिलजीतनं गाडलेली होती. ती लिंब आता अनिरुद्ध काढत होता. कोणीतरी म्हणत होतं की या गावात भुताटकी निर्माण व्हावी म्हणून गावाच्या भोवताल ही लिंब गाडली असावीत.

सुरजीतच्या अंगात अजुनही भुत येतच होतं. ते भुत काही केल्या निघत नव्हतं. शेजारचा मांत्रीक स्वभावानं चांगला होता. त्यानं बराच प्रयत्न करुन पाहिला. उतारेही काढून पाहिले. पण हे भुत काही निघत नव्हतं. त्यातच मांत्रीकाला त्यावर कोणताच उपाय सापडत नव्हता. एक दिवस तो म्हणाला,

"याला तुम्ही तुमच्या गावच्या अनिरुद्धला दाखवून पाहा. "

गावात राहणारा अनिरुद्ध. त्यानं गावातील बरीच भुतं काढली होती. पण सुरजीतच्या बापाचा काही विश्वास बसत नव्हता. एरवी तो काही खास शिकला नसावा असे वाटत होते. परंतू शेजारच्या गावच्या मांत्रीकानं म्हटल्याप्रमाणे ते त्या अनिरुद्धच्या घरी गेले. त्यांनी अनिरुद्धला त्या मांत्रीकाची गोष्ट सांगीतली आणि सांगीतलं की त्यांना त्याच मांत्रीकानं त्याचेकडं पाठवलं आहे. नेहमीप्रमाणं

सुरजीतची अनिरुद्धच्या अंगात येणाऱ्या भुताकडं आकत लावण्यात आली. अनिरुद्धच्या अंगातील भुतानं विचारलं,

"बोल, तू का निघत नाहीस?"

"बदला. "

"तुझा बदला तर पुर्ण झाला. "

"नाय. यानंतरही लोकं मुलींवर बलत्कार करतीलच. तेव्हा त्या मुलीयचं मले रक्षण कराले नोको का?"

"पण झाडानं बलत्कार केला का?"

"नाय केला. पण मले सांग, मी राहू कोठं त्यासाठी. "

"राहू कुठं म्हणजे?कुठंही राहा. आम्हाला काय सांगते?"

"नाय. मी झाडाले सोडणार नाय. "

"नाही, तुला जावंच लागेल. "

"नाय जाणार. का करशीन. "

"ठीक आहे. मला सांग तुझी इच्छा कशात आहे? मी ती पुर्ण करील. मग तर जाशील. "

"खरंच करशीन?"

"होय. का नाही करणार? नक्कीच करेल. "

"या गावात कोणावरही बलात्कार होवू नये हीच माझी इच्छा. हे वचन तू देवू शकतेस?"

अनिरुद्धचा भुत विचारात पडला. वचनच ते... ते द्यायचं तरी कसं? लोकं आपलं ऐकतील तरी का? अन् नाही ऐकलं तर आपण या भुताला फसवल्याचं पाप लागेल. काय करावं?

अनिरुद्धच्या अंगातील भुत विचार करु लागला. भुत का असेना. त्यालाही भावभावना आहेत. त्यालाही इच्छा आहेत. जो जीवंतपणी जी इच्छा करतो. ती पुर्ण न झाल्यास तो मरणानंतरही लोकांना सतावतो. हेही अनन्याचं भुत. मरायची इच्छा नव्हतीच अनन्याला. पण याच गावच्या लोकांनी तिला ठार केलं. अन् आज ते गाव ओरडत आहे भुतांच्या नावानं. खरंच भुतं चांगली असतात माणसांपेक्षाही. माणसंच वाईट असतात भुतापेक्षाही. पण भुतं बदनाम होतात. कारण ती माणसं नसतात.

अलिकडं भुतं दिसत नाहीत. आज त्याला अंधश्रद्धा मानलं जातं आणि तसं कुणी बोलल्यास त्यालाही वेड्यात काढलं जातं. मात्र पुर्वीच्या काळी अशी भुतं असायची. असे काही लोकं सांगत असतात.

भुताचा अभ्यास केल्यास असं जाणवतं की ज्याप्रमाणं देवाचं लोकं अस्तित्व मानतात. तसे भुतांचंही अस्तित्व असावं. या भुतांचे मुख्यतः दोन प्रकार असावेत पहिला प्रकार म्हणजे चांगले भुत तर दुसरा प्रकार म्हणजे खोडकर भुत. चांगले भुत हे चांगले विचार ठेवतात. ते कोणाला त्रासच देत नाहीत. तर वाईट हे वाईट विचार ठेवत असून ते कोण्याही माणसांना तसेच निरपराध्यांनाही त्रास देत असतात.

भुत म्हणजे नेमकं काय? तर लोकांच्या म्हणण्यानुसार मेलेल्या माणसांचे आत्मे. जी आत्मे अतृप्त असतात ते. असा सर्वसामान्य अर्थ. पण खरी भुतं त्याला म्हणताच येत नाही. खरी भुतं त्यांनाच म्हणता येईल. जी जीवंत आहेत. पण जीवंत राहूनही त्यांच्यात किंचीतही माणुसकी नाही. ज्यांचे विचारच मेलेल्या माणसांच्या अतृप्त आत्म्यासारखे असतात. जे मुळात विचारच वाईट ठेवतात जीवंत असुनही. तसेच जे लाचारांना कधीच मदत करीत नाही. त्यांना सतत पायदळी तुडवतात. ज्यांच्याजवळ चांगला आचार विचार नसतो. तसेच जे भेदभाव करतात गरीब श्रीमंत, अस्पृश्य स्पृश्य, साक्षर निरक्षर.

आज बरेच लोकं असे आहेत की जे अतिरिक्त पैसा असुनही अजून पैसा कमविण्यासाठी भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब करतात. जे

लोकं धार्मीक स्थळी भरपूर पैशाचं दान तर देतात. पण प्रत्यक्षात एखाद्या गरीब, लाचार माणसांना झिडकारतात. अनाथांची हेळसांड करतात. आपला मुलगा कितीही वाईट असला तरी त्याला गोंजारतात आणि दुसऱ्यांचा मुलगा कितीही चांगला असला तरी त्याचा अपमान करतात. हे आपल्या मुलांचा सन्मान करणे व दुसऱ्यांच्या मुलांचा अपमान करणे ही लाजीरवाणी गोष्ट आहे तरीही...

समाजात असेही काही लोकं असतात की जे मालमत्तेसाठी सख्ख्या जन्मदात्या बापालाही ठार करतात. जे आपल्याच बहिणीवर बलत्कार करुन पाप करतात. एवढंच नाही तर ज्या मायबापानं लहानाचं मोठं केलं, शिकवलं. नव्हे तर ज्या मायबापामुळं नोकरी लागली, त्याला वृद्धावस्थेत वृद्धाश्रमात टाकतात. अन् जे त्यांच्या मरणालाही येत नाहीत.

काही लोकं असेही असतात की जे आपल्या तोंडाची चव वाढविण्यासाठी मुक्या प्राण्यांचा बळी घेतात. दूध देणाऱ्या गोमातेचा निष्कारण वध करतात. कोंबडे बकरे खातात नव्हे तर ते नवश पूर्ण होताच कापतात. त्यांचा अपराध नसतांनाही. तसेच जी मंडळी मासोळ्या, झिंगे तसेच इतर जलचर खातात. जे पशूपक्षांना पिंजऱ्यात ठेवतात. का? तर आपला छंद पुर्ण करण्यासाठी. खरंच

त्यांचं स्वातंत्र्य हिरावून काय मिळतं? माणूस आपल्याला स्वातंत्र्य मिळावं. म्हणून जुझतो. लढतो. आंदोलन करतो. अन् या मुक्या प्राण्यांची कत्तल करतो. त्यांचं जगण्याचं स्वातंत्र्य हिरावून घेतो. खरंच त्यांना जगण्याचा अधिकार नाही का? तरीही आपण त्यांच्या जगण्याचा अधिकार हिरावून घेतो. आपल्या ऐहिक सुखासाठी आपण जंगलाची कत्तल करतो. झाडं तोडतो. खरंच हे बरोबर नसलं तरीही.

जी मंडळी अन्न पिकवते. जी मंडळी या देशाला पोषते. त्या मंडळींना या देशात आत्महत्या करावी लागते. कारण त्यांच्याजवळ पैसा नसतो. त्यांच्यावर कर्ज झालेलं असतं. त्यांना सरकार वेतन देत नाही. सुखसोयी तर नाहीच नाही. कारण ते जास्त शिकलेले नसतात. सरकार त्यांनाच वेतन देतं, जे शिकलेले असतात. ज्यांच्याजवळ अतोनात भ्रष्टाचारी मार्गाचा पैसा असतो. तसेच त्यांनाच सुखसोयी मिळतात. जे शेतकऱ्यांएवढी मेहनत करु शकत नाहीत. ज्यांना शेतकऱ्यांसारखा ऊन, वारा, पाऊस झेलावा लागत नाही. छानपैकी चार भींतीमध्ये खुर्च्या तोडत ऊन, पाऊस, वारा न झेलता बसतात. मौज करतात. तरीही या शेतकऱ्यांकडून सातबाऱ्यासाठी वा कागदपत्रासाठी पैसे घेतात.

खरंच अशाप्रकारचं लोकांचं वागणं पाहिलं की वाटतं खरी भुतं यांनाच म्हणावी की जी माणसं निरपराधांना त्रास देतात. या भुतापेक्षा ती भुतं परवडली की जी त्यांच्या वाटेला गेल्याशिवाय त्रास देत नाहीत आणि ही जीवंत माणसं निरपराधांना वेळोवेळी छळत असतात. जी माणूसकी तर विसरतातच. शिवाय आपली वागणूक पशूसारखी ठेवतात. जी गुप्त धनासाठी आपल्याच स्वलेकराचा बळीही देतात.

अशाप्रकारचं लोकांचं वागणं व खऱ्या भुताचं वागणं यात काय फरक आहे? तसा फरक पाहिल्यास कोणताच फरक आढळून येत नाही. महत्वाचं म्हणजे भुत असतात ही आपली कल्पना असून भुत पाहायचा असेल तर तो अशाच प्रकारच्या माणसात सापडतो. ज्यांचं आचरण वाईट असतं. आपल्याला भुत जर बनायचं नसेल आणि कोणी आपल्याला भुत म्हणू नये असं वाटत असेल, तर प्रत्येकानं आपलं आचरण सुधरंवावं. जेणेकरुन आपली माणसात गणती होईल. नाहीतर लोकं आपल्यालाच खरी भुतं समजायला लागतील यात शंका नाही.

अनिरुद्ध लहान होता. तेव्हा त्याच्या मनात असली विद्या शिकण्याची इच्छा नव्हती. त्यानं मनात विचारही केला नसेल की

मी अशा प्रकारची विद्या शिकणार की ज्या विद्येतून मला समाजसेवा करावी लागेल.

अनिरुद्धचं बालपण हे अतिशय आनंदात गेलं होतं. तसं पाहता लहानपणीच नजर लागते, दृष्ट लागते हे त्याच्या अंगवळणी पडलं होतं. तो देखणा असल्यानं त्याला नित्य लोकांची दृष्ट लागत असे आणि त्याचं पोट दुखत असे. जेव्हा खुप पोट दुखत असे, तेव्हा त्याची आई मीठ मोवरी, मिरचे, केसं व झाडूची फांदी एका हातात घेवून त्याच्या अंगावरुन उतरवीत असे. त्यानंतर त्याला मागे सरकायला लावून ते अंगावरुन ओवाळलेले जीनस तप्त निखाऱ्यावर टाकत होती. ते निखाऱ्यावर टाकताच आई म्हणत असे. 'दृष्ट पक्की लागली. कारण मिरचीची खवपण आली नाही. ' कधीकधी आई मोवरी व मीठच उतरवून घेवून ती मोवरी विस्तवावर टाकत असे. मोवरी तप्त निखाऱ्यावर पडताच चटचट फुटत असे. तेव्हा आई म्हणत असे. 'मोवरी चटचट फुटली. पण एवढीशीही वास आली नाही. दृष्ट पक्की बसली होती. '

कधीकधी आई या तप्त निखाऱ्यावरील जळणारे निखारे एका मातीच्या गाडग्यात घेत असे. तो गाडगा अंगावरुन उतरवून पाण्यावर उपडा टाकत असे. त्याचबरोबर त्या ताटातील पाणी गाडग्यात शिरत होतं. त्यानंतर तो गाडगा कितीही वर उचलला,

तरी ताट खाली पडत नव्हतं. ते सर्व वैज्ञानीकतेनं घडून येत होतं. पण आई त्याला दृष्ट लागण्याचाच हवाला देत होती. कधीकधी आई गाईच्या शेणापासूनही दृष्ट काढत होती.

जसजसा अनिरुद्ध मोठा होत गेला. तसतसा तो अनुभवही शिकत गेला. त्याचंही गाव हे असंच भुताटकीचं होतं. गावात ठिकठिकाणी दगडाची देवं होती. कोणी त्यांना वाघोबा म्हणत, तर कोणी आंबागड्या म्हणत. कोणी पाणबुड्या म्हणत, तर कोणी मुंजाही म्हणत. प्रत्येकानं आपआपल्या सोयीनुसार वेगवेगळी भुतांची नावं ठेवली होती. अमुक माणसाच्या इथं कुसरी आहे. अमुकांच्या घरी देवता आहे. ती शिजलेलं अन्न नेते. धान्य नेते. अशा अफवा गावात चारही दूर पोहोचलेल्या होत्या. दरवर्षी आपल्याला गावाच्या बाहेरील ही भुतं झोंबू नये म्हणून अख्खं गाव या भुतांना कोंबडा बकरा बळी म्हणून देत. तर कोणी मांत्रीकही या भुतांना बकरा बळी म्हणून देतात व ते करतूत करुन घेतात असंही लोकं म्हणायची. अमक्याला पाणबुड्या लागला. अमक्याला चकव्यानं नेलं ह्या नित्याच्याच गोष्टी गावात होत असत. ह्या नित्याच्याच गोष्टी अनिरुद्धनं ऐकलेल्या होत्या.

दिवस संपायचा. दिवसा काहीही वाटत नव्हतं. पण रात्र जेव्हा येत असे. तेव्हा साऱ्यात लहान मुलात तसेच महिलात भीती निर्माण होत असे. तशी भीती अनिरुद्धलाही वाटत असे.

अनिरुद्धलाही अशा प्रेतांची भीती वाटत होती. ती प्रेतं आपल्याला नक्कीच सतावत असतील असं त्यालाही वाटत होतं. तसा तो लहानपणी घराच्या बाहेर पडत नव्हता.

भुत आहे. या कल्पना असतात. अगदी असं म्हणणं नव्वद टक्के लोकांचं असतं. भुत आहे या गोष्टी अगदी तिखट मीठ लावून सांगीतल्या जातात. काही वेळा भुताच्या नावानं लुटलं जातं. कधीकधी नवीन घर घेतांना त्यात नकारात्मक उर्जा असते असंही भाष्य केलं जातं.

एखाद्याची त्वचा जर खराबच असेल आणि त्याला फोडे झाले असतील. ते फोडे बसत नसतील तर काही लोकं नवीन कापडात वेगवेगळे धान्य बांधून ते रस्त्यावर टाकतात. त्यानं ते फोड बसतात असं सांगीतलं जातं.

भुताची दहशत ही ग्रामीण भागात जास्त असून एखाद्या ठिकाणी प्रकाश दिसणाऱ्या गोष्टींना तिथे भुतंच आहे असं मानलं जातं. स्मशानामध्ये तर असं बरेचदा घडतं. मुदडा जाळल्यानंतर जी राख गोळा केली जाते, त्या राखेत पूर्ण अवशेष गोळा केले जात

नाही. ते सुटतात. तेच घटक अंधाऱ्या रात्री चमकत असतात. कारण त्यातील पिवळा फास्फरस हा घटक जळत असतो.

पुर्वी जंगलामध्ये हिरवळ असायची. त्यातच मोरांचे पशूपक्षांचे आवाज असायचे. वादळांचा आवाज असायचा. वाऱ्याची लहर असायची. पाण्याचाही आवाज असायचा.

जंगलात वेगवेगळ्या वस्तू मिळायच्या. मध, चारं, बोरं, डींक, लाख मिळायचं. याचबरोबर कित्येक प्रकारचे प्राणी असायचे. आजही असतात. पण आता त्यांचं प्रमाण कमी झालेले आहे. हेच प्राणी कधी शिकारीनं मरायचे तर कधी नैसर्गीक मृत्यूनं. त्यांचं मांस जंगलातील जंगली प्राणी खायचे. पण हाडं मात्र तशीच राहायची. त्या हाडातील पिवळा फास्फरस जळायचा. कधी याच फास्फरस मधून आगही लागायची नव्हे तर धुरही दिसायचा.

स्मशानात अक्षरशः असा धुर आणि प्रकाश त्या अंधाऱ्या रात्री जास्त दिसत असे. एरवी लोकं स्मशानात भुत आहे असं मानायचे.

जंगलातील या प्राण्यांचे मरणे... त्यानंतर त्यांच्या शरीराचे विघटन होवून त्यापासून कार्बन व हायड्रोजनचे अणू रेणू तयार होणे, तसेच त्यांचा संयोग होवून त्यापासून संयुगे बनणे. हे विज्ञानानुसार घडत होते. त्यापासून कार्बन व हायड्रोजनचे संयुग

म्हणजे ch4 बनत असे. जेव्हा हा ch4 वातावरणातील ऑक्सीजनच्या संपर्कात येत होता. तेव्हा आपोआपच आग तयार होत होती. कारण आपल्याला माहित आहे की आग लागण्यासाठी इंधन आणि हवा एकत्र येणं गरजेचं आहे. जेव्हा मिथेनचा ऑक्सीजनशी संयोग होतो, तेव्हा आग तयार होते.

पुर्वी लोकांना ह्या गोष्टी माहित नव्हत्या. त्यामुळे अशी जर आग लागलीच तर ती आग भुतानं लावली असं मानलं जात असे. यावरुन भुत कल्पना पुढे आल्या. ज्ञान विज्ञान, शंका कुशंका अशा गोष्टीमुळे यात गुरफटलेल्या माणसानं ज्ञान नसल्यानं भुतावर पूर्णतः विश्वास केला.

कधीकधी कोणीतरी अनिरुद्धच्या आईला म्हणायचे की कोणालातरी दृष्ट लागली. तेव्हा आई त्या माणसाचं नाव एका कागदावर लिहायला लावत असे. किंवा त्या माणसाचा एखादा फोटो तिथं ठेवत असे. मग त्या माणसाचं नाव घेवून ती दृष्ट काढून देत असे. हे अनिरुद्धनं नेहमी अनुभवलं होतं. त्याच्या आईला चांगली दृष्ट काढता येत असे.

अनिरुद्ध मांत्रीक बनला. कारण त्याची आई. ती जादूटोणा शिकली होती. पण तिची जादू ही कुणाला त्रास देणारी नव्हती, तर ती आपल्यामध्ये असणाऱ्या या शक्तीनं कुणाचीही मदत करीत

असे. तेच बाळकडू अनिरुद्धला आपल्या आईकडून मिळाले होते. नाथपंथाची ही विद्या तो आपल्या आईकडूनच शिकला होता. ती विद्या कुणाची वाईट करणारी नव्हती. त्याची आई ही लोकांचं भलं करते. लोकं तिला चांगलं म्हणतात हे पाहून अनिरुद्ध आपल्या आईकडून ती विद्या शिकला होता.

दृष्ट काढण्याचे जे प्रकार आहेत. त्यात हनुमानजीलाही प्रसन्न करुन व साक्षीदार ठेवून ती दृष्ट काढली जात असे. साक्षात व्यक्तीला आपली दृष्ट ही प्रत्यक्ष मारुतीराया काढत आहेत असा भाष देवून ती दृष्ट काढली जात असे.

दृष्ट लागण्याची काही लक्षणे होती. काहीवेळा एखादा प्राणी किंवा व्यक्ती यांच्या मनात एखाद्या व्यक्तीबद्दल वाईट भावना निर्माण झाल्यास त्यांची दृष्ट त्या त्या व्यक्तींना लागत असे. तसेच काही प्राण्यांनाही तशी दृष्ट लागते असे पुर्वीचे लोकं मानत. ज्यावेळी अशी घृणास्पद कल्पना पन्नास टक्केपेक्षा जास्त व्हायची. तेव्हा नक्कीच दृष्ट लागली असं समजलं जायचं.

एखादा व्यक्ती हा जेव्हा आळशी बनत असे. त्या व्यक्तींमध्ये तीव्र डोकेदुखी, कान दुखणे, डोळ्याला अंधारी येणे, हातापायांना मुंग्या येणे, छातीत धडधड करणे, हात पाय गार पडणे इत्यादी लक्षणे जेव्हा दिसायची. तेव्हा नक्कीच दृष्ट लागली आहे असं

समजलं जायचं. त्या व्यक्तीवर अनीरुद्धची आई उपचार करायची. कधीकधी घरात भांडणं होणे, जातकानं घर सोडून जाणे, जातकाच्या मनात अनौरस विचार येणे, गाड्या वेगानं चालविल्यास अपघात होणे यालाही दृष्टच समजलं जाई. कधीकधी व्यसनाचं जास्त प्रमाण, औषध घेवूनही साधे साधे आजार बरे न होणे, पुष्कळ दिवस शारिरीक थकवा राहणे, त्यातच वारंवार आजारी पडणे यालाही दृष्ट लागली असं मानण्यात येई. तर कधी चांगला अभ्यास करुनही मुलगा परीक्षेत नापास होणे, गुण कमी येणे, विस्मरण होणे ह्याही गोष्टींला दृष्ट लागण्याच्या प्रकारात मोडलं जाई.

कधीकधी जीवन जगतांना नोकरी न लागणे, व्यवसाय न चालणे, कामधंदे बरोबर नसणे, व्यवसायात हानी होणे, फसवणूक होणे ह्या गोष्टीही दिसल्या तर दृष्ट लागली असं समजलं जाई.

विवाहाच्या बाबतही दृष्ट लागलेली आहे हे मानण्याची परंपरा होती. विवाह न होणे, पतीपत्नींचे न पटणे, विवाह तुटणे, गर्भधारणा न होणे, गर्भपात होणे, मुल अकाली जन्मणे, मतीमंद अपत्य जन्मास येणे, अपत्य बालपणातच मरणे. इत्यादी बाबतीतही लोक दृष्ट लागली असं मानत असत वा करणी केली आहे असंही मानत असत. कधी कधी ह्या दृष्टी वा करण्या प्रार्थनेने काढल्या

जात. त्यात दोन्ही तळहात आकाशाच्या दिशेने करुन प्रार्थना म्हटली जात असे. मात्र दृष्ट काढल्यानंतर मागे वळून पाहण्याची पद्धत नव्हती. त्याचं कारणंही तसंच होतं. जर मागं वळून पाहिलं तर वाईट शक्ती आपल्या मागंमागं येते व दृष्ट निघत नाही असं मानलं जाई. तसंच मनात देवाचं स्मरण करावं असं सांगीतलं जाई. तसंच कोणाशी काही बोलणंही टाळलं जाई. त्याचं कारण असं मानण्यात येई. ते म्हणजे ही अनावश्यक शक्ती कोणाशी बोलल्यानं नाका कानातून व डोळयातून पुन्हा अापल्या शरीरात प्रवेश करते. दृष्ट निघत नाही.

फालतूचे अनावश्यक बोलून ही दृष्ट शक्ती आपल्या शरीरात आणण्यापेक्षा नामजप केल्यास ती शक्ती शरीरातून संपूर्ण नाहीशी होते असं मानण्यात येई. त्यानंतर ज्याची दृष्ट निघाली त्यानं स्वच्छ अंघोळ करणं बंधन मानण्यात येत असे. परंतू ही केवळ अंधश्रद्धा असून या एखाद्या आजाराचा जंतूसंसर्ग काढण्यासाठी हा अंघोळीचा उपाय होता.

दृष्ट ही दिवसातून तीन चार वेळा काढण्यात येत असे. तसेच ही दृष्ट काढण्याला भाषेचे बंधन होते. यातील शब्द न् शब्द तीच भाषा राहायची. त्यामुळं ह्या दृष्टी काढण्याचे मंत्र त्या त्या भाषेत रुढ झाले. जशी गोंडी विद्या.

दृष्ट काढण्याचे काही लाभही होते. घरातील नकारात्मक उर्जा ही निघून जात असे. ही उर्जा निघाली की घरात शांतता निर्माण होत असे. तसेच या दृष्ट काढण्याच्या प्रकारानं दृष्ट शक्तीची तीव्रताही माहित होत होती. मिरचीची खव किती तीव्र आहे. यावरुन दृष्ट किती तीव्र होती हे माहित होत असे. मोवरीच्या जळणाऱ्या वासावरुनही दृष्टीची तीव्रता जाणवत होती. दृष्ट काढतांना माणसानं सकारात्मक भाव ठेवावा असं मानलं जाई. तेव्हाच या त्रासदायक शक्ती बाहेर पडतात असं समजलं जाई. माझी दृष्ट प्रत्यक्ष माणूस काढत नसून देवच काढत आहे असं मानलं जाई.

ज्याला दृष्ट काढता येते. त्यानंच दृष्ट काढावी असं मानलं जाई. ज्याला दृष्ट काढता येत नाही. त्याच्याकडून दृष्ट काढली जात नसे. कारण अशी दृष्ट ज्याला काढता येत नाही. त्याच्याकडून जर काढली गेली. तर ती दृष्ट न निघता दृष्ट काढणाऱ्या माणसांवरच ती दृष्ट हावी होत असे.

आजच्या विज्ञानवादी काळात ही दृष्ट लागणे, करणी करणे, जादू करणे, काळी जादू करणे, भानामती करणे या गोष्टी चालत नाही. कारण आज वैज्ञानीक काळ आहे. डॉक्टरी चिकित्सेनं बरेच आजार सुधारतात. दृष्ट लागणे यासारख्या गोष्टी मग भ्रामक कल्पना वाटतात. असे असले तरी आजही काही काही ठिकाणी असे काही

लक्षण आढळल्यास दृष्ट लागलेली आहे असे समजतात व ती काढण्यासाठी डॉक्टरकडे न जाता अशा अघोरी मार्गाचा अवलंब केला जातो नव्हे तर आजही पशूबळी नरबळी दिली जाते. अनिरुद्धने या सर्व गोष्टी आईपासून शिकल्या होत्या. त्या गोष्टी त्याला बऱ्या वाटल्या होत्या. म्हणूनच तो ती विद्या शिकला होता.

अनिरुद्ध हा लहानाचा जेव्हा मोठा होत होता. तसा त्यानं आपला गुणही वाढवला होता. सुरुवातीला वाटणारी भुताची भीती जसजसं वय वाढत होतं. तसतशी कमी होत होती. आज भुताबद्दलची त्याची भीती कमी झाली होती. ते पाहून भुतांनाही त्याचंच भय वाटत असावं असं वाटत होतं.

अलिकडे विद्यार्थी शिकतात. आपल्याला ज्ञान मिळावं म्हणून. त्यानुसार ते त्या त्या विषयात पारंगत होत असतात. त्या ज्ञानाचा उपयोग ते आपल्या आपल्या जीवनात करीत असतात.

काही लोकं कमी शिकतात तर काही लोकं हे खुप शिकलेले असतात. काहींचं उच्च शिक्षण तर काहींचं कनिष्ठ शिक्षण झालेलं असतं. ज्यांचं शिक्षण उच्चकोटीचं झालेलं असतं. त्यांच्यामध्ये थोडासा अहंकार आलेला असतो. ती मंडळी कमी शिकलेल्या माणसांना हीन समजतात. स्वतःला सुशिक्षीत समजतात.

शिक्षण शिकतांना ते कोणतं शिकावं हे आधी ठरवावं. कारण फालतूचं शिक्षण शिकून वेळ वाया घालविण्यात काही अर्थ नाही. ज्या शिक्षणाचा उपयोग आपल्या कामासाठी होत नाही. साधं आपण आपलं पोट भरु शकत नाही. असं शिक्षण शिकून फायदा कोणता? कारण आता काही लोकं भरपूर शिकलेले आढळतात. ते नोकरी शोधण्यात हयात घालवितात. मिळेल तो धंदा कधीच करीत नाही. त्यात त्यांना लाज वाटते. असलं शिक्षण कोणत्या कामाचं?

पुर्वीही लोकं शिकायची. पण त्यांना त्यांच्या शिक्षणाचा अहंभाव नसायचा. स्वातंत्र्यपुर्व काळात शिकलेल्या बहुतःश सर्व लोकांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग लोकांना साक्षर करण्यासाठी केला. नव्हे तर आपण आजच्या काळात कसे गुलाम आहोत हे शिकवलं. त्यामुळं येथील लोकं हुशार झाले आणि त्यांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी युद्ध पुकारलं.

डॉक्टर बाबासाहेबांनी जरी स्वातंत्र्यासाठी कार्य केलं नसलं, तरी त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या बांधवांना येथीलच आपल्याच लोकांच्या गुलामगीरीतून काढण्यासाठी केला. तसेच सावित्रीबाईनं आपल्या शिक्षणाचा वापर स्रीयांना साक्षर करण्यासाठी केला. आज जी स्री आपल्याला साक्षर दिसते आहे ना. ती सावित्रीबाईमुळेच. कारण मध्यंतरीच्या काळात

स्रीयांना शिक्षणाचा अधिकारच नव्हता तसेच स्रीयांना पुरुषांनी आपल्या हातातील कळसुत्री बाहूले बनविले होते. हे विसरुन चालणार नाही.

प्राचीन काळी गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्राही शिकल्या. त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग शास्रार्थ करण्यासाठी केला. जीजाई शिकल्या. त्यांनी शिवाजी घडवला नव्हे तर स्वराज्याची मुहूर्तमेढ त्यांनीच रोवली. महत्वपूर्ण गोष्ट ही की त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग चांगल्या कामासाठी केला.

काही लोकांनी शिक्षण हे घेतलं. पण त्याचा उपयोग चांगल्या कामासाठी केलेला नाही. जसे. शिवाजींच्या काळातही देशमुख, देशपांडे तलवारबाजीत निपुण होते. खुद्द शहाजीराजे तलवारबाजीत निपुण असूनही ते निजामशाही व आदिलशाहीची चाकरी करीत होते.

काही लोकं मांत्रीक विद्येत निपुण होते. दोनचार जर सोडले तर बहुतेकांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी कधीच केला नाही. त्यांनी त्यांना अवगत असलेल्या विद्येतून लोकांमध्ये भीतीयुक्त वातावरण तयार केलं. भुत असतो. तो आपल्याला छळतो नव्हे तर अंगात येतो इत्यादी अफवा पसरवून

फक्त व्यापार केला. नव्हे तर समाजात अंधश्रद्धा पसरवली. आजही काही ठिकाणी तेच प्रकार सुरु आहेत.

आज शिक्षणाचा उपयोग काही लोकं आपल्यापेक्षा कनिष्ठ लोकांना ब्लैकमेल करण्यासाठी करतात. तसेच अतिरिक्त स्वरुपाचा पैसा कमविण्यासाठी करतात. प्रसंगी भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब करतात. काही लोकं शिकतात, पण त्या शिक्षणाचा उपयोग हा आतंकवाद पसरविण्यासाठीही करतात. नव्हे तर काही लोकं शिक्षणाचा उपयोग कुणाला फसविण्यासाठी करतात.

महत्वाचं म्हणजे आपण घेतलेलं शिक्षण... ते घेतांना ते किती उपयोगाचं आहे हे पडताळून पाहावं. मगच घ्यावं. तंत्र विद्या किंवा ज्योतीषविद्या शिकायला मनाई नाही. पण त्या ज्ञानाचा वापर भवितव्य घडविण्यासाठी व्हावा. भय उत्पन्न करण्यासाठी नको. तसेच बॉंब बनविण्याचे शिक्षण घेण्यास मनाई नाही. पण त्यांचा वापर कशासाठी करावा त्याचाही विचार व्हायला हवा. जी माणसं निरपराध लोकांचा जीव घेत असतील, त्यांना शिक्षण घेवून काही उपयोग नाही. तशी माणसं निरक्षर राहिलेली बरी.

विशेष सांगायचं म्हणजे आपण घेतलेलं शिक्षण हे उपयोगाचं असावं व त्याचा वापरही आपण चांगल्यासाठीच करावा.

जेणेकरुन समाजाचा, देशाचा नव्हे तर जगाचा विकास होईल. देशच नाही तर जग सुधरेल हे तेवढंच खरं आहे.

********************

अनिरुद्ध जसजसा मोठा होत होता. त्याचबरोबर त्याच्यात बदल होत गेला. तो ती तांत्रीक विद्या शिकत गेला. ज्या विद्येचा वापर त्याची आई लोकांच्या उपयोगासाठी करीत होती. तिनं ती विद्या आपल्या उपयोगासाठी शिकली नव्हती तर जगाच्या कल्याणासाठीही शिकली होती. ती आपल्या विद्येनं जगाचं कल्याणच करीत होती.

एक दिवस असाही त्याच्या आयुष्यात उजळला. या दिवशी त्याच्या आईचं अकस्मात निधन झालं. त्याला अतिशय दुःख झालं. ज्यावेळी त्याची आई मरण पावली. तेव्हा त्याला खऱ्या अर्थानं अनाथ झाल्यासारखं वाटलं. कारण लहानपणापासून त्यानं आपल्या बापाला कधीच पाहिलं नव्हतं. त्याचा बाप लहानपणीच त्याला सोडून गेला होता.

बाप गेल्यानंतरही आई विचलीत न होता त्या आईनं त्याला सांभाळलं. लहानाचं मोठं केलं. त्याचं सुखदुख जपलं. पर्यायानं

सांगायचं म्हणजे त्याला अगदी फुलासारखं वाढवलं. एवढंच नाही तर आपल्या अंगातील गुणंही शिकवला आणि सांगीतलं की ह्या गुणांचा वापर त्यानं चांगल्या कामासाठी करावा. तसेच स्वतःची शपथही घालायला लावली.

आई गेल्यानंतर अनिरुद्धनं आपल्या अंगातील गुणांचा वापर चांगल्या कामासाठी केला नसता. परंतू त्याला त्याच्या आईनं शपथ टाकायला लावली होती. तसं वचनही तिनं त्याच्याकडून घेतलं होतं. त्यामुळं त्या गुणांचा वापर करतांना त्याला त्याची आई आठवत होती.

अनिरुद्ध हा कोकणातील रहिवाशी होता. ती कोकणातील उंच उंच माडाची झाडं त्याला आवडत होती. त्या ताडामाडासंगे खेळ खेळतांना त्याला काही समस्या यायची नाही. त्यातच त्या ताडामाडासोबत त्याचा जीव कसा जायचा ते कळायचंही नाही.

आई नित्य कामाला जात असे तर अनिरुद्ध शाळेत जात असे. मात्र सुट्टी जेव्हा असायची. तेव्हा तो जवळच्या ओढ्यावर जायचा. त्या ओढ्यावर तो मासोळ्या पकडीत बसायचा. सायंकाळी घरी येताच काही वेळानं आई यायची. ती डब्यात आणलेल्या मासोळ्या पाहायची. नव्हे तर त्या डब्यात मासोळ्या दिसताच त्याचेवर रागवायची. पण त्या रागावण्यातंही तिची प्रेमळता

झलकत असायची. त्यानंतर ती त्या मासोळ्या आणि भात बनवायची. ते बनवून झालं की रात्रीला दोघंही यथेच्छ जेवणावर ताव मारायचे.

आज आई जीवंत नव्हती. त्याला आईची आठवण यायची. कारण तिनंच लहानाचं मोठं केलेलं होतं. ती आठवण त्याला स्वस्थ बसू देत नव्हती.

त्यानं आता निर्णय घेतला होता. आपण कोकण सोडायचं. दूर कुठंतरी राहायला जायचं. त्याशिवाय आईची आठवण विसरणार नाही. असाच निर्धार करुन एक दिवस त्यानं कोकण सोडलं व तो विदर्भात दूर राहायला आला होता. त्याला वाटत होतं की यामुळं कदाचित आपली आठवणही विसरुन जाईल.

विदर्भातील या मातीमध्ये राहायला येण्यासाठी दोन कारणं कारणीभुत होती. एक म्हणजे आईची आठवण विसरणे व दुसरं कारण म्हणजे विदर्भातील सुनिता.

सुनिता नावाची ती मुलगी होती. ती मुलगी... जी सुंदर होती. रुपवान होती. तिची फेसबुकच्या माध्यमातून अनिरुद्धशी मैत्री झाली होती. नव्हे तर त्यांनी विवाह करण्याचं ठरवलं होतं.

आज त्याचं जे प्रेम निर्माण झालं होतं. त्यांची परियंती विवाहात झाली होती. त्यांनी विवाह केला होता.

त्या दोघांनी फेसबुकच्या माध्यमातूनच जवळ येवून विवाह केला होता. नव्हे तर त्या विवाहानंतर त्यांना एक पुत्ररत्नही झालं होतं.

आईची येणारी सततची आठवण... ती आठवण विसरता येत नव्हती. त्यामुळं की काय, अनिरुद्धनं कोकण सोडायचं ठरवलं. त्याला सुनिताच्या माहेरी यावसं वाटलं. ज्या गावात दिलजीत राहात होता. हे विदर्भात येणे म्हणजे सुनितानं सुचविलेलं शहाणपण होतं.

अनिरुद्ध विदर्भात राहायला आला. हळूहळू तो आईची आठवण विसरला. त्याचबरोबर ते कोकणंही... कारण या विदर्भात त्याच्या मागं काम भरपूर होतं.

कोकण मुळतः हिरवेगार होते. त्या कोकणात आंब्याची, फणसाची झाडं भरपूर होती. त्यातच काही ठिकाणी गावाच्या जवळंच चिंचेचीही झाडं असायची. त्याच चिंचेच्या झाडावर लावसट असते हे त्यानं लहाणपणापासूनच ऐकलं होतं. नव्हे तर कोकणातील त्या प्रसिद्ध भुतांची नावंही तो ऐकून होता. रात्री अपरात्री कोकणात कोणीही दिवस मावळल्यानंतर परीसरात भटकत नाहीत हे त्याला माहित होतं. त्यातच त्याच भीतीचा मांत्रीक मंडळी कसा फायदा घेतात हेही त्याला ठाऊक होतं.

रात्रीला त्याच्या घराजवळच्या चिंचेच्या झाडावर लावसट कशी थयथय नाचत असते. ते त्याला कोणीतरी सांगीतलं होतं.

कोकणातले ते देवचार नावाचे भुत कशी लोकांची भरभराट करुन देते हेही त्याने ऐकले होते. देवचार भुताला कोकणात धनाची देवता समजत असत. नव्हे तर हे देवचार नावाचं भुत बाजूच्या घरातून कसं धान्य आणि शिजलेलं जेवन आणते तेही त्याला माहित होतं नव्हे तर मांत्रीक मंडळी हे त्या देवचार नावाच्या भुताला कसं नारळात बंदीस्त करुन त्याचं वंशीकरण करतात. तिही विद्या तो शिकला होता. पण त्याने आजपर्यंत तरी कोणाला तसा नारळ अभिमंत्रीत करुन दिला नव्हता. चकवा ही त्याला माहित होता. पण या चकव्याला वश करताच येत नाही हे त्याला माहित होतं.

कोकणात असलेली चौदा भुतं. त्यांचे वेगवेगळे उपयोग हे सर्व त्याला माहित होते. परंतू आईच्या शिकविण्यामुळे तो त्या भुताचा फायदा घेवू शकला नाही. नव्हे तर त्याने आपल्या विद्येचाही वापर करणं बंद केले होते. अशातच तो विदर्भात आला. आपल्या पत्नीच्या माहेरी सुखसमाधानानं राहण्यासाठी.

अनिरुद्ध विदर्भात सुखसमाधानानं राहण्यासाठी आला खरा. पण त्याला या मातीतही सुखसमाधानानं राहता आलं नाही. कारण तो ज्या गावात राहात होता. ते अख्खं गाव भुतानं पछाडलेलं होतं.

दिलजीतनं अख्ख्या गावातच भुताची लागवण केली होती. त्यामुळं की काय अख्खं गाव डोलत होतं. बहुतेकांच्या अंगात ती स्मशानातील भुतं येत होती.

अनिरुद्ध जेव्हा कोकणात राहिला. तेव्हा त्यानं कधीही कोणाच्याही अंगातून भुतं काढलीच नाही. पण ज्यावेळी विदर्भात आला. तेव्हा अनिरुद्धने गावातील त्या लोकांच्या अंगात येणारी भुतं पाहिली. ती भुतं अंगात येत असल्यानं संपूर्ण गाव त्रस्त होतं. त्याला दया येत होती. त्यामुळं की काय, त्यानं निर्णय घेतला की तो या गावाला भुतापासून मुक्त करेल.

विदर्भातील मुलगी सुनिता... तिचे मायबाप जीवंत होते. अनिरुद्ध राहायला त्यांच्याचजवळ आला. त्याला आता मायबाप नसल्यामुळं त्यांनाच तो मायबाप समजायला लागला. तसे तिचे मायबापही त्याला आपला मुलगाच समजत होते. नव्हे तर त्यांना ती सुनिता ही एकुलती एक मुलगी होती. त्यामुळं त्यांनाही तिचीच आवश्यकता होती.

आपली पत्नी आणि मुलावर प्रेम करणारा अनिरुद्ध. त्याचं मन गावातील गावकऱ्यांची हालत पाहून खस्ता झालं होतं. तसं पाहता दिलजीतच्या भुत लावण्यानं लोकं दिलजीतला शिव्याच देत होते.

कितीही जुनी बाधा असेल. ती नाथपंथीय विद्येनं निघते. तसेच माणूस दोषमुक्त होतो. हे अनिरुद्धला माहित होतं. तसं त्याच्या आईनं सांगीतलं होतं. हा उपाय अमावस्येच्या रात्रीच करता येतो हेही सांगीतलं होतं. अनिष्ट शक्ती मनुष्याला त्रास देतात. हेही आईनं सांगीतलं होतं. पण या अनिष्ट शक्तींचा जो तारक ठरतो. तोच देव ठरतो वा देवाला प्रिय ठरतो हेही आईनं सांगीतलं होतं आपण अनिष्टकारी कार्य करु नये. त्याचे परिणाम हे चांगले निघत नाही. दुर्गती होते. जो चांगले करतो. त्यालाच मानलं जातं. लोकं त्यालाच भजतात. जो अनिष्ट कार्य करतो. त्याला लोकं पुजतही नाही. भजतही नाही. ह्याच आईच्या शिकवणुकीमुळं अनिरुद्ध आज चांगले कर्म करीत होता.

पुर्वीच्या काळी चमकणाऱ्या वीजा, होणारे भूकंप तसेच वादळं ही भुतं घडवून आणतात असं मानलं जाई. पण नंतर सिद्ध झालं की ह्या गोष्टी वैज्ञानीक आहेत. लोकं अशा प्रकारचा संदर्भ देवून शुद्ध फसवणूक करीत होते. परंतू ह्या गोष्टीला जेव्हा विज्ञानाची जोड मिळाली. तेव्हा आपोआपच मांत्रीकांचा मांत्रीकपणा कमी झाला. पण हे जरी सत्य असलं तरी गावात लागलेली भुतं पाहता ती असली की नकली याचा अंदाज बांधता येत नव्हता. आज जरी विज्ञान सशक्त असलं तरी मुस्लिम दर्ग्यातील लोकांच्या अंगात आणण्याच्या प्रवृत्तीला विज्ञान रोखू शकत नाही असं दिसतं. काही

लोकं या अशा घुमणाऱ्या लोकांना जेव्हा पाहतात. तेव्हा एक संदर्भ काढतात की या लोकांच्या अंगात येत नाही तर ह्यांचं मानसिक संतूलन बरोबर नसतं. म्हणूनच ही मंडळी अंगात आणून घुमत असतात.

पुर्वी अशा जादू करणाऱ्या लोकांना मारलं जात असे. आताही मारलं जातं. पण आता कायद्यानं थोडी बंदी घातलेली आहे. असं असलं तरी आजही अशा प्रथा कुप्रथा असल्या तरी सुरुच आहेत.

दृष्ट लागणे ही कुप्रवृत्ती जरी असली आणि ज्याला ती लागते, त्याला आपण मानसिक रोगी जरी समजत असलो तरी तरी ती प्रवृत्ती जीवघेणीही ठरु शकते.

चांगली प्रवृत्ती ही माणसांसाठी सकारात्मकता घेवून येते. तर वाईट प्रवृत्ती ही आपल्यासाठी नकारात्मकता घेवून येते. ज्या नकारात्मकतेने आपले शरीर कमजोर होत असते. याच नकारात्मकतेला मांत्रीक लोक जादूटोणा वा दृष्ट लागण्यात गणतात. अशा नकारात्मक शक्ती ह्या कुणाच्या पावलानंही येत असतात असं मांत्रीक मंडळी मानतात.

मांत्रीक मंडळी जादूटोणा वा करण्या करीत असतांना ज्या नकारात्मक वस्तू असतात. त्याचा प्रहार हा ज्यावर ते जादूटोणा

करु पाहतात. त्यांच्यावर करीत असतात. ज्या माणसांचा ते राग करतात. ज्या माणसांचा ते द्वेष करीत असतात किंवा ज्यांचा बदला काढायचा असतो.

संसारात काही वाईट तर काही चांगल्या गोष्टी असतात. ज्या चांगल्या गोष्टी असतात. त्याची गणती ही दैवीय शक्तीत तर ज्या वाईट गोष्टी असतात. त्यांची गणती ही दानवी शक्तीत होत असते. ह्याच दानवी शक्तीला भुत शक्ती म्हणत. याचाच वापर करुन मांत्रीक भुताची कल्पना पसरवून व्यापार करीत होते. अनिरुद्धनं ही विद्या शिकण्यासाठी बराच त्रास भोगला. जरी त्याची आई ही विद्या शिकविणारी होती तरीही... त्यानं अथक प्रयत्न केला म्हणून त्याला ही विद्या शिकता आली होती.

अनिरुद्ध विद्या शिकतांना सकाळी भल्या पहाटेला झोपेतून उठत असे. तो डोळे कुस्कारत कुस्कारत. त्यानंतर अंघोळ करीत असे. तिही थंड पाण्यानं. त्यातच अंगात कपडे न घालता तो आईसमोर बसत असे. आई जी काही करायची. ते सर्व तो पाहात असे. त्यानंतर आई जे म्हणायला लावायची. ते ते म्हणत असे. त्या आईच्या शिकविण्यातून लवकरच अनिरुद्ध ती नाथपंथीय विद्या शिकला. त्यात आकाशातील पक्षीही खाली पाडण्याची विद्या होती.

************

दिलजीत हा मोठा मांत्रीक बनला होता. पंचक्रोशीतील सर्व मांत्रीक त्याच्यापुढे टिकले नव्हते. त्यातच त्या मांत्रीकांनी दिलजीतला रोखण्याचा प्रयत्न केला. परंतू ते सर्व मांत्रीक त्यात यशस्वी ठरले नाहीत. त्यातच आता अनिरुद्ध लोकांच्या अंगात येणाऱ्या भुतांना रोकू पाहात होता. त्यानं गावातील अशा बऱ्याचशा लोकांच्या अंगात येणाऱ्या भुतांना त्यांच्या अंगातून काढलं होतं. तरीही भुत अंगात येण्याचा स्तोम कमी झाला नव्हता. आजही तो स्तोम सुरुच होता.

दिलजीतला जेव्हा हे माहित झाले. तेव्हा त्यांनं अजून चिढून जावून रान माजवले होते. तो आता रोजच अर्ध्या रात्री स्मशानात जावू लागला होता. त्यातच तो रोजच स्मशानातील भुतांना उठवून व संवाद साधून त्यांना गावात कुणा ना कुणाच्या अंगात भरायला लावत होता. आज गावातील काही लोकांचे भुतं निघत होते. तर काही लोकांच्या अंगात अजूनही भुतं भरत होते. ते पाहता अनिरुद्धही परेशान झाला होता.

दिलजीतला माहित होते की मागे गावकऱ्यांनी श्यामकांत नावाच्या मांत्रीकाला ठार केलं. त्यामुळे की काय,

दिलजीत आपली सुरक्षा कशी करायची ते पाहात होता. नव्हे तर त्यावर विचारही करीत होता. विचार करता करता दिलजीतला आठवलं की आपला जीव कोणालाही घेता येवू नये. त्यामुळं की काय, त्यानं एका पक्षात आपला जीव टाकला. पर्यायानं सांगायचं झाल्यास दिलजीतला कोणी कापून जरी टाकलं असतं. तरी दिलजीत मरु शकला नसता. कारण जेव्हापर्यंत तो पक्षी जीवंत आणि धडधाकट होता.

तो पक्षी म्हणजे एक कबुतरी होती. ह्या कबूतरीला तो आपल्याजवळ ठेवत असे. कारण त्याला वाटत होतं की कोणीही शिकारी त्या कबूतरीला शिकार करुन घेवून जाईल व आपला नाहकच जीव जाईल. त्यासाठी त्याचं ते प्रयोजन होतं.

तसं पाहता दिलजीत जेव्हा गावात राहात होता. तेव्हाच त्याला गावकऱ्यांची भीती वाटत होती. कारण त्यांनी गावातील मांत्रीक श्यामकांतला यमसदनी पोहोचवलं होतं. म्हणूनच तो कोणाला माहित न होता रात्रीच्या गर्द अंधारात स्मशानात जात असे तसेच दिवस उजळायच्या आतंच स्मशानातून परत येत असे. त्यातच बापानं घरातून हाकलून दिल्यानंतरही तो चूप बसला नाही.

तो त्या गृहेत राहात होता. जी त्या डोंगरावर होती. तसेच त्या डोंगरावर कोणालाही जायला मनाई नाही तर भीती वाटत असे. त्या डोंगरातील गृहेत लपून बसणे. ही गोष्ट देखील त्यानं आपल्या सुरक्षेच्या दृष्टिकोणातून केली होती. समजा कोणी गेलाही त्या डोंगरावर. पण गृहेत आतपर्यंत जायची कुणाचीही हिंमत होत नव्हती. आधीच दिलजीतच्या भुताटकीनं त्रस्त असलेलं गाव... त्यातच त्या डोंगरावर जाणं... त्यातच त्या गृहेतील प्रवेश... या सर्व गोष्टी दिलजीतने आपल्यासाठी संरक्षण देणाऱ्या केलेल्या होत्या. एवढेच नाही तर त्यानं आपला जीव कधीच जावू नये. म्हणून दिलजीतनं आपला जीव त्या कबूतरीत टाकला होता. जी कबूतरी त्याच्या अगदी जवळ जवळ राहात असे.

************

दिलजीतनं आपल्या जीवाला वाचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्याला वाटत होतं की जर मी माझा जीव या कबुतरीत टाकला तर मला कोणी मारु शकणार नाही. कारण माझ्याशिवाय ही गोष्ट कोणालाच माहित होणार नाही आणि तसं न झाल्यामुळं मला अभय मिळेल.

दिलजीतनं मनात जसा विचार केला होता. तसा तो आज अतिशय स्वस्थ होता. त्याला कोणत्याही प्रकारचा त्रास होत नव्हता. तसेच त्याची प्रकृती उत्तम राहात असे.

दिलजीत स्मशानात जायचा. स्मशानातील मुदड्यांना उठवायचा. ती भुतं थयथय नाच करुन त्याच्या भोवती गोल गोल नाचायची. त्यातच त्याला समाधान वाटायचं. त्याला आनंद व्हायचा आणि वाटायचं की त्याच्याएवढा कोणी मोठा नाही.

दिलजीतच्या मायबापांना दिलजीतला जन्म देवून पश्चाताप होत होता. ते आता म्हातारे झाले होते. त्यांच्यानं काम करणं होत नव्हतं. तरीही ते कसेबसे काम करीत होते. त्यानं आपल्या जीवंत मायबापाची सेवा करणं सोडून देवून मेलेल्या बहिणीच्या बदल्याच्या मागे लागला होता. त्यासाठीच तो असं अघोरी कार्य करीत होता. अशातच एक दिवस दिलजीतचे मायबाप मरण पावले. आता दिलजीत एकाकी झाला होता.

************

अनिरुद्धला वाटत होतं की गाव भुतमुक्त व्हावं. पण गाव काही भुतमुक्त होत नव्हतं. काही लोकांच्या अंगातून भुतं निघत

होती. तर काही लोकांच्या अंगात भुतं भरत होती. त्यामुळं अनिरुद्धनं त्यावर एक उपाय काढला.

त्यानं अख्खं गाव एकत्र केलं. त्यांना दिलजीतची माहिती दिली. तसेच त्यानं लोकांच्या मनातील भीती नष्ट केली. त्यानं सांगीतलं की आपण दिलजीत राहात असलेल्या स्थानावर हमला करायचा. मरणाला कोणीही घाबरु नये. आपण दिलजीतला ठार करायचं. तरंच या गावात घुमणारी भुतं नष्ट होतील.

सुरुवातीला लोकांनी विरोध केला. कारण त्यांना दिलजीतची फार भीती वाटत होती. त्यांना वाटत होतं की दिलजीत आपल्या भुतांना आदेश देवून भुतांना आपल्यावर सोडेल. त्यातच आपला मृत्यू होईल. त्यामुळं ते घाबरत होते. पण नंतर त्यांना वाटलं की गावातील भुतानं पछाडलेली अशी माणसं मरतात. कदाचित एखाद्या वेळी आपलाही क्रमांक लागू शकतो. असंही मरायचं आहे. तसंही मरायचं आहे. त्यापेक्षा आपण दिलजीतचा विरोध करुन मेलं तर... येणारी आपली पीढी सुखानं राहिल. असाच विचार करुन आज अख्खं गाव अनिरुद्धच्या पाठीमागं उभा झाला होता.

************

आज अनिरुद्ध पुर्ण गावकऱ्यांना घेवून दिलजीत राहात असलेल्या गृहेजवळ गेला. त्याच्यासोबत लोकं असल्यानं त्याला थोडा धीरही आला. प्रत्येकांच्या जवळ म्हशाली होत्या. ते तसे गृहेत शिरले.

गृहा फारच लांब होती. आतमध्ये शिरताच पूर्णतः अंधार पडला. परंतू अनिरुद्धनं माग वळून पाहिलं नाही. तो पुढं होता. पुढं होवून चालतच होता.

अनिरुद्ध त्या अंधाऱ्या गृहेतून जात होता. त्याचेपाठोपाठ गावकरीही होते. ती दिवसाचीच वेळ होती. पण तरीही त्या अंधाऱ्या गृहेत अंधार असल्यानं भीती वाटत होती. त्याचबरोबर एकेक वटवाघुळ उडत उडत त्या गावकऱ्यांसमोरुन जात होते. आज त्या गृहेत अंधार असल्यानं तशी रात्रच वाटत होती.

आज ती गृहा म्हणजे स्मशानच वाटत होतं. कदाचित आजुबाजूला सापासारखे प्राणी लपलेले असतील असे वाटत होते. तसे ते गावकरी आवाजही करीत होते. त्या आवाजानं ती गृहा गजबजली होती.

काही वेळातच ते गृहेचं दार आलं. त्या दाराजवळंच दोन भुतं चौकीदार म्हणून ठेवलेले होते. ते चौकीदार... ज्या चौकीदारांना कोण आलं याची कल्पना नव्हती. ते फक्त फिरत होते. पण त्यांना दिसत होतं की नाही हेही सांगता येत नव्हतं. तसेच त्यांना ऐकू येते की नाही हेही जाणवत नव्हतं.

थोड्याच वेळात वाघाची डरकाळी ऐकायला आली. लोकांनी पुढे पाहिलं तर दुसरा दरवाजा दिसला. तोही भुतिया दरवाजा होता. त्या दरवाज्याच्या दोन्ही बाजूला दोन वाघाचे सांगाडे दिसले. त्यांचे डोळे लाल रंगाने चमकत होते. नव्हे तर त्यातून अाग निघत असल्यासारखी भाषत होती. त्यांची ती लालसर जीभ तोंडातून बाहेर आली होती. त्यांच्या समोर त्या दरवाजामधून अनिरुद्ध आत शिरला. पुढचा भाग हा मोसमाचा होता. तिथं तीन कप्पे बनवले होते. पहिल्या भागात प्रवेश करताच तप्त उन्हाळा वाटत होता. तिथं राहाणं मुश्किल होतं. भयंकर उकाडा जाणवत होता. तसा अनिरुद्धनं मंत्र म्हटला. त्याचबरोबर तिथं आल्हादकारक वातावरण तयार झालं. उष्णतेचा प्रकोप जो झाला होता. त्या प्रकोपाचा प्रभाव त्या मंत्रानं कमी केला होता. तसा अनिरुद्ध पुढं सरकला. त्याचबरोबर दुसरा भाग आला. या भागात थंडीचा प्रकोप होता. भयंकर थंडी वाटत होती. उभं राहाणंही मुश्किल वाटत होतं. तसा अनिरुद्धनं मंत्र म्हणताच अचानक वीज

चमकते, तसा लख्ख प्रकाश पडला. क्षणातच अंधार पडला. पण त्या म्हशालीच्या उडेडात सगळं व्यवस्थीत झालं.

अनिरुद्ध पुढे चालत होता. त्याचबरोबर गावकरीही त्याच्या पाठीमागं चालत होते. चित्रविचीत्र आवाज आजूबाजूला घुमत होते. कधी कधी मधातच घंट्यांचा आवाजही येत होता. त्याचबरोबर कुत्रे भुंकण्याचाही आवाज येत होता. तसेच सिंहगर्जनाही ऐकायला येत होती.

तो भुतिया अड्डा... त्या अड्ड्यात जागोजागी माणसांच्या हाडाचे सांगाडे दिसत होते. काही ठिकाणी प्राण्यांच्या हाडांचे सांगाडेही होते. नव्हे तर काही प्राण्यांच्या कापलेल्या मानाही लटकल्या होत्या. त्यांचे डोळे चमकत होते. त्यातच काही लोकांचं लक्ष जाताच ते मुंडके गोलगोल फिरत होते. तसं त्यांच्या त्या डोळ्यातून रक्तही बाहेर आल्याचा भाष होत होता. त्यातच काहीतरी धपकन आपटल्याचा भाष झाला आणि ते मुंडके मनुष्यवाणीने बोलू लागले.

"जा इथून. मागे फिरा. तुम्ही कोणाला विचारुन आल्याय. तुम्ही जर नाही गेले तर मरणाला मुकाल. "

ती मनुष्यवाणी... त्यातच ती मेलेल्या प्राण्यांची मुंडकी. ती भुतिया बोल बोलत होती. त्यामुळं सर्वांनाच भीती वाटत होती.

परंतू अनिरुद्ध घाबरला नाही. तो पुढे सरकतच होता. त्याचबरोबर लोकंही... अशातच तिसरा कमरा आला. या तिसऱ्या कमऱ्यात तो पाऊस अचानकच कोसळायला लागला. त्याचबरोबर वादळंही सुटलं होतं. सर्व पिशाच्च त्या वादळात व पावसात विहार करीत होते. हसतही होते मोठमोठ्याने. नव्हे तर ' जा इथून, जा इथून ' सारखे आवाज काढत होते. तसे लोकं अतिशय धास्तावले होते. पण अनिरुद्धनं आपल्या सोबतच्या गावातील लोकांना प्रेमानं सांगीतलं की ही भुतं काहीही करणार नसून या भुतांना तुम्ही घाबरु नका. हिंमत ठेवा. त्यातच चारही बाजुचे दरवाजे बंद झाले व सर्वत्र अंधार पडला.

सर्वत्र अंधार पडला होता. कोणताच गावकरी कुणालाही दिसत नव्हता. ना त्यांचे डोळेही कोणाला दिसत होते. अनिरुद्धही दिसत नव्हता. तसा अनिरुद्धचा आवाज त्या भुतिया महालात घुमला.

"घाबरु नका. ही भुलभुलैया आहे. "

सर्वत्र अंधार असल्यानं लोकं घाबरले होते. त्याचप्रमाणे त्या अंधारात भुतिया कोठडीत भयंकर आवाज येत होता. त्यांना माहित होतं की आता आपण जगू शकणार नाही. तरीही भीतीनं कोणाला सोडलं. ती गावकऱ्यांना सोडणार. तसं गावकऱ्यांना वाटत होतं.

अनिरुद्ध पुढं सरकला. तसे ते गावकरीही पुढे सरकले. तोच अनिरुद्धच्या समोर अचानक भुत प्रगट झालं. त्याचबरोबर अनिरुद्धही पुरता घाबरला. त्याला पुरता घाम सुटला. तसा तो बाजूला झाला. जसा भुत अनिरुद्धच्या समोर आला होता. तसा अनिरुद्धनं क्षणाचाही विलंब न करता लगेच मंत्र म्हटला. त्याचबरोबर ती मायावी भुतं आपोआपच नष्ट झालीत.

अनिरुद्ध पुढं सरकत होता. तसतशी भुतं समोर येत होती. तसा तो मंत्रही म्हणत होता आणि क्षणातच भुतं नष्ट होत होती. कसलेतरी चित्र विचित्र आवाज चारही भोवताल फिरत होते. कुठून तरी भांडे पडण्याचा आवाज येत होता. कधी प्राण्यांच्या ओरडण्याचा आवाज येत होता. कधी कोणाचा रडण्याचा तर कधी माणसाच्याच ओरडण्याचा आवाज येत होता. हा पाठशिवणीचा खेळ सतत सुरु होता. त्याचबरोबर अनिरुद्धलाही थोडी भीती वाटतच होती. तरीही तो हिंमतीनं पुढं सरकत होता. गावकऱ्यांनाही हिंमत देतच होता. अशातच तो मुख्य भाग आला. ज्या ठिकाणी दिलजीत बसला होता.

****************

दिलजीत जिथं बसला होता. तिथं त्याच्या समोरच अग्नीकुंड ठेवलेलं होतं. त्याच्या बाजूलाच एक माणसाची कवटी होती. तशी उजव्या बाजूला एक छडी होती. त्यानं काळे कपडे घातलेले असून तो प्रत्यक्ष एक जादूगारच वाटत होता. त्यानं आपल्या गळयात एक रुद्राक्षाची माळ घातली होती.

दिलजीतनं जसं गावकऱ्यांना पाहिलं. तसा त्याला अचंबा वाटला. पण तो घाबरला नाही. त्याचा पारा तसा जास्तच वाढला व त्यानं आपल्या हातात थोडसं पाणी घेतलं. ते पाणी तोंडाजवळ नेलं. तसा काहीतरी तो पुटपूटला. बहुतेक तो मंत्रच असावा. तसं ते पाणी त्यानं अग्नीकुंडात टाकलं. त्याचबरोबर तो म्हणाला,

"जा रे माझ्या लेकरा. लवकर जा. या संपूर्ण गावकऱ्यांना बंदी बनव. "

असं म्हणताच त्या अग्नीकुंडातून ती भुतं निघाली. ती भुतं जीवंत माणसांसारखी चालत चालत त्या गावकऱ्यांपर्यंत आली. त्या भुतांनी अनिरुद्धसह त्या सर्व गावकऱ्यांना घेरलं. तसं त्या भुतांनी त्या संपूर्ण गावकऱ्यांना साखळदंडानं बांधून टाकलं होतं.

अनिरुद्ध साखळदंडात बांधला गेला होता. त्याला साखळदंड तोडणं कठीण होत होतं. अशातच त्या संपूर्ण परिसरात पांढरा शुभ्र

धुरही पसरत चालला होता. तो धूर त्या धुरात गावकऱ्यांचा जीव कासावीस होत होता.

ही मांत्रीका मांत्रीकांची लढाई... सत्याविरुद्ध असत्य लढत होतं. दिलजीत अघोरी विद्या शिकलेला मांत्रीक होता. तर अनिरुद्धही काही कमजोर नव्हता. दोघंही लढत होते. त्या मायावी विद्येनं. ज्या विद्या इतिहासजमा झालेल्या होत्या.

अनिरुद्ध मंत्र म्हणतच होता. पण त्याची युक्ती काही केल्या चालत नव्हती. तसा तो प्रयत्न करीतच होता. पण त्याचे प्रयत्न निष्फळ ठरत होते. परंतू क्षणाचाच अवकाश... अनिरुद्ध साखरदंडातून मुक्त झाला. त्याचबरोबर त्यानं त्या गावकऱ्यांनाही साखळदंडातून मुक्त केलं होतं.

सर्व गावकरी व अनिरुद्ध साखळदंडातून मुक्त झाले. तसं अनिरुद्धनं मोठ्या जोराचा हसण्याचा आवाज ऐकला. तसं त्यानं आजुबाजूला पाहिलं. सर्वत्र पांढरा धुसरपणा निर्माण झाला होता. कोणी कोणाला दिसतही नव्हता. पण काही वेळातच तो धूर निवळला व त्यानं पाहिलं की ज्या ठिकाणी अग्नीकुंड होतं. तिथं अग्नीकुंड दिसत नव्हतं.

अनिरुद्धला प्रश्न पडला की हे अग्नीकुंड गेलं कुठं? त्यानं इकडं तिकडं पाहिलं. त्याला दिसलं की या ठिकाणी दिलजीतही

नाही. त्याला दिलजीतही दिसला नाही. अशातच त्यानं ध्यान लावलं.

अनिरुद्धनं ध्यान लावताच त्याला दिलजीत दिसला. दिलजीतनं आपल्या सामर्थ्यशक्तीनं मधमाशीचं रुप घेतलं होतं. तसा अनिरुद्ध त्याच्या मायावी विद्येबद्दल समजला.

अनिरुद्धनं पुन्हा मंत्र म्हटला. त्यानं त्यासाठी ओंजळीत पाणी घेतलं. ते पाणी मंतरुन ते पाणी त्यानं आजुबाजूला फेकले. त्याचबरोबर दिलजीतच्या मधमाशीचं रुपांतर आता पुन्हा दिलजीतमध्ये झालं.

भुत... भुत ओळखण्याच्या अनेक पद्धती आहेत. ज्या व्यक्तीला भुत लागलेलं असतं. त्या व्यक्तीचे डोळे थोडे लाल दिसतात. तसेच ज्या व्यक्तीच्या शरीरात भुत असते, ती व्यक्ती परस्परविरोधी क्रिया करते. त्याचप्रमाणे भुत लागलेल्या व्यक्तीला भयंकर ताकदही असते. त्यांची भाषा ही सर्वसामान्यांना समजण्यासारखी नसते. ती वेगळीच भाषा असते. तसेच भुत पीडीत व्यक्तीच्या चेहऱ्यावर नेहमी रागच दिसून येत असतो.

असा व्यक्ती जर परिसरात आढळला तर कोणी त्याला मानसिक विकृती आली असं म्हणतात. कोणी भुत लागला असेही म्हणतात.

मानसिक विकृती आली असे समजणे ठीक आहे. त्यासाठी डॉक्टर कडे जाणेही ठीक आहे. पण भुत लागला असे समजून पशू पक्षाचे बळी देणे वा मांत्रीकाकडे जावून नाहकत ज्या माणसांमध्ये अशी विकृती आली, त्याला त्रास देणे बरे नाही.

ती गृहेतून जाणारी विषारी वाट. आजुबाजूला सापाचे फुसकारणारे आवाज. जणू ते साप अनिरुद्धच्या नजरेत विष टाकत होते. ते साप डोळ्यांना दिसत नव्हते. मात्र भीती जास्त वाटत होती.

दिलजीतची नजरही अशीच बनलेली होती. त्याचे डोळेही लाल होते. त्यालाही भुतानं झपाटलं असावं असंच वाटत होतं. पण त्याला भुतानं झपाटलं नव्हतं. तर तो एक मांत्रीक होता.

दिलजीतला अनिरुद्धनं मधमाशी रुपातून माणसाच्या रुपात आणलं. त्याचबरोबर दिलजीतला कळून चुकलं की आता आपली बरी वेळ नाही. आपले दिवस भरत आले असावेत. तशी त्याला श्यामकांतची आठवण आली.

दिलजीत मनानं विचार करु लागला अनिरुद्धला नेस्तनाबूत करण्याचा. पण अनिरुद्ध काही नेस्तनाबूत होत नव्हता. त्याला अजून बळ येत होतं. तो नव्या दमानं दिलजीतला पराजीत करू पाहात होता.

दिलजीतनं आता आपले सर्व प्रकार आजमावले. पण ते सर्व प्रकार अनिरुद्धसमोर फोल ठरत होते. तशी अनिरुद्धच्या विद्येचीच सरशी होत होती.

दिलजीत मात्र अनिरुद्धच्या विद्येसमोर टिकाव धरु शकत नव्हता. अनिरुद्धही दिलजीतला हारु शकत नव्हता.

अनिरुद्धला वाटलं की जर दिलजीतची विद्या ही अशीच सुरु राहिली तर तो कधीच हारणार नाही. पर्यायानं त्याची विद्या भारी जाईल. तेव्हा आपण आपल्यात असलेल्या शक्तीनं त्याची विद्याच निष्प्रभ करायला हवी. त्यानं जो विचार केला. त्यानुसार तो त्याची विद्या निष्प्रभ करण्याचा विचार करु लागला.

अनिरुद्ध सारखं सारखं पाणी ओंजळीत घेत होता. मंंत्र म्हणत होता. तसं ते पाणी आजुबाजूला फेकत होता. तसा आतं त्यानं मंत्र म्हटला. सर्व देवदेवता आणि पशूपक्षी, यक्ष, किन्नर व दानवांंना प्रार्थना केली व म्हटलं की या दिलजूतच्या अंगातील विद्या जर सात्वीक नसेल तर पूर्णतः निघून जावू दे. त्यानं तशी प्रार्थना करुन तो मंत्र म्हणताच व ते पाणी अभिमंत्रीत करताच ते पाणी दिलजीतच्या दिशेनं फेकले. त्याचबरोबर एक दिव्य चमत्कार झाल्यासारखा भाष झाला. क्षणातच दिलजीतच्या अंगातील गुण संपला असं वाटत होतं.

दिलजीत आता अनिरुद्धवर पलटवार करण्यासाठी मंत्र म्हणू लागला. पण आता त्याच्या जवळील मंत्रविद्या संपल्यानं तो काहीही करु शकत नव्हता. अनिरुद्ध त्याचेवर भारी पडला होता.

मंत्रशक्ती चालत नव्हती. युक्तीही चालेनाशी झाली होती. तसं त्याला त्याचा अंतकाळ दिसला. त्याला वाटलो की आता आपण संपणार. तसा तो विचार करु लागला. विचाराअंती त्याला आठवलं की आपण तर यांच्या हातानं मरणार नाही. मग काय करायचं. आपला जीव तर त्या कबुतरीत आहे. ती कबुतरी सोडावी. तो धावला त्या पिंजऱ्याकडे, ज्या पिंजऱ्यात कबुतरी ठेवलेली होती. ती कबुतरी अनिरुद्धच्या हातात लागेल. त्याहीपुर्वी त्यानं पिंजरा घेतला व तेथून पळ काढला.

तो गृहेचा दुसरा दरवाजा... त्या दरवाज्यातून दिलजीतला पळता भुई सुधरत नव्हती. तो धावत होता. तसा त्याच्या पाठीमागं अनिरुद्धही होता. पळता पळता अनिरुद्धन पाहिलं की दिलजीतनं तो पिंजरा उघडलेला आहे. नव्हे तर त्यातील त्या कबुतरीला मुक्त करीत आहे.

कबुतरी त्या पिंजऱ्यातून मुक्त झाली होती. ती बऱ्याच दिवसानं त्या पिंजऱ्यातून मुक्त झाल्यानं ती मुक्तविहार करण्यासाठी आकाशात उंच उडाली. ती एवढी उंच उडाली होती की ती

दिसेनाशी झाली होती. अनिरुद्धनं ती कबुतरी दिलजीतनं ती कबुतरी उडवितांना पाहिलं होतं. त्याला तेव्हा काहीच समजलं नव्हतं.

****************

दिलजीत पुढे जीव ओतून धावत होता. तर त्याच्या पाठीमागून अनिरुद्धही. अशातच दिलजीत दिसेनासाा झाला. कारण त्याची धावण्याची गती जास्त होती. त्याला वाटत होतं की आता आपला अंतकाळ काही जास्त दूर नाही. आपल्या अंगातील विद्या संपलेली आहे. तरीही एक प्रकारचं अभय त्याला होतं. आताही त्याला वाटत होतं की जेव्हापर्यंत ही कबुतरी जीवंत आहे. तेव्हापर्यंत आपण जीवंत राहू. सवड मिळताच आपणही बदला घेवू.

काळाकुट्ट अंधार पडला होता. पण दिलजीतशी लढता लढता गावकऱ्यांना वेळेचं भान राहिलं नव्हतं. दिलजीत पळत होता. तो थेट त्या स्मशानाच्या दिशेन. तो तसा स्मशानात आला. ज्या स्मशानात त्या गुहेतील आवाजासारखे चित्रविचीत्र आवाज

येत होते. कधी बांगड्या वाजविण्याचा आवाज येत होता. कधी लहान बाळाच्या रडण्याचा आवाज येत होता.

ते स्मशान... त्या स्मशानात नेहमीप्रमाणे पांढरा धुर निघत होता. तर कधी रक्ताळलेली प्रेतं दिसत होती. कधी माणसाचे अवयव दिसत होते. तर कधी जमीनीतून रक्ताळलेले हात वर येत होते. अशा त्या स्मशानात दिलजीत आला. नव्हे तर तो त्या स्मशानात लपून बसला.

अनिरुद्ध धावत होता दिलजीतच्या मागे. पण रात्रीच्या त्या अंधारात दिलजीत वेगानं धावत असल्यानं त्याला दिसलाच नाही. तसा तो विचार करु लागला, दिलजीत कुठे असेल? असा प्रश्न त्याला पडला. तसं क्षणातच त्याला आठवलं की दिलजीत हा एवढ्या रात्री स्मशानातच जावू शकतो.

दिलजीत स्मशानात गेला असेल असं त्याला वाटलं. तोही स्मशानाच्या दिशेनं निघाला. त्यालाही तसाच अनुभव येत होता. कुठं प्रेतांची अवयवं पडलेली दिसत होती. कुठं प्रेतं पडलेली दिसत होती. तेच ते त्या गृहेतील चित्रविचित्र आवाज येत होते. कुठे लहान बाळाचे रडण्याचे आवाज तर कुठे मोठ्या माणसांचे रडण्याचे आवाज, कुठे भांडे पडण्याचा आवाज तर कुठं बांगड्या वाजविण्याचा आवाज. सारखी भीती वाटत होती. तसे ते

रक्ताळलेले हात जमानीतून वर निघत होते तर कुठून तृणांकुर उगविल्यागत माणसाच्या मुंडक्या जमीनीतून बाहेर आल्यासारख्या गाडलेल्या दिसत होत्या. त्या मुंडक्यांपैकी काही मुंडक्या ह्या जीवंत असून त्या बोलत होत्या. काही मुंडक्या हसत होत्या तर काही मुंडक्या रडतही होत्या. हसणाऱ्या मुंडक्यांमध्येही भय वाटतच होतं. ते वर येणारे हात पाहता मनात धडकी भरीत होती. नव्हे तर काही हात हालचाल करीत होते. काही ठिकाणी पायही हालचाल करतांना दिसत होते.

अनिरुद्धन गावकऱ्यांना आधीच सांगीतलं होतं की आपल्याला असे चित्रविचित्र भाष होतीलच. पण घाबरायचं नाही. ती दिलजीतची भुतं आपल्याला काहीही करणार नाहीत. कारण मी तुमची सुरक्षा म्हणून तुमच्या सभोवताल सुरक्षा कवच करुन दिलेले आहे. तुम्ही बंधनात असल्यानं ती दिलजीतची भुतं फक्त तुम्हाला भीती दाखवू शकतील. तुम्हाला क्षती पोहोचवू शकणार नाहीत. ती भुतं अनिरुद्धच्या म्हणण्यानुसार त्या गावकऱ्यांना भीती दाखवत होती. पण क्षती पोहोचवीत नव्हती. तरीही भीती ती वाटत होतीच.

दिलजीत विद्या विसरला होता. अनिरुद्धच्या कार्यकर्तृत्वानं दिलजीतच्या अंगातील विद्या समाप्त झाली असली तरी तो जेव्हा स्मशानात पोहोचला. तेव्हा स्मशानातील त्या भुतांना म्हणाला,

"हे भुतांनो, मी तुमची आजपर्यंत इमानी इतबारे सेवा केलेली असून मी तुमची कित्येक संकटं दूर केलेली आहेत. आज माझ्यावर संकट आहे. हे संकट तुम्हाला दूर करायचे आहे. तेव्हा हे माझ्यावरील संकट दूर करा.

दिलजीतनं म्हटल्यानुसार ती भुत त्या स्मशानात कहर बरसवू लागली. संपूर्ण स्मशानच आज उठल्यासारखं वाटत होतं. ती भुतं त्या स्मशानात थयथय नाचत होती. चित्रविचित्र आवाज करीत होते. तसा दिलजीत त्या स्मशानात लपून बसला होता.

अनिरुद्ध आता स्मशानात पोहोचला होता. त्याच्या हातात तसं ते कमंडलू होतंच. त्या स्मशानात पाणी होतंच. तो त्या कमंडलूतील पाणी घ्यायचा. मंत्र म्हणायचा. ते मंतरलेलं पाणी त्या भुताच्या अंगावर शिंपडायचा. त्याचबरोबर ते भुत नष्ट होत होती. पण परत ती भुतं उभी होत होती.

अनिरुद्ध परेशान झाला होता. त्याला काय करावं सुचत नव्हतं तरीही तो गालकऱ्यांना सांत्वना देत होता नव्हे तर हिंमतही त्यांच्यात भरीत होता. ते गावकरी त्या काळया अंधाऱ्या रात्री त्या भुतांशी लढत होते. परंतू त्या गावकऱ्यांची शक्ती त्या स्मशानी शैतानी भुतांसमोर कमी पडत होती. त्या भुतांच्या तडाख्यात काही गावकऱ्यांची शुद्ध हरवली होती. अशातच वेळ होत होता.

अशातच कोंबडा आरवण्याचा आवाज आला व रात्री जागत असलेली व गावकऱ्यांशी लढणारी भुतं क्षणार्धात नष्ट झाली. बहुधा ती भुतं त्या कोंबड्यांना घाबरली असावी असं वाटत होतं. पण तसं काही कारण नव्हतं. तर ती भुतं उजेडाला घाबरत होती. अंधारात त्यांना शक्ती जास्त येत होती. म्हणून त्या भुतांनी रात्री कहरच केला होता.

सकाळ झाली होती. तशी स्मशानातील परिस्थीती जैसे थे अशी झाली. रात्रीचा तो थरार बंद झाला होता. दिलजीतचं रात्रीला काहीच चाललं नाही. तसं दिलजीतला लोकांनी पकडलं.

दिलजीतला लोकांनी पकडलं. ते दिलजीतला मारहाण करु लागले. पण दिलजीतला एवढासाही ओरखडा आला नव्हता वा त्याला काहीही लागत नव्हतं. त्या गावकऱ्यांनी त्याचा श्यामकांतप्रमाणे जीव घेण्याचा प्रयत्न केला. पण त्याला काहीही झालं नाही. तसा अनिरुद्ध लोकांना म्हणाला,

"तुम्ही त्याला मारु नका. तो आपल्या करणीची सजा भोगेल.
"

लोकांनी अनिरुद्धचं ऐकलं. त्याला सोडून दिलं. तसा दिलजीत अहंकारानं म्हणाला,

"तुम्ही माझा जीव घेवूच शकत नाही. कारण माझा जीव त्या कबुतरीत आहे. जी कबुतरी मी पिंजऱ्यातून केव्हाच सोडून दिलीय. ती कबुतरी जेव्हापर्यंत सापडणार नाही. तेव्हापर्यंत मलाही काहीच होणार नाही. "

दिलजीत बोलून गेला खरा... पण आता अनिरुद्धला रात्रीची ती गोष्ट आठवली. रात्री दिलजीतनं गृहेतून बाहेर निघताच कबुतरी उडवली होती. तसा दिलजीतचा अहंकार तोडण्यासाठी अनिरुद्धनं एका हातात पाणी घेतलं. तद्वतच मंत्र म्हटला. त्यातच ते मंतरलेलं पाणी त्या आकाशाच्या दिशेनं फेकलं आणि म्हटलं,

"हे कबुतरी, तू जिथं कुठं असशील. तिथून तू परत ये आणि माझ्या पायाजवळ ये. "

मंत्र म्हणताच काही वेळातच घोंगावणारं वादळ सुटलं. क्षणातच ते वादळ क्षमलं. त्याचबरोबर असं वाटायला लागलं आकाशातील हवेनं वाहाणं बंद केलं की काय, जणू आकाशात हवाच नाही. त्याचबरोबर ती कबुतरी चमत्कार केल्यागत पंख फडफडत अनिरुद्धच्या पायाजवळ आली. अनिरुद्धनं तिला उचललं व म्हटलं,

"हे कबुतरी मला माफ कर. या दिलजीतला मारण्यासाठी तुला आपलं जीवन त्यागावं लागेल. "

तसा अनिरुद्ध त्या कबुतरीची मान पिरगाळू लागला. तसा दिलजीतही म्हणाला,

"नको नको. तिला मारु नको. तिच्याच माझा जीव असून ती मरताच मी मरेल. "

ते शब्द व ते वाक्य... ते शब्द बोलेपर्यंत ती कबुतरी मरण पावलेली होती. पण दिलजीतला काहीही झालेलं नव्हतं. तो अद्यापही जीवंत होता. त्याला आश्चर्य वाटत होतं. कारण तो जीवंत होता.

दिलजीत जीवंत होता. लोकं त्याला मारु पाहात होते. पण त्याला तरीही काही होत नव्हतं. तेव्हा अनिरुद्ध लोकांना म्हणू लागला.

"लोकहो, माफ करा याला. हाही आपल्यासारखाच. पण याची बहिण गावातील काही माणसांनी मारल्यानं यानं ही विद्या हस्तगत केली. कशासाठी? तर आपल्या बहिणीच्या हत्येचा बदला घेण्यासाठी. यानं जे काही गावासोबत केलं, ते बरोबर जरी नसलं तरी ते एका अर्थानं बरोबरच होतं. तुमची कोणातीही बहिण असती आणि असं छळलं असतं तर तुम्ही काय केलं असतं. तुम्ही बदलाच घेतला असता की नाही. "

लोकांना ते समजलं. ती गोष्ट खरंच विचार करण्यालायक होती. आपणच चुकलो असं त्यांना वाटायला लागलं होतं. तसा तो दिलजीतला म्हणाला,

"दिलजीत, कोणाचाही मृत्यू हा कोणत्याही पशूपक्षात नसतो. त्याप्रमाणे तुझाही मृत्यू त्या कबुतरीत नव्हताच. माणसाचा मृत्यू हा माणसाच्या कर्मानुसार ठरत असतो. कोणी म्हणतात की माणूस जर लवकर मरण पावला तर तो स्वर्गात आपल्या कर्माची फळं भोगत असतो. पण तसं काही नसून माणसाच्या बऱ्यावाईट कर्माची फळं ह्या पृथ्वीवरच भोगावी लागतात. जो जसे कर्म करेल. तसं फळ त्याला मिळतं. तेही या पृथ्वीवरच मिळत असतं. म्हणून तुला सांगतो की आतातरी सुधर. कारण आता तुझ्या बहिणीच्या खुनाचा बदला पुर्ण झाला आहे. तिला स्वर्गात जावू दे. मोक्ष मिळू दे. "

अनिरुद्धच्या बोलण्यानं दिलजीत आनंदावला होता. कारण त्याला अनिरुद्धनंच नाही तर संपूर्ण गावकऱ्यांनी माफ केलं होतं. तसं त्यानं आकाशाकडे पाहिलं व हात हालवत म्हणाला,

"ताई, जा. स्वर्गात जा. तिथं तू त्या स्वर्गातील मृत आत्म्यांसोबत सुखानं राहा. तुझा बदला पुर्ण झाला आहे. जा. "

तसं म्हटल्याबरोबर दिलजीतच्या चेहऱ्यावर प्रसन्नता निर्माण झाली व त्यानं सुटकेचा श्वास सोडला.

दिलजीत सुधरला होता. ती मांत्रीक विद्या तो विसरला होता. आता तो चांगले दिवस काढत होता.

त्यानं लवकरच विवाह केला व तो त्याच गावात राहू लागला. आता मात्र त्याला मांत्रीक विद्या कळत जरी असली तरी येत नव्हती.

सुरजीतच्या अंगातील दिलजीतच्या बहिणीचा आत्मा केव्हाच त्याला सोडून गेला होता. तोही आता दिलजीतच्या बहिणीच्या भुताच्या समस्येतून मुक्त झाला होता.

गाव पूर्णतः अशा भुताटकीपासून मुक्त झालं होतं. मात्र आजही अनिरुद्धची वैयत्की चालतच होती. त्याच्यात बदलाव झाला नव्हता. आजही तो लोकांना गंडे, धागे, दोरे बनवून देत होता. नव्हे तर त्यावरच उदरनिर्वाह चालत होता.

भुतं मात्र समाप्त झाली नव्हती. ती आजही त्या स्मशानी वाटेनं जाणाऱ्यास पछाडतच होती. तसेच अनिरुद्ध ती भुतं काढत होता नव्हे तर ती काढण्याचा पैसा आजही घेत नव्हता.

आज अनिरुद्ध म्हातारा झाला होता. मात्र अनिरुद्ध म्हातारा झाला असला तरी त्याचेमध्ये अहंंकारीपण आलं नव्हतं. तो विना अहंकारीमनानं आजही गावातील सुरजीतच्या अंगातील भुतं काढतच होता. गाव तेवढं सुधारलं होतं. काही तरुण आजही अशा

भुतांच्या अंगात येण्याला मामसिक विकृती समजत होते. पण काही लोकं मात्र आजही भुतं मानत होती. ती अशी भुतं शरीरातून निघताच अशा दगडाच्या देवासाठी कोंबडा, बकरा बळी म्हणून देत होते. नव्हे तर असे बकरे बळी द्यायला अनिरुद्धच सांगत होता.

दिलजीतही बरेच वर्ष जगला होता. त्यानं ज्या कबुतरीमध्ये जीव टाकला होता. ती कबुतरी केव्हाच मरण पावली होती. त्या कबुतरीचा वध अनिरुद्धनंच केला होता. मात्र तरीही दिलजीत आजही जीवंत होता. तो अनिरुद्धचे उपकार मानत होता.

आज दिलजीत व अनिरुद्ध चांगले मित्र बनले होते. ते एकमेकांच्या घरी जात होते. एकमेकांची टिंगल टवाळकी उडवीत होते. नव्हे तर त्यांच्या टिंगल टवाळकीत त्याच भुताच्या गोष्टी निघायच्या.

गाव मात्र पुरतं सुधरुन गेलं होतं. कोणी कोणावर बलात्कार करीत नव्हतं. त्या गावातील तरुण तरुणी आता भावाबहिणीच्या नात्यानं राहात होते. कारण त्या गावानं बलात्कार करण्याचा परिणाम भोगला होता. बहिणीवर झालेल्या बलत्कारातूनच बदल्याच्या भावनेनं दिलजीतनं अघोरी विद्या शिकून घेतली होती व त्याच विद्येचा गैरवापर करुन दिलजीतनं संपूर्ण गावातच

भुताटकी लावली होती. त्यामुळं अख्खं गाव घुमलं होतं. ते दिवस अजुनही गाव विसरलं नव्हतं.

आजही ती डोंगरावरील गृहा अस्तित्वातच होती. ज्या गृहेत कित्येक दिवस दिलजीतनं अधिवास केला होता. मात्र आता तो तिकडं जात नव्हता. कारण आता त्यालाही तिकडं जायला भीतीच वाटत होती. नव्हे तर आज ती डोंगरातील गृहा हिंस्र श्वापदांचा अड्डा बनला होता.

गाव जरी सुधारलं असलं आणि गावात जरी नवविचाराचे वादळ निर्माण झाले असले तरी आजही त्या गावात भुतं झोंबतच होती. परंतू ती झोंबण्याचा असर कमी झाला होता.

ते स्मशान... तो भयानक रस्ता आजही लोकांना आठवत होता. त्या स्मशानातील रहस्य आजही लोकांना आठवत होते. ती दिलजीतनं दिलेली जखम आज जुनी झाली होती. पण ती जखम जुनी झाली असली तरी आजही तिचे व्रण तेवढे शिल्लक होते. ते व्रण काळजाला बोचणारे होते. नव्हे तर त्या व्रणानं व त्यानंतर त्या दिलजीतचा प्रतिकार केल्यानं गावाची भुतांबाबतची भीती थोडी कमी झाली होती.

आज रात्री अपरात्री लोकं त्या स्मशानातून जात. पण भीती बाळगून नाही तर बिनधास्त जात. विज्ञान प्रगत झालं होतं. या

विज्ञानानं केलेल्या प्रगतीनं माहित झालं होतं की स्मशानात राखेतून राहिलेली हाडं चमकतात. त्याचं कारण पिवळा फास्फरस होय. हा पिवळा फास्फरस स्वतः जळतो. तो स्वतः जळत असल्यानं तो अंधारात चमकतो. हे एकदा सिद्ध झालं होतं. त्यामुळं की काय, आता रात्री अपरात्री माणसं या स्मशानातून फिरतांना जो स्मशानात धुर निघायचा. त्याला घाबरत नसत.

रात्रीला येणाऱ्या कुत्र्याच्या आवाजाची आता सवय झाली होती. ती कुत्री कधी चोरावर, तर कधी रात्री मोकाट फिरणाऱ्या इतर प्राण्यांवर भुंकतात हेही सिद्ध झालं होतं. कारण ही गोष्ट बरेचदा गावातील लोकांनी पाहिली होती. तसेच रात्रीला रस्त्यावरुन उडत उडत आडवे येणारे वटवाघूळ निशाचर असल्यानं ते आडवे येतात हेही माहित असल्यानं त्यांचीही रात्रीला भीती वाटत नव्हती. शिवाय कोण्या माणसाचा तुटलेला हात दिसणे वा चेहरा दिसणे हा केवळ आपल्याला होणारा भाष होय हेही प्रत्यक्ष लोकं जाणून होते.

गावातील काही तरुण शिकत होते. ते उच्च शिक्षण घेत होते. त्यामुळं जगात असं कोणतंच भुत नसतं. त्या आपल्या भ्रामक कल्पना असतात. हे तत्वज्ञान तीच मंडळी प्रसवत होती. त्यामुळं साहजिकच आज गावातील दिसणारी तसेच भासणारी भुतंही कमी झाली होती.

ही सर्व भीती अनिरुद्धनं कमी केलेली असली तरी आजही अनिरुद्ध मांत्रीकी काम करतच होता. पण आता त्याचं काम जोरात चालत नव्हतं तर त्याच्या कामात शिथीलता आली होती. अनिरुद्धनंही मांत्रीक विद्येतून भरपूर पैसा कमविला होता. त्या पैशातून अनिरुद्धनं गावातच काही शेती विकत घेतली होती. आता तो शेती करीत होता. तसंही कोणी आलंच तर मांत्रीकपणाही करीत होता.

भुत आणि प्रेताविषयी लोकांनी अनेक किस्से ऐकले असतील आणि ऐकतातही... काही लोकं आवर्जून सांगतात की आम्ही भुत पाहिला. आम्ही भुतांशी लढाई खेळली. भुत अंगात येतो. परंतू आधुनिक विज्ञानवादी काळात या भुत मानण्याला अफवा समजले जाते. त्यावर कोणीही विश्वास ठेवत नाही.

जगात अशी अशी काही जागा आहे की त्या जागेच्या ठिकाणी हमखास अपघात होतो. तसंच त्या अपघाताचा संबंध भुतांशी लावला जातो. कोणी कोणी सांगतात की रिकाम्या मकानात, झाडावर, जंगलात हमखास भुतं असतात. पण ते ज्यानं प्रत्यक्ष अनुभवलं. त्याला समजतं. इतरांना नाही.

काही लोकं म्हणतात की मृत्यपुर्वी इच्छा पुर्ण न झाल्यास ती इच्छा पुर्ण करण्यासाठी त्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याचं भुत बनतं.

मग हे भुत आपली इच्छा पुर्ण करण्यासाठी भटकतं. कोणाला त्रासही देत असतं. जो व्यक्ती उपाशी पोटी मरतो. ज्या व्यक्तीला भयंकर राग येतो. अशाही व्यक्तीचं भुत बनतं असेही काहीजण म्हणतात. यावर काही लोकं उपायही सांगतात की आपल्या घरातील अशा अतृप्त मेलेल्या माणसांचं तर्पण केल्यास ते भुत संतुष्ट होवून त्याला मुक्ती मिळते. म्हणूनच की काय आज मेलेल्या माणसांच्या नावानं श्राद्ध घातलं जातं. तर्पणही केलं जातं. जेणेकरुन या अतृप्त आत्म्यांनी स्वजणांना भुत बनून त्रास देवू नये. हे जरी खरं असलं तरी हा तर्पण आणि श्राद्ध घालण्याचा प्रकार हा व्यापार करणारा प्रकार आहे. तर्पण केल्यानं खरंच आत्मा किंवा भुत शांत होवू शकेल काय? तर त्याचं उत्तर नाही असंच येईल. कारण मृत्यूनंतर आपली आत्मा कुठे जाते कुठे नाही हे कोणीही पाहिलेलं नाही. तसेच तर्पण किंवा श्राद्ध घातल्यानं असे भुतं किंवा अशा अतृप्त आत्मा सुखावत असतात. हेही कुणीही पाहिलेले नाही. त्यातच जर असं तर्पण किंवा श्राद्ध घातल्यानं असे मृतात्म्ये सुखवत असतील तर मायबापांची वा वृद्ध माणसांची सेवा कोणीही करणार नाही. तर्पण किंवा श्राद्धच घालत राहतील.

आज आपण पाहतो की लोकांची मुलं ही विदेशात जातात. स्थिरावतात. विवाह करतात. मुलं पैदा करतात. पण मायबापाकडे लक्ष देत नाही. बिचारे मायबाप आपल्या मुलांसाठी तडपत तडपत

मरतात. तरीही मुलं साधे मैयतीला येत नाही. भेटणं दुरच. अशावेळी आपल्या जन्मदात्या बापाचा शाप लागतो म्हणून तर्पण वा श्राद्ध करुन मोकळा झालो. असे समजणारा विदेशातील मुलगा खरंच अशा तर्पण केल्यानं वा श्राद्ध केल्यानं मायबापाच्या शापातून मुक्त होवू शकत असेल काय? तर त्याचं उत्तर नाही असंच आहे. कारण त्याने जी कृती केलेली असते. ती कृती ही क्षम्य नसते. कारण ती कृती ही त्यानं जाणूनबुजून केलेली असते. हं एखाद्याचं ठीक आहे की ज्याला कर्तव्यापुढं मायबापांना वेळ देता येवू शकत नसेल. जसं हिंदू धर्मात रामाचं झालं. आई कैकेयीचं वचन पाळतांना त्याला बापाच्या दाहसंस्कारावेळी उपस्थीत राहता आलं नाही.

जे आत्म्याचं वर्गीकरण झालेलं आहे. त्यानुसार स्थुल शरीर, सुक्ष्म शरीर व शरीर. स्थुल शरीर म्हणजे मरणापुर्वीचं शरीर, सुक्ष्म शरीर म्हणजे त्याची आत्मा किंवा भुत, तसेच शरीर म्हणजे मृत्यूनंतर ओस पडलेलं शरीर. स्थुल शरीर हे साधारणतः योग किंवा व्यायामानं एकशे पन्नास वर्षापर्यंत जीवंत ठेवता येवू शकतं. त्यानंतर त्याच्यापासून बनलेल्या आत्म्याची काही निश्चीती नसते. तो आत्मा साधारणतः हजार वर्षही जीवंत असतो वा तो एका सेकंदातही मिटतो असं पुराण सांगतं. त्यानंतर शरीर. हे शरीर काही जास्त दिवस जतन करुन ठेवता येत नाही जरी आपण बर्फातही

ठेवत असू. कारण मेल्यानंतर शरीरात प्राणवायू, पाणी जात नसल्यानं आपल्या शरीरातील काही अवयवांचं व घटकांचं विघटन होतं व शरीर हळूहळू नष्ट होत असतं.

ज्यांचं मन तृप्त झालेलं नाही, असं भुत बनलेलं किंवा आत्मा बनलेलं शरीर हे जी माणसं वाईट कर्म करतात. त्या माणसांना लवकर जकडतं असं मानलं जातं. तसेच जी माणसं घरात होमहवन करीत नाहीत. शांती पाठ करीत नाही. मायबापांची, म्हाताऱ्या माणसांची सेवा करीत नाही. मांसं मदिरा सेवन करतो. परस्त्रीशी संबंध ठेवतो. अशांनाही जकडतं. तसेच जी माणसं कमजोर असतात. अशा शरीर व मन कमजोर असलेल्या माणसांना भुत लगट करत असतात.

भुत ज्याला लागतं, त्याच्या स्वभावात परिवर्तन होतं. तो वेड्यासारखा वागायला लागतो. चांगला मुड असल्यास शहाण्यासारखे वागणे व राग येताच रौद्र रुप दाखवणे ह्या गोष्टी घडत असतात. शरीरात सतत कंपन राहात असतं.

या भुताच्या त्रास देण्याचे प्रकार आहेत.

१)पिशाच पीडा :- ही एक पीडा आहे. या पीडेत व्यक्ती किंवा व्यक्तीसमुदाय हा आपोआपच आपले कपडे काढून नग्न होण्याचा प्रयत्न करीत असतो. कधीकधी नाल्यातील घाणेरडे पाणी पीत

असतो. नाशलेले जेवन खात असतो तसेच वाईट वाईट शब्दही वदत असतो. जसे घाणेरड्या शिव्या देत असतो. असा व्यक्ती सदैव घाणेरडा राहात असून त्याच्या शरीराचा सतत वास येत असतो. त्याला एकांत आवडते व तो त्याच एकांतातून कमजोरही बनत असतो.

२)शवपीडा :- या पीडा प्रकारातील व्यक्ती हे जोरजोराने ओरडत असतात. तसेच इकडे तिकडे धावत असतात. ते कोणाचेही ऐकत नसून असे व्यक्ती प्रत्येक वेळीच घाणेरड्या शिव्या देत असतात. ते काहीही खात नसून जोरजोरात श्वास घेत असतात.

३) शांकीनी पीडा :- या प्रकारचा त्रास जास्तीत जास्त महिलांना होतो. अशा महिलांचं पुर्ण शरीर दुखतं. अशा महिला साधारणतः बेहोश होत असून जेव्हा त्या होशात येतात. तेव्हा त्या रडतात, ओरडतात. तसेच मोठमोठे डोळे करीत असतात. अशा प्रकारच्या वागण्यानं यांचे डोळे हे सतत दुखतही असतात.

४)चुडैल पीडा : चुडैलचा त्रास साधारणतः महिलांनाच होत असून अशा महिला मांस व मदिरेचं सेवन करीत असतात. जरी त्या शाकाहारी असतील तरीही... त्या कमी बोलत असून सतत मोठ्याने हासत असतात. अशा महिला कोणाला काय करतील ते काही सांगणे कठीण असते.

५)यक्षपीडा :- ह्या प्रकारची पीडा असणारे व्यक्ती हे अतिशय हळू आवाजात बोलत असून त्यांचं चालणं जोराचं असतं. ते जास्तीत जास्त डोळ्यानंच इशारे करतात. त्यांचे डोळे लाल दिसत असून त्यांना विशेषत्वानं लाल रंग आवडतो.

६)ब्रम्हराक्षस पीडा :- ज्या लोकांना ब्रम्हराक्षस लागतो, असा व्यक्ती पुस्कळ शक्तिशाली बनत असतो. तो सदैव चुपच राहात असतो. तसेच कोणावरही उपकार करणारा असतो. याला कोणी कोणी जिंद देखील म्हणतात. अशा प्रकारचा व्यक्ती जेवन भरपूर करीत असून एकाच अवस्थेत भरपूर वेळ बसून राहू शकतो. ह्या प्रकारचे व्यक्ती कोणाला जास्त त्रास देत नाहीत. पण त्यांना कोणी जेवन दिलं नाही तर अशी व्यक्ती ही कोणाचा जीवही घ्यायला मागंपुढं पाहात नाही.

भुत हे अदृश्य रुपात राहात असून ते त्यांचे शरीर हे वायूचे बनलेले असते. ते शरीरविहिन असतात. तसेच ते कोणाचेही शरीर धारण करु शकतात.

भुतांना ताकद फार असते. ते कोणतेही असो, हे काम भुत चुटकीसरशी करत असतात. तसेच ते मोठमोठी झाडं देखील उपटून टाकत असतात. मांत्रीक मंडळी ही अशाच भुतांचा वापर करुन मोठमोठी कामं करीत असतात. असं लोकं सांगत असतात.

भुतांची मानसिक स्थिती ही अधिक शक्तीशाली असते. त्यांना वशमध्ये करुन त्यांच्याकडून चांगले वाईट कामं करता येतात. ती कोणती कामं करावी हे आपल्यावर अवलंबून असते. तसेच भुतांना विशिष्ट आकार नसल्यानं त्यांना तलवारीने वार करता येत नाही. काठीने मारता येत नाही. बंदूकीच्या गोळ्याही मारता येत नाही.

भुतांमध्ये चांगल्या वाईट भावना असतात. एव्हाना ते कधी रडतात तर कधी हसतही असतात. यानुसार त्यांच्या स्थानांनाही नाव आहे. जर ती वाईट ठिकाणी राहात असतील तर त्या ठिकाणाला प्रेतलोक म्हणतात व जर ती चांगल्या ठिकाणी राहात असतील तर त्याला पितृलोक म्हणतात. चांगली भुतं ही चांगल्या विचाराच्या लोकांचा शोध घेतात. तसेच त्यांना चांगल्या लोकातच राहावेसे वाटते. तसेच वाईट भुतं ही ज्याप्रमाणे वाईट जागेत राहतात. तसेच वाईट लोकांना शोधतात. ते कुकर्मी, अधर्मी, वासनामयीन लोकांमध्ये शिरुन आपल्या इच्छा पुर्ण करीत असतात. अर्थात जसजशा मानसिकतेची माणसं समाजात वावरत असतील. अशाच माणसांच्या शरीरात प्रवेश करण्यासाठी भुत धडपडत असतात. त्यांनाही माणसाचं शरीर आवडत असतं. चांगल्या आत्मा ह्या चांगल्या माणसात शिरुन त्यांना चांगले कर्म करण्यासाठी प्रेरीत करीत असतात. तर वाईट आत्मा ह्या वाईट

लोकांमध्ये शिरुन त्यांना वाईट कर्म करण्यासाठी प्रेरीत करीत असतात.

भुत हे नेहमी आपल्या मुक्तीसाठी विचार करीत असतात. त्यांना जेव्हा भुतयोनीतून मुक्तीचे मार्ग सापडत नाहीत. तेव्हा मात्र ते तडपत असतात. चिडचिडेही होत असतात. आपल्या भुतयुक्तीतून मुक्त होण्यासाठी भुत हे जंगलाजंगलात भटकत असतात. कधी चकव्याच्या रुपाने तर कधी कोणत्याही रुपाने. तसेच ते हजार हजार वर्षपर्यंत जीवंतही राहू शकतात.

भुताला एकांतवास प्रिय असून ज्या ठिकाणी जास्त आवाज असेल त्या ठिकाणी भुतं दिसत नसून ते जास्तीत जास्त अमावस्येच्या रात्रीच दिसतात. त्याचं कारणही तसंच आहे. कारण अमावस्येच्या रात्री गच्च अंधार असते. जर या अमावस्येच्या रात्री कोणी फिरत असेल आणि तो व्यक्ती त्यांच्या मार्गात आलाच तर ते त्याला छळतात. कारण ज्याअर्थी भुतांना एकांतवास आवडतो. त्यावेळी आपण फिरत असतांना त्यांचा एकांतवास तुटतो. तसं पाहता भुतांना एकांतवास आवडत असल्यानं ते रात्रीच फिरतात. कारण रात्री जास्त लोकं फिरत नसतात. हे त्यांनाही माहित असतं. तरीही जाणून बुजून लोकं जर रात्री फिरत असतील तर त्या लोकांना

भुतांचं छळणं साहजिकच आहे. भुतं हे साधारणतः अशा ठिकाणी वास करतात की ज्याठिकाणी भुतांचे हितसंबंध असेल.

अनिरुद्ध म्हातारा झाला होता. तो आता म्हातारा झाला खरा. पण आता त्याला धड मंत्रही बोलता येत नव्हते. तसं त्याला नीट चालताही येत नव्हतं. त्याला ऐकताही येत नव्हतं. बोलणं तर पूर्णतः बंद झालेलं होतं. एरवी त्याची गावोगावी सुकिर्ती गेल्यानं त्याला कोणी दोष दिला नाही. त्यामुळं की काय, त्याचं म्हातारपण चांगलं जात होतं. त्याची पत्नी आणि मुलं त्याची चांगली काळजी घेत होते. याउलट दिलजीतचं होतं.

दिलजीतलाही चालता येत नव्हतं. पण त्याला कानानं स्पष्ट ऐकायला येत होतं. डोळ्याला स्पष्ट दिसत होतं. हातंही धडधाकट होते. मेंदूही शाबूत होता. पण पाय मात्र गेलेले होते. त्याला अजिबात चालता येत नव्हतं. तरुणपण ते... त्या तरुणपणात त्यानं धुमाकुळ घातला होता. पण आता मात्र त्याच्या म्हातारपणात त्याला काही जगण्यात अर्थ उरला नव्हता. त्याला मरावसं वाटत होतं. पण आता मरण येत नव्हतं. घरी बायकापोरं नसल्यानं त्याची सेवा घडत नव्हती. तशातच त्याला पायानंही चालता येत नसल्यानं तो घुसत होता एखाद्या सापागत. हात पसरुन तो भिक्षा मागत होता. त्याच्या अंगावर काळे कुट्ट कपडे होते.

अतिशय दुःखदायी अवस्था. त्याची किळस येत होती. कोणी दयेनं एखादा रुपया हातात द्यायचा. कोणी नाक मुरडून जायचे. तर कोणी कुटकाभर भाकरही द्यायचे खायला. तर कधी अजिबात खायला मिळायचं नाही. भुक खुप लागलेली असायची. पण उपाय नव्हता. कधी आजारी पडलाच तर औषधी घ्यायलाही पैसा नसायचा. कोणी रुग्णालयातही न्यायचं नाही. फार वेदना व्हायच्या. तसे ते जुने दिवसही आठवायचे. त्या वेदना झेलत झेलत त्याला जगावं लागत होतं.

त्याला ते दिवस आठवायचे. ज्या दिवसात तो संपूर्ण गावात त्याची दहशत होती. सगळं गाव त्याला घाबरत होतं. पण आज... आज मात्र तेच गाव त्याला शिव्या देत होतं. कोणी म्हणत होतं. ' भिकारडा साला. याले असंच देवानं तडफडत मारावं. ' अतिशय तडफडल्यागत त्याच्या गती होत होत्या. त्या गती भयंकर होत्या. एकेक दिवस कापणे कठीण झाले होते. पण त्याला कुणाचाही सहारा नव्हता. तसा तो कधीकधी विचार करायचा.

तो कधी तडफडल्यागत विचार करायचा. तसं त्याला वाटायचं की आपण जर तसं पाप केलं नसतं तर आज आपल्यालाही चांगले दिवस आले असते. आज आपण जे भोगतो आहोत. ते आपल्या पापाची करणी आहे. आपण जर तसं पाप केलं

नसतं तर आज आपल्याला सुखाचे दिवस पाहायला मिळाले असते.

दिलजीत दिवसेंदिवस खंगत चालला होता. आता त्याला घुसताही येत नव्हते. तो एकाच जागी रस्त्यावर पडलेला होता. तरीही त्याचा जीव जात नव्हता. अन्न, पाणी त्याला मिळेनासं झालं होतं. त्यामुळं भुक फार लागली होती. तो अन्नासाठी व पाण्यासाठी तडफडत होता. पण अन्न, पाणी त्याला मिळेल तेव्हा ना. ते अन्न पाणी न मिळणे म्हणजे त्यानं केलेल्या पापाचा परिणाम होता.

****************

आज सुर्य तेजानं उजळला होता. अनिरुद्ध तसाही आजारीच होता. त्याला आजही अस्वस्थच वाटत होतं. तो सकाळी उठला. त्यानं लवकरच प्रातःविधी आटोपवला. त्यानं सकाळीच ध्यानधारणा केली. तसा तो पुन्हा खाटेवर बसला. त्याला जास्तवेळ बसणं जमत नसल्यानं तो त्या खाटेवरच आडवा झाला. काही वेळ चांगला गेला.

सकाळचे दहा वाजले होते. तसं मुलानं म्हटलं,

"बाबा, थोडं जेवन करुन घ्या. "

त्यानं इशाऱ्यानच जेवन आणायला लावलं. एक दिड पोळी त्यानं खाल्ली. त्यामुळं नेहमीपेक्षा आज तो बरा होता. आपल्या बाबांची प्रकृती आता सुधारेल असं घरच्यांना वाटलं. पण तो त्यांचा भ्रम होता. कारण सायंकाळ जशी झाली. तसा एक जोराचा हृदयविकाराचा झटका आला व त्यात अनिरुद्ध मरण पावला.

अनिरुद्ध मरण पावताच घरच्यांनी त्याचा दाहसंस्कार केला. तसेच गावकऱ्यांनी ज्या ठिकाणी दाह संस्कार केला. त्या ठिकाणी एक शेंदूर फासून दगड ठेवला. लोकं त्या दगडाची पुजा करु लागले.

दिलजीतही त्याच दिवशी उपासानं तडफडत मरण पावला. तो चैत्र पौर्णीमेचाच दिवस होता. लोकांनी त्याचाही अत्यंविधी उरकवला. त्या अनिरुद्धच्याच शरणाच्या बाजूला. मात्र अनिरुद्धचा दाहसंस्कार झाल्यावर जसा गावकऱ्यांनी त्याच्या दाहसंस्कार करण्यात आलेल्या जागेवर एक शेंदूर फासून दगड ठेवला. तसा दगड दिलजीतच्या जागेवर ठेवला नाही. त्याचा पुजाविधीही केला नाही. तशातच कालांतरानं त्या दिलजीतचं भुत बनलं. कारण त्याच्या अपेक्षा काही पूर्ण झाल्या नव्हत्या.

दिवसामागून दिवस जात होते. त्या शरणाच्या पेटलेल्या जागेवर हळूहळू गवत उगवायला लागलं होतं. त्याचबरोबर तो दगड दिसेनासाही होत होता. दिलजीतच्या शरणाची तर जागाच

मिटली होती. त्या जागेवर दाहसंस्काराचे व्रणही शिल्लक नव्हते. त्याचबरोबर दिलजीत कालांतरानं लोकांच्या मनातून निघून गेला.

काळ बदलत चालला होता. दरवर्षी अनिरुद्धच्या दाहसंस्काराच्या जागी पुरलेल्या दगडाची पुजा होत होती. जेव्हा चैत्र पौर्णीमा यायची. लोकं दरवर्षीप्रमाणे प्रत्येक वर्षी त्या दगडाभोवतालची जागा स्वच्छ करीत. नव्हे तर परत त्या दगडाला शेंदूर फासून कोणी नवशं करीत. कोणी काही मागणीही करीत. त्यातच कावळा फांदीवर बसल्यागत व फांदी मोडल्यागत एखादी घटना घडून जायची व लोकं म्हणायची की हा दगड देव असून तो नवसाला पावतो. त्यानंतर कोणी त्या दगडावर नारळ फोडत. ते मात्र मुकपणे दिलजीतचं भुत पाहात असायचं. जे भुत बनलं होतं. त्यालाही आता वाटत होतं की जर मी पुण्य कार्य केलं असतं तर आज माझीही या अनिरुद्धसारखी पुजा झाली असती आणि मीही देवात गणला गेलो असतो.

आज त्या अनिरुद्धच्या दाहसंस्कार जागी शेंदूर फासलेल्या दगडाच्या जागी मोठं मंदिर बनलं होतं. लोकं त्या दगडाच्या देवाची पुजा करीत होते. ती त्या दगडाची पुजा नव्हती तर गावात त्या अनिरुद्धनं केलेल्या कार्याची पुजा होती. जे कार्य त्यानं आपला

जीव जोखमीत घालून केलं होतं. नव्हे तर दिलजीतला हरवितांना घाबरुन त्याचा जीवही गेला असता.

दिलजीतचं भुतंही त्याच ठिकाणी अस्तित्वात असायचं. ते पश्चाताप करायचं. पण त्याची पुजा व्हायची नाही. ते पाहून अनिरुद्धच्या दगडाच्या देवालाही वाईट वाटायचं.

एक दिवस अनिरुद्धचा देव गावातील एका माणसाच्या स्वप्नात गेला. त्यानं दिलजीत त्याचा मित्र असून ते दोघंही एकाच दिवशी मरण पावल्याचं सांगून आमचा दाहसंस्कारही जवळजवळच करण्यात आला. तसेच त्यानं दिलजीतची ओळख तो फक्त एक मित्र आहे अशी देवून सांगीतलं की तुम्ही माझी जशी पुजा करता, तशी दिलजीतचीही करावी.

अनिरुद्धच्या देवाचे गावकऱ्यांच्या स्वप्नात जाण्याने गावकऱ्यांनी त्याच अनिरुद्धच्या देवाच्या मंदिरासमोर दिलजीतच्याही नावाचा एक दगड ठेवला. त्यालाही शेंदूर लावला व त्याचीही पुजा केली.

लोकं आता अनिरुद्धच्या दगडाची पुजा करु लागले. त्याचबरोबर दिलजीतच्याही दगडाची पुजा करीत होते. आता अनिरुद्धचा देवही खुश होता. त्याचबरोबर दिलजीतचा भुतंही. दिलजीत कोण आहे हे माहित करुन न घेता कालांतरानं लोकं

त्याची जी पुजाअर्चना करु लागले होते. त्यामुळं की काय, दिलजीतच्या भुतालाही मोक्ष मिळाला होता. नव्हे तर दिलजीतच्या भुताचं रुपांतर आज देवात झालं होतं.

गाव आता सुधारलं होतं. गावात नवविचारांचे वारे निर्माण झाले होते. लोकं शिकत होते. कोणी कोणी भुत आणि देवही मानत नव्हते. त्यातच अंगात येणं कायमचं बंद झालं होतं. अंधश्रद्धा मुळात बंद झाली होती. तरीही आजही काही लोक त्याच दिलजीत व अनिरुद्धच्या दगडाच्या देवाची पुजा करीत होते. नवशं करीत होते. नव्हे तर आपल्या अंगात आणून अंधश्रद्धेचाही प्रसार करीत होते. गाव सुधारलं होतं तरीही अंधश्रद्धेला खतपाणी घालत होते. हे कार्य पिढ्यान् पिढ्या सुरु होतं. सुरुच राहणार होतं. कारण या सुधारकांच्या शिकल्या सवरलेल्या जगात उच्च शिकलेल्या लाचार निरक्षरांची काही कमी नव्हती. जे शिकूनही निरक्षरांसारखे विचार ठेवत होते. अंधश्रद्धा टिकून ठेवण्यासाठी नव्हे तर अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यासाठी... म्हणूनच आजही अंधश्रद्धा जीवंत होत्या. जरी लोकं उच्च शिकले होते तरीही...

***अंकुश रा. शिंगाडे**



*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

***प्रकाशित छापील साहित्य:**

***कवितासंग्रह***

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४)राजवाडा

***कादंबरी***

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

***कथासंग्रह***

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

***लेखसंग्रह***

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्त्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

***चारोळीसंग्रह***


१)आक्रमण


***प्रवासवर्णन***


१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती

*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*












अंकुश शिंगाडे यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके

कव्हरवर एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.









## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## श्री अंकुश शिंगाडे यांचे हे नववे पुस्तक.

अंकुश शिंगाडे एक शिक्षक आहेत. शिक्षक ही त्यांची केवळ उपजीविका नाही तर जीविकाही आहे. समाजात सत्याचे आणि विज्ञानाचे ज्ञान पसरावे व समाज मनाने बळकट व्हावा, त्यातही मुलींनी शिकावे व त्यांच्या आत्मनिर्भरतेने समाजाला अधिक बळकटी यावी हे त्यांचे स्वप्न आहे. ते भरपूर लिहीतात ते समाजातील दबल्या गेलेल्या घटकांना आवाज देण्यासाठी. आपली पुस्तके समाजात जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते. त्यांची आजवर २४ छापील पुस्तकेही विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत व त्यांच्या पुस्तकांना मागणी आहे. पण तरीही ते आपली पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात.

अंकुश शिंगाडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. म्हणूनच दिनानाथ मनोहर(३ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन

मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।